# कृष्ण परमात्मा


**3**



श्रीपरमानंदस्वामी

"ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ?"

कोमल प्रकाशन



नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ३


श्री.अविनाश मोरेश्वर लिमये

एम.एस्सी.

उर्फ

श्रीपरमानंदस्वामी

**सर्व हक्क स्वाधीन :**


सौ.अनुपमा अविनाश लिमये
१३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४
मोबाईल : ९९६९८ ७६८५०

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane (w) 400604.
7710980841
https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks
प्रकाशन : १९ ऑक्टोबर २०१७ (दिवाळी)
©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे,



**।।श्री।।**

साहित्यसिन्धोः बहुनि सन्ति

रत्नानि दिव्यानि सुभाषितानि ।

कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं

सुभाषितं मंगलमेव पुण्यम् ।।

श्रीअवधूतस्वामी

**अर्थ**

साहित्यरूपी सिंधुमध्ये

सुभाषितरूपी असंख्य दिव्य रत्ने आहेत.

परंतु

कृष्णाच्या हृदयाचे गुणगान करणारे वाक्य

हेच मंगलदायी आणि

पुण्यकारी सुभाषित आहे.

# अनुक्रमणिका


१३. कृष्णाच्या अंतःकरणातील सद्गुरूमूर्ती

१४. सुदाम्याचा कृष्णभक्तीचा निश्चय

१५. रुक्मिणीची कृष्णप्रीती

१६. रुक्मिणीचे कृष्णाला प्रेमपत्र

१७. कृष्ण-रुक्मिणी प्रथम भेट



## कृष्णाच्या अंतःकरणातील सद्गुरूमूर्ती

अशा तऱ्हेने कृष्णाच्या प्रेममाहात्म्याच्या विचारांमध्ये सुदाम्याचे मन पूर्णपणे बुडालेले होते. त्याला कृष्णाशिवाय दुसरे काही दिसत नव्हते आणि कृष्णप्रेमाशिवाय अन्य काहीही जाणवत नव्हते. अशा अवस्थेतच काही काळ गेल्यावर सुदाम्याच्या अचानक एक गोष्ट लक्षात आली, की कृष्ण अजूनही आकाशाकडेच एकाग्र चित्ताने पाहत राहिला आहे. सुदाम्याच्या मनातील कुतूहल जागे झाले. त्याने कृष्णाला हलकेच प्रेमाने हाक मारून भानावर आणले आणि तो म्हणाला,

“अरे कृष्णा, मगाचपासून मी तुझ्याकडे पाहतो आहे आणि तू आपला वरती आकाशाकडे नजर लावून बसला आहेस. आकाशातील चंद्र, तारे व चांदण्यांचा प्रकाश यांचे सौंदर्य मलाही जाणवत आहे. परंतु त्यापेक्षाही त्या चांदण्याने न्हाऊन निघालेला हा परिसर माझ्या मनाला अधिक आकर्षित करीत आहे. परंतु तुझे त्याकडे लक्षच नाही हे माझ्या लक्षात आले आणि मला त्याचेच नवल वाटत आहे. तेव्हा आकाशाकडे पाहून तुला काहीतरी वेगळे व विशेष वाटत आहे हे नक्की. सर्व परिसर मला सुखवीत आहे, पण तू मात्र अत्यंत आनंदित दिसत आहेस. तू काहीतरी वेगळयाच आनंदाचा अनुभव घेत आहेस हे तुझ्या मुखाकडे पाहिल्यावर लगेचच लक्षात येते. तेच मला जाणून घ्यायचे आहे. तेव्हा हा तुझा आनंद काय व कसा आहे आणि कशामुळे आहे हे मला त्वरित सांग. तुझ्या आनंदात निदान सहभागी होण्याची तरी संधी मला देशील की नाही? तेवढा माझा हक्क तुझ्यावरती तुझा परमस्नेही म्हणून आहेच ना? मग मला सर्व काही सांग बघू.”


सुदाम्याच्या प्रेमाच्या आर्जवी व आग्रही वचनांनी कृष्णाला संतोष झाला आणि त्याने सुदाम्याकडे अत्यंत प्रेमाच्या नजरेने पाहिले. कृष्णाच्या अंतःकरणातील अरूप व अमूर्त अनुभवाला सुदाम्याच्या प्रेमभावाचा स्पर्श झाला आणि कृष्णाच्या अंतःकरणातील अनुभव शब्दरूप होऊन साकार होऊ लागला,

“अरे सुदाम्या, परमेश्वराचे सृष्टीरूप अत्यंत मनोहारी, बुद्धी कुंठित करणारे, चित्ताकर्षक व हृदयंगम आहे हे तर सत्यच आहे. त्यातूनही पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही सृष्टीतील पंचमहाभूते विशेष रूपात पाहताना विशेष आनंद होतो हेही खरे आहे. अनेक विशाल पर्वत, दुथडी भरून वाहणाऱ्या सरिता, निरनिराळया सुगंधित फुलांनी व फळांनी बहरलेले वृक्ष, ही त्या सदासर्वकाळ सर्व जीवमात्रांना आधार देणाऱ्या अशा पृथ्वीतत्वाचीच रूपे आहेत. अथांग व व्यापक असा सागर किंवा दाटून बरसणारा वर्षाव ही त्या आप तत्वाची म्हणजेच जलाची रूपे आहेत. सूर्य किंवा अग्नी ही त्या तेज तत्वाची रूपे आहेत. सुखद स्पर्श करणारी

वाऱ्याची मंद झुळूक किंवा वेळप्रसंगी वेगवान होऊन वाहणारा वारा ही त्या वायू तत्वाची रूपे आहेत. सर्व सृष्टीला व्यापून असणारे आणि नित्य नवीन रूपात व रंगात दिसणारे असे आकाश तत्व आहे. पंचमहाभूतांच्या या विविध रूपांद्वारे जेव्हा त्यामागील परमेश्वरी सत्तेचीच जाणीव होते तेव्हा पंचमहाभूतांच्या त्या रूपातील खुललेले परमेश्वराचे सौंदर्यच मनाला जाणवते आणि अंतःकरणाचीही आत्यंतिक आनंदाची अवस्था होऊन राहते. कारण त्या वेळेस परमेश्वरी माहात्म्याने व परमेश्वरी प्रेमाने अंतःकरण एकवटलेले असते.

अरे सुदाम्या, पण हा अनुभव त्या परमेश्वराच्या जडसृष्टीरूपापुरताच मर्यादित असतो आणि तोही तेवढ्या काळापुरताच मर्यादितही राहतो. परंतु ज्याला परमेश्वराच्या चैतन्यरूपामध्येही असा अनुभव पहाण्याची व घेण्याची संधी मिळाली तो खरोखरीच अत्यंत भाग्यवानच होय. आपल्यालाही अशी संधी परमभाग्यानेच लाभली होती आणि ती आपले सद्‌गुरू व अत्यंत थोर अशा सांदिपनी ऋषी यांच्या रूपानेच! परमेश्वराला पाहण्याची व अनुभवण्याची ज्ञानदृष्टी आपल्या सद्‌गुरूंनीच आपल्याला दिली. त्या दृष्टीने जेव्हा आपण पाहू लागलो तेव्हा ते परमेश्वरस्वरूप आपल्याला सद्‌गुरूंच्याच ठिकाणी दिसले आणि त्यांच्याचठायी अनुभवाला आले.

सदा सर्वकाळ सर्वच जीवांना आधार देणारे व नित्य क्षमाशील असे आपल्या सद्‌गुरूंचे रूप आठवले की ‘पृथ्वी’ तत्वाचेच स्मरण होते. प्रेमजलाने नित्य दाटून असलेले आणि काहीवेळेला अनावर होऊन वाहणारे असे आपल्या सद्‌गुरूंचे प्रेमळ नेत्र व नजर आठवली की ‘आप’ म्हणजे जल तत्वाचेच स्मरण होते. यज्ञयागादि कर्माच्या वेळी आणि स्वानुभवाचे सत्यज्ञान प्रगट करताना आत्मतेजाने युक्त होणारे असे आपल्या सद्‌गुरूंचे मुखकमल आठवले की ‘तेज’ तत्वाचेच स्मरण होते. ओजस्वी वाणीने सत्य ज्ञानवचने प्रगटवणारी आणि प्रेमळ व मधुर सुरांद्वारे परमेश्वराचे गुणगान करणारी अशी सद्‌गुरूंची मूर्ती आठवली की ‘वायू’ तत्वाचे स्मरण होते. त्याचप्रमाणे आपल्या सद्‌गुरूंच्या स्वानुभवाची व्यापकता व सखोलता यांची आठवण आपल्याला झाली की ‘आकाश’ तत्वाचे स्मरण होते. हा अनुभव एवढा अन्योन्य आहे की जसे सद्‌गुरूंचे स्मरण झाले की पंचमहाभूतांची आठवण होते, अगदी तसेच पंचमहाभूतांचे आविष्कार पाहिले की सद्‌गुरूंच्या मूर्तीचे व त्यांच्या माहात्म्याचे सहजच स्मरण होते. सद्‌गुरूंच्या ठायीच सर्व सृष्टी पाहिली व अनुभवली, की स्वानुभवाने सर्व सृष्टीच्या ठिकाणीही सद्‌गुरूंचेच माहात्म्य जाणवते व अनुभवालाही येते. अशा तऱ्हेने आत व बाहेर एकाच अनुभवाची प्रचिती येते



आणि त्या अनुभवात आत व बाहेर हे द्वैतही पूर्णपणे लयाला जाते. मग तेथे उरते ती एकीएक व्यापक परमेश्वराच्या अस्तित्वाची आनंददायी अनुभूती.”

कृष्णाच्या बोलण्यातील वाक्यावाक्यातून, शब्दाशब्दातून एवढेच नव्हे, तर दोन शब्दांतील निःशब्द अंतरामधूनही कृष्णाचे अंतःकरणच पूर्णपणे मोकळे होत होते. सुदामा मात्र कृष्णाकडे केवळ पहातच राहिला होता. कृष्णाच्या सांगण्यातील भावार्थ हा सुदाम्याच्या अनुभवाचा नसल्यामुळे सुदामा हा आनंदित होण्यापेक्षा आश्चर्यचकितच जास्त झाला होता. त्याची ही अवस्था कृष्णाला जाणवली आणि तो सुदाम्याकडे पाहून अत्यंत मोकळेपणाने हसला. क्षणार्धात सुदाम्याचे मनही मोकळे झाले खरे, पण त्याच्या मनावर कृष्णाच्या बोलण्याचा झालेला प्रभाव मात्र अजूनही कायमच होता. त्याच भरात सुदाम्याने आपले दोन्ही हात कृष्णासमोर जोडले आणि अत्यंत नम्रभावाने कृष्णाशी बोलू लागला,

“अरे कृष्णा, तुझे सर्वच बोलणे मला समजले असे नाही. पण तरीही माझ्या मनाचा गोंधळ मात्र मुळीच झालेला नाही. कारण एक महत्वाची गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे की तुझा ईश्वरी अनुभव हा अत्यंत व्यापक आहे. खरे तर असे म्हणणेही बरोबरच नाही. कारण ईश्वरी अनुभव हा व्यापकच असतो हेच खरे आहे आणि तसा अनुभव हा सद्गुरूकृपेमुळेच येतो हेच सत्य आहे. आपल्या सद्गुरूंची पूर्ण कृपा तुझ्यावर झालेली आहे हे मला पूर्णपणे माहीत आहे आणि ती कृपा तुला तुझ्याकडून घडलेल्या सद्गुरूभक्तीमुळेच प्राप्त झालेली आहे हेही मी जाणून आहे. परंतु तुझ्या एका गोष्टीचे मात्र मला राहून राहून नवल वाटते, की एरव्ही तुझ्या बोलण्यामध्ये सद्गुरू सांदिपनींच्या माहात्म्याचा कधीच उल्लेख येत नाही. किंबहुना तसे त्यांचे नावही तुझ्या मुखातून आलेले कधी ऐकू येत नाही. पण ज्या ज्या वेळेस ईश्वरी अनुभवाविषयीचे बोलणे येते तेव्हा मात्र तुला अजिबात राहवतच नाही. तू एकदम भावपूर्ण होतोस आणि तुझ्या अंतःकरणातील सांदिपनींची प्रेममूर्ती व त्यांचे माहात्म्य अगदी भरभरून प्रगट होते. एवढे सांदिपनींचे रूप व स्वरूप तुझ्या अंतःकरणात अगदी खोलवर ठसलेले आहे. आता सांदिपनींचा व तुझा प्रत्यक्ष सहवास व संवाद नाही आणि तुला त्याची तशी काही आवश्यकता वाटत आहे असेही दिसत नाही. तरीही तुझ्या ठिकाणी सांदिपनींचे माहात्म्य व थोरवी नित्य केवळ जागृतच आहे असे नाही, तर ती कायमपणे स्फुरतच असते आणि योग्य संधी मिळाली रे मिळाली की ते माहात्म्य अगदी ठामपणे प्रगटही होते. हे कसे काय घडते बरे?”


सुदाम्याचे बोलणे ऐकून कृष्ण एकदम अंतर्मुख व गंभीर झाला. क्षणभरच त्याने आपले नेत्र मिटून घेतले आणि पुन्हा उघडले तर ते अश्रूंनी पूर्णपणे भरलेले होते. पण त्या अश्रूंच्या थेंबांना बाहेर पडण्याचा अवसर मिळण्याच्या आतच कृष्णाच्या मुखातून भावपूर्ण शब्दांचा ओघ बाहेर पडू लागला.

"अरे सुदाम्या, तुझ्या बोलण्याने तर तू माझ्या अगदी अंतःकरणालाच हात घातला आहेस, जेथे माझ्या सद्‌गुरू सांदिपनींची मूर्ती अधिष्ठित आहे. तेच माझ्या आत्मशक्तीचे व भक्तिभावाचे मूळ आहे. त्या शक्तीच्या बळावरच माझ्याकडून अनेक पराक्रम घडत आले आणि आजही घडत आहेत. पण त्या भक्तीमुळेच मी नित्य स्वानंदात रममाण असतो आणि आनंदाने जीवन जगत असतो. त्या स्वानंदाचे मूळ जे आत्मप्रेम ते म्हणजे माझ्याठायीचे सद्‌गुरूप्रेम होय आणि त्या सद्‌गुरूप्रेमाचे मूळ म्हणजे सद्‌गुरूंची मूर्ती होय. त्या सद्‌गुरूमूर्तीच्या ठायीच त्यांच्या ईश्वरी प्रेमरूपाचे व ईश्वरी स्वरूपाचे ऐक्य आहे. म्हणूनच माझ्या अंतःकरणात सद्‌गुरूंच्या मूर्तीच्या अस्तित्वामुळे ईश्वरी प्रेम व ईश्वरीस्वरूप नित्य स्फुरत असते आणि त्याच्या ऐक्याचा आनंद मी नित्य अनुभवीत असतो.

सुदाम्या, तुला एक मी माझ्या जीवनातील महत्वाचे गुज सांगतो. अगदी बालपणापासूनच माझ्या ठिकाणच्या ईश्वरी आत्मशक्तीची जाणीव माझ्याठायी अगदी सहजपणे होती. त्या आत्मशक्तीमुळे एक जबरदस्त आत्मविश्वास माझ्याठायी नित्यपणे होता. त्यामुळेच गोकुळात असताना माझ्याकडून अनेक चमत्कारसदृश असे अमानवी वाटणारे पराक्रम अत्यंत सहजपणे घडत राहिले. त्याचे सर्वांनाच नेहमीच आश्चर्य व कौतुकही वाटत असे. पण मला मात्र त्याचे कधी नवलही वाटले नाही. माझ्या जीवनाचा तो जणू एक सहज भागच आहे असेच मला जाणवत असे. त्याचप्रमाणे माझ्या ठिकाणी सर्वांविषयी प्रेम व आपलेपणाही अगदी बालपणापासूनच होता आणि त्याच आपलेपणापोटी मी अनेकांच्या सुखदुःखाच्या प्रसंगात सहभाग घेऊन मी त्यांना सहकार्यही करीत असे. त्यामुळे अनेकांच्या मनातील भावनिक जगात मी प्रेमाने प्रवेश केला आणि त्यांच्या मनात प्रेमाचे स्थानही मिळाले. त्या प्रेमीजनांच्या सहवासात प्रेमाची देवघेव करून प्रेमाचा अनुभव घेण्याचा छंद मलाही लागला आणि तोच छंद माझ्यामुळे त्यांनाही लागला.

अरे सुदाम्या, त्या प्रेमीजनांपैकी काहीजणांनी तर मलाच त्यांचा 'देव' मानले. त्यांच्या ठिकाणी माझ्याच प्रेमाचा ध्यास जडला आणि त्यांच्याकडून माझीच भक्ती घडू लागली. त्यांच्या मनात भरलेली माझी प्रेमप्रतिमा भक्तिभावामुळे त्यांच्या अंतःकरणात मूर्त रूपाला आली आणि त्यांच्या अंतरात माझीच मूर्ती ठसली. त्यामुळे त्यांच्या अंतरात माझे प्रेम नित्य स्फुरत राहिले आणि त्याचा आनंद ते अनुभवीत राहिले. मग त्याच आनंदाच्या अनुभवाने जगले जाणारे त्यांचे जीवन हेही सहजपणे आनंदाचेच झाले. एवढेच नव्हे, तर त्यांच्यासाठी त्यांचे जीवन हे आनंदाचा अनुभव घेण्याचे साधनच होऊन राहिले.

सुदाम्या, पण खरे गुज तर वेगळेच आहे. माझ्या ठिकाणी असलेल्या ईश्वरी शक्तीची व ईश्वरी प्रेमाची जाणीव मला असूनही कित्येक वेळा बाहेरची परिस्थिती मला अंतर्मुख व्हायला भाग पाडीत असे. कारण बऱ्याच वेळेला मला



असाही अनुभव येई की लोकांना त्यांच्या संकटकाळी मदत करून व त्यांना त्या संकटातून सोडवूनही त्यांच्या ठिकाणी मात्र त्याची कदर नसे. सर्वांशी अत्यंत प्रेमाने वागूनही कित्येक जणांच्या ठिकाणी काही वेळेला त्याची जाणीव काय, त्याचे स्मरणही नसे. जर एखादी गोष्ट इतरांच्या मनाप्रमाणे वा अपेक्षेप्रमाणे माझ्याकडून बाह्यपरिस्थितीमुळे घडू शकली नाही, तर त्याच लोकांना सर्व पूर्व गोष्टींचे विस्मरणही तेवढ्याच सहजतेने घडत असे आणि माझ्याविषयी त्यांच्या मनात शंका व विकल्प निर्माण होऊन त्याचे रूपांतर रागातही होत असे. काही वेळेला तर साधी कृतज्ञताही न बाळगता कित्येकजण कृतघ्नही होत असत. अशा वेळेला माझ्या मनाला निश्चितच थोडीशी विषण्णता किंवा नाराजी वाटत असे. कारण कितीही निरपेक्षपणे आपण वागलो तरी नकारात्मक प्रतिक्रियेची अपेक्षा आपल्याला निश्चितच नसते.

असे प्रसंग मग मला अंतर्मुख करीत असत आणि त्यामुळे माझी उदासीनता अधिकच वाढत असे. कारण माझ्या अंतःकरणात आत्मशक्ती असली तरी माझ्या मनाला सांभाळणारी, माझे सांत्वन करणारी आणि माझ्या मनाला आधार देऊन परत उभारी देणारी अशी कोणतीही सगुण व्यक्ती मूर्तीरूपाने माझ्या अंतःकरणात वसलेली नव्हती. पण अशा वेळी सुदैवाने माझे खरे प्रेमीजन माझ्या उपयोगाला व कामाला येत असत. माझी मनोव्यथा जाणून ते माझ्यावर त्यांच्या प्रेमाचा वर्षावच करीत. त्यांच्या सहवासात माझे मन शांत होई. खऱ्या प्रेमाच्या त्या थोड्याशा अनुभवानेही माझे मन सबळ होऊन पुन्हा प्रेमगुणाने युक्त होई आणि प्रेमभावाचा माझा सहज स्वभाव पुन्हा जागा होऊन खेळू लागे. सर्वांशी म्हणजे अगदी सर्वांशी, माझ्या प्रेमाला न जागलेल्यांशीही माझे आपलेपणाने व प्रेमाने वागणे बोलणे घडू लागे आणि माझे मनातील प्रेम पुन्हा मोकळेपणाने वाहू लागे.


अशा प्रेमीजनांमध्ये माझ्या अत्यंत प्रेमाचा असलेला माझा परममित्र पेंद्या आणि माझी प्रिय सखी राधा हे अग्रेसर होते. तसे पहायला गेले तर नंद व यशोदा हे नेहमीच माझ्या पाठीशी असत आणि बलरामदादाही मला त्याच्या मर्यादेत पूर्ण साथ देत असे. परंतु आपल्या निरागस व भाबड्या प्रेमाने मलाच 'देव' म्हणणारा पेंद्या हा त्याच्या प्रेमळ वागण्या-बोलण्याने माझ्या मनाला पुन्हा खुलवीत असे आणि उत्साहित करीत असे. राधेची तर गोष्टच वेगळी होती. माझ्या व्यक्तिगत प्रेमाच्या अनुभवातून माझ्या ठिकाणी असलेल्या ईश्वरी अस्तित्वाची जाणीव राधेच्या ठिकाणी पूर्णपणे झालेली होती. माझ्या पराक्रमाचे व प्रेमरूप अवस्थेचे मूळही राधेने पक्केपणाने ओळखले होते. म्हणूनच तिच्या ठिकाणी माझ्याविषयी आत्यंतिक प्रेम व पराकोटीचा भक्तिभावच होता. त्या भक्तिभावाने राधा जेव्हा माझ्या जवळ येई, तेव्हा तिच्या ठिकाणी माझ्याविषयी असलेली अढळ श्रद्धा व विश्वास पाहून माझ्या ठिकाणचा बाह्यकारणाने थोड्या वेळासाठी

झाकोळला गेलेला आत्मविश्वास पुन्हा जागृत होत असे आणि माझी प्रेमस्वरूप अवस्थाही पुन्हा प्रगट होत असे.

अरे सुदाम्या, पुढे मथुरेत असताना किंवा आता द्वारकेत आल्यानंतरही मनाला उद्विग्नता आणणारे बाह्यप्रसंग कितीतरी आले आणि अजूनही येतात. पण त्या निमित्ताने त्यावेळेस माझे मन आता जेव्हा जेव्हा अंतर्मुख होते, तेव्हा तेव्हा माझ्या मनाला माझ्या अंतःकरणात कायमच्या अधिष्ठित होऊन राहिलेल्या सद्‌गुरूमूर्तीचेच दर्शन होते. त्यांचे प्रसन्न मुखकमल, त्यांच्या मुखावर विलसणारे आत्मतेज आणि त्याहीपेक्षा त्यांच्या नेत्रातून ओसंडणारा प्रेमळपणा या सर्वांचे सहजच स्मरण होते. त्यामुळे माझे मनही त्यांच्या प्रेमाने पुन्हा युक्त होते. सद्‌गुरूंच्या प्रेमळ स्पर्शाचा पुन्हा प्रत्यय येतो आणि शरीराचे सर्व कष्ट विसरले जाऊन त्याला विसावा मिळतो. मनाचे सर्व क्लेश नाहीसे होऊन मनही पूर्ण शांत होते. एवढेच नव्हे, तर सद्‌गुरूंच्या दृष्टीतील माझ्याविषयी असलेला पूर्ण विश्वास पाहून माझाही आत्मविश्वास पुन्हा जागा होतो आणि सद्‌गुरूंचा माझ्याविषयी असलेला संकल्प पूर्ण करण्याच्या एकमेव ध्यासाने मी पुन्हा युक्त होतो. त्यामुळे अधर्माचा त्याच्या मुळासकट नाश करून सर्वांच्या ठिकाणी सद्धर्माचे व ईश्वरी प्रेमभक्तीचे राज्य स्थापन करण्याचे माझे जीवनकार्य पुन्हा जोमाने व उत्साहाने घडू लागते.

सुदाम्या, माझ्यासाठी आणखीन एक भाग्याची गोष्ट म्हणजे जसा माझ्या अंतःकरणात मला माझ्या सद्‌गुरूमूर्तीचा आधार आहे तसाच बाह्यजीवनात मला माझ्या प्रिय पत्नीचा, रुक्मिणीचाच आधार वाटतो. माझे माहात्म्य आधी जाणून मग रूक्मिणीने माझ्या जीवनात माझी धर्मपत्नी म्हणून प्रवेश केला आणि तिच्या पत्नीधर्माला ती अगदी पुरेपूर जागत आहे. ‘पत्नी म्हणजे अर्धांगिनी’ या वचनाचे सत्यत्व प्रगट करणारे मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच रूक्मिणी होय. ती तर माझी ‘आत्मसखीच’ आहे. तिच्याशिवाय माझे जीवन हे मला नेहमीच अपुरे व अधुरे जाणवते. परस्परांना पूरक असेच आमचे उभयतांचे जीवन आहे आणि त्याचे सर्व श्रेय केवळ रूक्मिणीकडेच जाते हे सत्यच आहे.

माझे माहात्म्य जरी रूक्मिणी जाणून असली तरी प्रत्यक्ष माझ्या सहवासात तसा अनुभव घेता येणे ही साधी गोष्टच नाही हे मीही जाणून आहे. कारण अनुभव व्यापकपणे घेण्याची माझी वृत्ती आहे. त्यामुळे काही वेळेला बराच व्यापही माझ्याकडून केला जातो. परंतु रूक्मिणी मात्र त्याचा जराही ताप करून न घेता नेहमी शांतच राहते. एवढेच नव्हे, तर अनेक प्रसंगांत माझ्या बरोबरीने उभी राहून मला सक्रिय साहाय्यही करते. माझ्या कामाच्या व्यापामुळे प्रत्यक्ष तिच्या वाट्याला मी कमीच येतो. परंतु त्यासंबंधी केव्हाही तक्रारीचा सूर जराही न लावता रूक्मिणी मला नेहमीच समजून घेत असते. किंबहुना हा समजूतदारपणा हाच



रूक्मिणीचा मोठा व महत्वाचा गुण आहे. अर्थात् क्वचित प्रसंगी रूक्मिणी रागावतेही. पण तो रुसवा लटका व प्रेमवर्धक असतो. व्यक्तिगत प्रेमाचेच ते लक्षण असते आणि ते मला ठाऊक असल्यामुळे रूक्मिणीच्या रागाचे मला कौतुकच वाटते. ती रुसली असताना तिचा तो रुसवा दूर करण्याच्या प्रयत्नासारखी दुसरी कोणतीही मजेशीर व आनंददायी गोष्ट नाही हे अगदी खरे आहे. एका क्षणात रूक्मिणीचा लटका रुसवा व त्यातून निर्माण झालेला दुरावा दूर पळतो आणि रूक्मिणीच्या ठायीचा निरागस व निर्मळ प्रेमाचा झरा पुन्हा झुळूझुळू वाहू लागतो. त्यावेळी मग आनंदाचा जो अनुभव आम्ही दोघेही अनुभवतो त्याला तर साऱ्या त्रिभुवनातही दुसरी कोणतीच तोड नाही."

रूक्मिणीच्या प्रेमाने युक्त होऊन बोलत असलेल्या कृष्णाला पाहून व ऐकून सुदामा अत्यंत चकित मुद्रेने कृष्णाकडे केवळ पाहतच राहिला होता. तेवढ्यात प्रत्यक्ष रूक्मिणीचे तेथे आगमन झाले. अत्यंत प्रसन्न व सुहास्य मुद्रेने आलेल्या रूक्मिणीने सोन्याच्या सुरेख तबकातून गरम दुधाने भरलेली सोन्याची दोन सुबक पात्रे आणलेली होती. त्यातील एक पात्र तिने कृष्णाच्या हातात दिले आणि दुसरे पात्र सुदाम्याच्या हातात देऊन रूक्मिणी कृष्णाच्या जवळ बसून राहिली. केशर व शर्करा मिश्रित त्या दुधाचे सेवन करून त्याचा आस्वाद घेत असताना कृष्ण व सुदामा उभयता बोलण्यातही पूर्णपणे रमले होते. तेवढ्यात कृष्णाने आपल्या हातातील दुधाचे पात्र रूक्मिणीच्या समोर धरले आणि तक्रारीच्या लटक्या सुरात तो रूक्मिणीला म्हणाला,

"अगं, या दुधात साखर घातली आहेस की नाही? मला तर हे दूध मुळीच गोड लागत नाही. तसेच त्याचा गरमपणाही कमी झालेला आहे. अशा रात्रीच्या गारव्यामध्ये थंडगार दूध पिणे मला मुळीच जमणार नाही. तू स्वतःच हे दूध पिऊन बघ पाहू."

रूक्मिणीच्या मुखावरती थोडेसे नवलाईचे भाव आल्यासारखे दिसले. तिने ते दुग्धपात्र आपल्या हातात घेतले आणि तिने त्या दुधाचे काही घोट घेतले. तिला लगेचच कृष्णाने केलेली गंमत लक्षात आली आणि कृष्णाकडे पाहून मिश्किल हास्य करीत रूक्मिणी म्हणाली,

"कृष्णा, या दुधात साखर वगैरे सर्वकाही अगदी व्यवस्थित आहे आणि दूध चांगलेच गरमही आहे. हे दूध आहे, खीर नाही. तेव्हा त्यामध्ये साखरेचे प्रमाण माफकच असणार आणि जास्त साखर खाणे हे तब्येतीस अपायकारकही आहे. तुला ना, जास्त गोड खाण्याची सवयच लागलेली आहे. पदार्थ कितीही गोड केला तरी त्यामध्ये अजून साखर हवी होती असेच तुझे नेहमी म्हणणे असते. आता दुधाच्या

गरमपणाविषयी म्हणशील तर जेव्हा मी दूध आणले तेव्हा ते चांगलेच गरम होते. परंतु तू तुझ्या नेहमीच्या सवयीनुसार एकीकडे बोलत बोलतच दूध पित होतास. त्यातही तुझे बोलण्याकडेच लक्ष अधिक होते आणि मग दूध पिण्याकडे साहजिकच दुर्लक्ष झाल्यामुळे दूध थंड होऊन राहिले. बरे, दूध कितीही वेळा जरी तुला गरम करून दिले तरी वारंवार तसेच होणार. तेव्हा जे दूध मी आणलेले आहे ते प्राशन करावे आणि आता स्वारीने विश्रांतीसाठी आपल्या महालात चलावे अशी आपल्याला नम्र प्रार्थना आहे.

अहो सुदामदेवा, तुमच्या विश्रांतीचीही व्यवस्था दुसऱ्या महालात केलेली आहे. तेथे जाऊन शांतपणे नीट विश्रांती घ्या. कारण या कृष्णाचे व तुमचे बोलणे कधी संपेल असे मला तरी वाटत नाही. तुम्ही तर आणखीन बरेच दिवस येथे राहणार आहात ना? मग कशाला उगाचच एवढी घाई गडबड हवी बरे? तेव्हा आधी तुम्हीच विश्रांतीसाठी निघण्याचे करावे. कारण तुम्ही निघाल्याशिवाय कृष्ण येथून हलणेसुद्धा शक्य नाही."


रूक्मिणीच्या बोलण्यावर कृष्णाने आपले दोन्ही हात जोडून तिच्यासमोर धरले आणि थोड्याशा नाटकी सुरात व आविर्भावात म्हणाला,

"जो हुकूम राणीसाहेबांचा ! आपले सांगणे आम्हाला शिरसावंद्य आहे. एवढेच नव्हे, तर आम्हाला ती आज्ञाच आहे आणि आपली आज्ञा मोडण्याची कोणाची प्राज्ञा आहे बरे ? आमची तर निश्चितच नाही."

असे म्हणून कृष्णाने हसत हसत रूक्मिणीच्या हातातले दुग्धपात्र आपल्या हातात घेतले आणि शांतपणे व सावकाशीने दुग्ध प्राशन करू लागला खरे, पण स्वस्थ बसेल तर तो कृष्ण कसला? त्याला पुन्हा बोलल्याशिवाय राहवलेच नाही. गंभीरतेचा भाव मुखावर आणून कृष्ण रूक्मिणीला पुन्हा म्हणाला,

"पण रूक्मिणी, तू अशी काय जादू केलीस बरे? कारण हे दूध तर आता अतिशय गोड व अत्यंत गरम असेच लागत आहे. तू स्वतः ते दूध सेवन केल्याचा तर हा परिणाम नव्हे?"

असे म्हणून कृष्ण मोठमोठ्याने हसू लागला आणि लाजेने चूर झालेल्या रूक्मिणीला त्याने अत्यंत प्रेमाने आपल्याजवळ घेतले. कृष्ण व रूक्मिणी यांच्यातील ती प्रेमयुक्त अवस्था व तो प्रेमरंग पाहून सुदाम्याला मनात अत्यंत कौतुकच वाटले. परंतु एकंदरीत परिस्थितीचा इशारा ओळखून सुदामा मात्र तेथून निघाला आणि विश्रांतीसाठी त्याच्या दालनाकडे चालू लागला.




*****

## सुदाम्याचा कृष्णभक्तीचा निश्चय

हे लक्ष्मी, सुदामा विश्रांतीसाठी मंचकावर पहुडला होता खरा, परंतु तो निद्रेच्या अधीन मात्र होऊ शकत नव्हता. मंद वाऱ्याने हलणाऱ्या वाळयाच्या पडद्यांमुळे वातावरण सौम्य सुगंधाने भरून गेलेले होते. दालनातील दिवे विझवले गेले असले तरी गवाक्षातून आत येणाऱ्या चंद्रकिरणांच्या रम्य प्रकाशात सर्व दालन उजळून निघाले होते. बाहेरील वातावरणाप्रमाणेच सुदाम्याचे मनही अत्यंत शांत व प्रसन्न होते. कृष्णाच्या सहवासात अनुभवलेल्या प्रेमाची तृप्तता सुदाम्याच्या मुखावर अगदी सहजपणे दिसत होती. परंतु तरीही त्याचे मन मात्र कृष्णाच्या माहात्म्याच्या विचारात पूर्णपणे गढून गेलेले होते. कृष्णाचे बाह्यांगाने प्रगटणारे नानाविध रंगांचे मनमोकळे जीवन पाहतानाच, कृष्णाच्या अंतरंगातील सद्‌गुरू सांदिपनींची ठसलेली मूर्तीच सुदाम्याला जाणवत होती, जी त्याच्या वागण्या-बोलण्यातून सहजपणे प्रगटत होती. कृष्णाच्या आनंदी व सहज जीवनाचे मूळ त्याच्या ठायीच्या सद्‌गुरूंच्या प्रेममूर्तीमध्ये होते आणि म्हणूनच कृष्णाचे अंतःकरण जेव्हा जेव्हा प्रगट होत होते, तेव्हा तेव्हा त्याच्याकडून सद्‌गुरूंची महतीच सहजपणे व प्रकर्षाने प्रगट होत होती हेही सुदाम्याच्या लक्षात आले. सद्‌गुरूंच्या सगुणभक्तीचेच हे फळ आहे हे सुदाम्याने ओळखले. किंबहुना, सगुणभक्तीची परिणतीच आनंदाच्या सहजावस्थेत होते हे गुजच सुदाम्याने जाणले.

'आपल्या मनामध्ये संसाराचे वैराग्य नसल्यामुळे आपल्याकडून सद्‌गुरुंची भक्ती घडू शकली नाही. आपण त्यांचे माहात्म्य केवळ शब्दांनीच समजून होतो. पण भाग्यानेच आपल्याला कृष्णाचे प्रेम अनुभवायला मिळाले, तरी तेही त्याच्या रूपापुरतेच मर्यादित राहिले. पण त्याचे माहात्म्य जाणत नसल्यामुळे त्या कृष्णप्रेमाचे रूपांतर कृष्णभक्तीत होऊ शकले नाही. त्यामुळे कृष्णाच्या रुपाचे व प्रेमाचे स्मरण असूनही आपण मनाने मात्र संसारातच बुडून राहिलो आणि सुखदुःखाच्या द्वंद्वात अडकलो. त्यामुळे मनाला क्लेश होऊन जे संसाराचे वैराग्य येत असे तेही तात्पुरतेच असे. कारण मनातील वासनेचे मूळ कायम होते, ज्यातून पुन्हा विकारांची निर्मिती होऊन मन त्याला सहज बळी पडत असे.

पण भाग्याने आपल्याला पुन्हा कृष्णाचा सहवास घडला आणि त्याचे सहज जीवन अगदी जवळून पहायला मिळाले. त्यातून एक महत्वाची गोष्ट लक्षात आली की वैराग्य म्हणजे केवळ बाह्यकृतीचे नाही किंवा विराग म्हणजे कोणावरतीही राग नाही. तर खऱ्या वैराग्याचे लक्षण म्हणजे मनाचा मोकळेपणा आणि सर्वांविषयी आपलेपणा. दया, क्षमा, शांती जेथे आहे तेच वैराग्य खरे आणि हे वैराग्य केवळ सगुण भक्तीमुळेच शक्य आहे. कारण भक्ती म्हणजे मनाठायी सगुण प्रेमाचा अखंड भाव, त्या प्रेमाचाच निश्चय आणि त्या प्रेमाचाच ध्यास. त्या



आर्ततेमुळेच मन नेहमीच निर्मळ राहते आणि सगुण प्रेमाचे मूळ मनात खोलवर व पक्केपणाने रूजून वासनेचे समूळ निर्मूलन होते.

तेव्हा कृष्णाचे स्वरूप जाणून त्याच्या रूपाचे केवळ स्मरणच नव्हे, तर ध्यासच माझ्या मनाच्या ठायी जडला तरच माझ्या मनाची शुद्धी होईल आणि संसाराविषयीची अनासक्ती निर्माण होईल. कृष्णाच्या सगुण प्रेमाचा हा परिणाम असल्यामुळे मनाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नकारात्मक भावना निर्माण न होता मनाची वृत्ती नेहमी होकारात्मकच राहील. त्यामुळे मनाच्या ठिकाणी असलेली संसाराविषयीची काल्पनिक भीतीही नाहीशी होईल आणि मनाच्या ठायी खरा मोकळेपणा निर्माण होईल. बाह्यांगाने संसारात राहूनही मी मनाने त्याच्यातून पूर्णपणे मुक्त असेन आणि मन सदैव कृष्णप्रेमाने युक्त राहून भक्तीचा आनंद मी स्वच्छंदपणे उपभोगीत राहीन. पण मला हा अनुभव येथे कृष्णाच्या सहवासात राहून येणार नाही, तर तो अनुभव मला माझ्या घरी संसारात राहूनच येईल. कारण तेथेच माझ्या कृष्णप्रेमाची नित्य कसोटी लागेल. तेव्हा त्या परीक्षेला घाबरून मी येथे कृष्णाच्या सहवासात राहिलो तर कृष्णप्रेमाचे केवळ सुखच अनुभवीत राहीन आणि भक्तीच्या खऱ्या आनंदाला मुकेन. तेव्हा आपल्या-आपल्या ठायीच राहून कृष्णप्रेमाने एकचित्त करणे हीच खरी माझ्यासाठी तपश्चर्या आहे आणि आता जराही वेळ न दवडता ती मला त्वरितच करावयास हवी.’


अशा तऱ्हेने चिंतनात मग्न असलेला सुदामा रात्रभर जागाच होता. पहाट होऊन हळूहळू उजाडू लागले आणि राजवाड्यात सनई चौघडयाचे सूर मंदपणे घुमू लागले. त्या मधुर व मंजूळ नादाने सुदामा भानावर आला तेव्हा त्याच्या मुखावर पूर्ण प्रसन्नता होती. रात्रीच्या जागरणाचा काहीही त्रास वा ताण त्याच्या ठिकाणी अजिबात दिसतच नव्हता. कारण त्याचे मन अतिशय उल्हसित व उत्साहित झालेले होते. सुदाम्याने सर्व प्रातर्विधी लगबगीने उरकले. आपले सामानाचे छोटेसे गाठोडे बरोबर घेऊन तो कृष्णाच्या महालापर्यंत आला मात्र, कृष्ण सुस्नात होऊन स्वतः त्याच्या महालाच्या बाहेर आला. जणू काही कृष्ण सुदाम्याचे येणे अपेक्षितच करीत होता. कृष्णाने सहेतुक नजरेने सुदाम्याच्या हातातील गाठोड्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि तो सुदाम्याला हात धरून आपल्या महालात घेऊन गेला. महालात कृष्ण सुदाम्यासह मंचकावर बसला असता तेवढ्यातच तेथे रूक्मिणीचे आगमन झाले. सुदाम्याला पाहून रूक्मिणीनेही मंदस्मित केले. त्यानंतर प्रथम तिने कृष्णाची षोडषोपचारे पूजा करून आरती ओवाळली. नंतर रूक्मिणीने नैवेद्याची चांदीची दुधाची वाटी कृष्णाच्या हातात दिली आणि अत्यंत भक्तिभावाने त्याला प्रणिपात केला. कृष्णाने थोडेसे दूध सेवन केले आणि बाकीचे दूध रूक्मिणीलाच दिले. रूक्मिणीने आनंदाने त्याचा प्रसाद म्हणून स्वीकार केला आणि त्या दुधाचे सेवन केले.

रूक्मिणीने अशा तऱ्हेने कृष्णाचे केलेले पूजन पाहून सुदाम्याला अत्यंत संतोष झाला आणि कृष्णपूजनाचा आनंद स्वतः अनुभवण्यासाठी तो पुढे आला. रूक्मिणीने आणलेल्या तबकातील सुगंधित फुले सुदाम्याने आपल्या ओंजळीत घेतली आणि कृष्णाच्या चरणांवर वाहिली. सुदाम्याने कृष्णाच्या चरणी मस्तक ठेवून त्याला साष्टांग प्रणिपात केला आणि आपले दोन्ही हात जोडून कृष्णाला म्हणाला,

“माझ्या अत्यंत प्रिय कृष्णा, तुला कितीदाही वंदन केले तरीही ते कमीच आहे, एवढे तुझे माहात्म्य थोर आहे. मला सहजतेने तुझ्या प्रेमाचा लाभ झाला हे तर माझे भाग्यच आहे. तुझ्या प्रेमसहवासापुढे तर त्रिभुवनातील सर्व सुखेही निरर्थकच आहेत. पण त्याहीपलीकडे जीवनातील तुझी आनंदाची वृत्ती पाहिली की मन अगदी थक्क होते. एवढेच नव्हे, तर ती वृत्ती प्राप्त करून घेण्याचा ध्यासच चित्ताच्या ठिकाणी लागून राहतो. तुझ्या आनंदाच्या वृत्तीचे मूळ तुझ्या अंतःकरणातील प्रेमस्वरूप अवस्थेमध्ये आहे हेही मला निश्चितपणे जाणवते. अशी तुझी अंतःकरणाची अवस्था तुझ्या अंतःकरणात ठसलेल्या सद्गुरूंच्या प्रेमस्वरूप मूर्तीमुळे आहे, हे तुझ्या अंतरीचे गुजही तूच कृपावंत होऊन माझ्यासाठी प्रगट केलेस. त्यासाठी मी तुझा जन्मभराचा ऋणी होऊन राहणार आहे. पण त्याचबरोबर मलाही आनंदाच्या प्राप्तीचा मार्ग तू दाखवलास हे माझ्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे आणि आता त्याच मार्गाने जाण्याचा माझा कृतनिश्चय झालेला आहे.

अरे कृष्णा, तुझा प्रेमळ सहवास करून प्रेमसुखाचा अनुभव कितीही घेतला तरी कमीच आहे. परंतु त्यामुळे माझी मनःस्थिती जरी आनंदाची झाली तरी ती तेवढा वेळच असणार हे मात्र नक्की. कारण माझ्या अंतःकरणाची अवस्था काही प्रेमस्वरूप झालेली नाही. त्यामुळे मी जेव्हा परत माझ्या स्वतःच्या घरी जाईन तेव्हा माझी मनःस्थिती बाह्य संसारामुळे पुन्हा बिघडण्याची शक्यताच अधिक आहे. तुझ्या प्रेमाचे केवळ स्मरणच राहणार आणि आनंदाचा अनुभव काही माझ्या अंतःकरणात नसणार, त्यामुळे प्राप्त जीवन आनंदाच्या वृत्तीने जगणे शक्यच होणार नाही. पण म्हणूनच माझी खरी कसोटी ही माझ्या संसारातच लागणार आहे हेही खरेच आहे आणि त्यासाठी मला माझ्या संसारातच राहणे आवश्यक आहे हेही तेवढेच खरे आहे. आपल्या दोघांची बाह्यजीवने वेगवेगळी आहेत आणि ती नेहमीच तशी राहणार आहेत. म्हणून तुझ्या बाह्य जीवनात तुझ्याशी एकरूप होणे मला शक्य नाही आणि तू म्हणतोस त्याप्रमाणे ते आवश्यकही नाही.

कृष्णा, तुझी प्रेमप्रतिमा मात्र निश्चितपणे माझ्या मनात भरलेली आहे आणि तिचाच ध्यास माझ्या चित्तात आता निर्माण झालेला आहे. त्या ध्यासानेच तुझी प्रेमस्वरूप मूर्ती माझ्या अंतःकरणात एक दिवस साकार होईल आणि त्यामुळे



माझे अंतःकरणही प्रेमस्वरूप होऊन राहील अशी माझी पक्की खात्री आहे. बाह्यांगाने तुझा प्रेमसहवास यापुढे जरी घडणार नसला, तरी माझ्या मनाला जडलेला तुझा प्रेमसंग मात्र कायमचाच असेल. त्यात कधीही अंतर पडूच शकणार नाही. त्या तुझ्या प्रेमाने सदैव युक्त होऊन राहण्याचाच ध्यास माझ्याठायी असेल आणि तुझ्या प्रेमाचाच अनुभव अंतरात घेण्याचा माझा अखंड प्रयत्न असेल. त्या प्रयत्नात कधी जरी मी बाह्यांगाने कमी पडलो तरी तुझ्या प्रेमामुळे माझ्या मनाचा उत्साह व जोम मात्र टिकून असेल. माझ्या मनाची तीच अवस्था माझे मन नेहमी मोकळे ठेवील आणि पुन्हा पुन्हा प्रयत्न करायला मला उद्युक्त करीत राहील. त्यामुळेच माझ्या चित्ताच्या ठिकाणचा प्रेमध्यासही कायमचा असेल आणि एक दिवस तुझ्या प्रेमस्वरूप अवस्थेची प्रचिती मलाही माझ्या अंतःकरणात निश्चितपणे येऊन राहील असा माझा पूर्ण आत्मविश्वास आहे.

माझ्या प्रिय कृष्णा, आता मला तुझ्याकडे दुसरे काहीच मागायचे नाही. तुझे प्रेम तर माझ्या मनात नक्कीच भरलेले आहे. त्यात शंकेला जराही वावच नाही. तुझ्या रूपाने प्रगट असलेल्या ईश्वरी अनुभवाचे माहात्म्यही मला पूर्णपणे जाणवत आहे आणि त्याच्याच सत्यत्वाचा निश्चयही माझ्या ठिकाणी झालेला आहे. त्याचा स्वानुभव घेण्याचाच एकीएक ध्यास मला लागला आहे. आता फक्त मला माझ्या घरी माझ्या संसारात परत जाण्याची परवानगी तू मला अत्यंत प्रेमाने द्यावीस एवढीच प्रार्थना मी तुझ्यापाशी करतो. कारण माझे जीवन मलाच समर्थपणाने जगायचे आहे हे माझ्या पूर्णपणे लक्षात आले आहे आणि तसे ते मी जगूही शकेन असा आत्मविश्वास आता माझ्या ठिकाणी निश्चितपणे निर्माण झालेला आहे. माझ्या ठायीच्या ईश्वरी अस्तित्वाचा व सामर्थ्याचा अनुभव मला घ्यायचा आहे. ते ईश्वरी सामर्थ्य आत्मशक्ती व आत्मप्रेम यांच्या संयोगातूनच प्रगट होते हे गुजही मला तुझ्या या थोड्यावेळच्या सहवासात तुझ्याच कृपेने कळले. या तुझ्या कृपेचे मला नित्य स्मरण राहील आणि तेच माझे कायमचे प्रेरणास्थान होऊन राहील. कृष्णा, आता तुझा निरोप घेऊन येथून निघण्याच्याच तयारीने मी आलेलो आहे. तेव्हा कृपा करून मला निघण्याची अनुज्ञा द्यावीस”

असे म्हणून सुदामा आपले दोन्ही हात जोडून कृष्णासमोर उभा राहीला.

सुदाम्याच्या या बोलण्याने रूक्मिणीला निश्चितच नवल वाटले. ‘कालच कृष्णाच्या सहवासात अधिक काळ राहण्यासाठी विनंती करणारा सुदामा आज अचानक असा घरी जाण्यासाठी परवानगी कसा काय मागतो आहे? एवढे एका रात्रीत असे काय विशेष घडले बरे, की ज्यामुळे या सुदाम्याचा विचार असा

एकदम बदलला' या विचाराने रूक्मिणी चकित झाली नसती तरच नवल होते. रूक्मिणीने सहेतुक नजरेने कृष्णाकडे पाहिले तर कृष्णाच्या नेत्रातील सुदाम्याविषयीचा कौतुकाचा व समाधानाचा भाव तिच्या लक्षात आला. तेव्हा तिने लगेचच व निश्चितपणे ओळखले की हा सर्व कृष्णाच्या कालच्या रात्रीच्या बोलण्याचाच परिणाम सुदाम्यावर झालेला आहे. म्हणून रूक्मिणीही आता कृष्णाची प्रत्यक्ष प्रतिक्रिया काय होते हे पाहण्यासाठी आतुर होऊन राहिली.


कृष्णानेही सुस्मित मुद्रेने सुदाम्याचे दोन्ही हात आपल्या हातात अत्यंत प्रेमाने घेतले आणि त्याला प्रेमाचे दृढालिंगन दिले. कृष्णाच्या सर्वांगीण प्रेमळ स्पर्शाने सुदाम्याचे सर्वांगच रोमांचित झाले आणि त्याला खऱ्या अर्थाने कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. कृष्णापासून स्वतःला किंचितसे अलग करीत कृष्णाच्या मुखाकडे अपेक्षित नजरेने पाहणाऱ्या सुदाम्याला उद्देशून कृष्ण एवढेच म्हणाला,

“अरे सुदाम्या, तुझे म्हणणे अगदी यथार्थच आहे. तुझ्या ठिकाणच्या मनन चिंतनातून तुझी जी ही भूमिका तयार झालेली आहे ती अत्यंत योग्यच आहे आणि तीच तुला स्वानुभवाच्या अवस्थेकडे नेणारी आहे. एवढे दिवस मी तुझ्या ठिकाणी स्मरणात होतो, तुझ्या व्यवधानात होतो आणि तुझ्या ध्यासातही होतो. पण आता मी तुझ्या हृदयात आहे असाच अनुभव तुला येईल आणि हृदय हेच तर ईश्वराच्या अस्तित्वाचा अनुभव घेण्याचे मूळ स्थान आहे. ईश्वराचे प्रेम अनुभवण्याचे तेच स्थान आहे आणि प्रेम उचंबळून आल्यावर येणाऱ्या आनंदाचा अनुभव घेण्याचेही हृदय हेच स्थान आहे. तेव्हा आता मी केवळ तुझ्या पाठीशीच आहे असे नाही, तर मी तुझ्या ठायीच तुझ्या हृदयात नित्य तुझ्या संगे आहे. त्याचाच सदैव अनुभव घे म्हणजे आनंदाची सहजस्थिती तुला सहजपणे प्राप्त होईल ”

असे म्हणत कृष्णाने रूक्मिणीकडे सहेतुक नजरेने पाहिले. त्यातील खूण रूक्मिणीच्या लगेचच लक्षात आली आणि ती ताबडतोब आतल्या दालनात निघून गेली.

थोड्याच वेळात रूक्मिणी जेव्हा परत आली तेव्हा तिच्या बरोबर तिच्या दासीही हातामध्ये रेशमी वस्त्रांनी झाकलेली सुवर्णाची ताटे घेऊन आल्या. रूक्मिणीने ती सर्व ताटे सुदाम्याच्या समोर ठेवली आणि नम्रतापूर्वक म्हणाली,

“अहो सुदामदेवा, तुम्ही कृष्णाचे गुरूबंधू आहात त्याहीपेक्षा त्याचे परममित्र आहात. तुमच्या उभयतांतील स्नेहाचे व प्रेमाचे जे मला दर्शन घडले त्यामुळे मी तर अगदी भारावून गेले आहे. मी तुम्हाला खरेच सांगते की आज कितीतरी दिवसांनी मी कृष्णाला एवढया मोकळेपणाने बोलताना व वागताना



पाहिले. बऱ्याच दिवसांनी कृष्णाला त्याचे अंतःकरण मोकळे करण्याची संधी तुमच्यामुळे मिळाली आणि त्या संधीचा कृष्णाने अगदी पूर्णपणे उपयोग करून घेतला. त्या दृष्टीने तुमचे येथे आणखी काही दिवस राहणे घडले असते तर अधिक बरे झाले असते. कारण त्याचा केवढातरी आनंद कृष्णाला व मलाही झाला असता. पण ज्याअर्थी तुम्ही आता घरी परत जाण्याचा निर्णय घेतला आहात, तर तो योग्यच असणार आणि मुख्य म्हणजे त्याला कृष्णाचीही संमती दिसत आहे. मग माझ्या अनुमतीचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. पण आता माझी तुम्हाला एकच विनंती आहे. माझ्या व कृष्णाच्या वतीने तुमच्यासाठी व तुमच्या कुटुंबियांसाठी ही प्रेमाची अल्पशी भेट देत आहोत त्याचा स्वीकार करावा."

असे म्हणून रूक्मिणीने ती सोन्याची ताटे सुदाम्यापुढे सरकवली. थोड्याशा उत्सुकतेने सुदाम्याने त्या ताटांवरची रेशमी वस्त्रे बाजूला केली मात्र, तो अत्यंत चकितच झाला. एका ताटामध्ये अनेक रेशमी भरजरी वस्त्रे होती, तर एका ताटामध्ये सुवर्णाची व चांदीची अनेक गृहोपयोगी भांडी ठेवलेली होती. एक ताट तर सुवर्णालंकारांनी पूर्णपणे भरलेले होते. दुसऱ्या ताटामध्ये फळफळावळ व मेवामिठाई ठेवलेली होती. सुदाम्याने क्षणभरच त्या सर्व ताटांकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि ती सर्व ताटे त्या रेशमी वस्त्रांनी पुन्हा झाकून ठेवली. सुदाम्याने कृष्णाकडे वळून पाहिले तर कृष्ण सुस्मित मुखाने सुदाम्याकडे पाहत होता. सुदाम्याने पुन्हा एकदा विनम्र भावाने दोन्ही हात जोडून कृष्णाला वंदन केले आणि रूक्मिणीला उद्देशून बोलू लागला,


" अहो रूक्मिणीदेवी, तुम्ही अत्यंत प्रेमाने मला केवढातरी अहेर देऊ करीत आहात. त्यामागील तुमचे माझ्यावरील प्रेमच प्रगट होत आहे हे मी जाणून आहे. तुमच्या प्रेमाचा अव्हेर करणे मला कधीच शक्य होणार नाही. परंतु ते प्रेम ज्या रूपात साकार होत आहे त्याचा स्वीकार करणे मात्र मला जमणार नाही. कारण मला ते योग्य वाटत नाही. या बाह्य ऐश्वर्याच्या सुखाची माझ्या ठिकाणी जराही आसक्ती राहिलेली नाही आणि माझ्या कुटुंबियांनाही त्याचा लाभ करून द्यावा असेही आता मला अजिबात वाटत नाही. परमेश्वराच्या नियतीत स्वप्रयत्नाने व प्रारब्धानुसार जेवढे काही धन मला मिळेल त्यातच माझा व माझ्या कुटुंबियांचा चरितार्थ चालवणे हेच माझे कर्तव्यकर्म आहे. त्यातच आम्हाला सुखाने व समाधानाने रहायचे आहे. प्राप्त परिस्थितीत आनंदाने जीवन जगता येणे यातच खरा पराक्रम आहे. ईश्वराच्या भक्तीचा आनंद अनुभवण्यासाठी संसार हेही एक साधनच आहे. आनंदाचा अनुभव हाच खरा महत्वाचा!

रूक्मिणीदेवी, कृष्णाच्या कृपेने मला कृष्णाच्या प्रेमाचे अमाप धन मिळालेले आहे आणि त्या प्रेमधनाचा उपयोग करूनच कृष्णाच्या भक्तीचे वैभव

मला प्राप्त होईल हे निश्चित! तेच भक्तीचे वैभव मी माझ्या कुटुंबियांनाही उपलब्ध करून देईन. तेच माझे कुटुंबियांसाठीचे खरे कर्तव्यकर्म आहे आणि त्यामुळेच मला माझ्या कर्तव्यपूर्तीचे खरे समाधान लाभणार आहे. खरे तर, संसारात प्रयत्न करून काही सुख मिळवावे असे मला व्यक्तिशः केव्हाच वाटले नाही. परंतु मुलाबाळांकडे पाहिल्यावर मात्र त्यांच्या सुखासाठी तरी काही प्रयत्न करावेत असे माझ्या मनात पूर्वी वारंवार येत असे. परंतु आता माझा निश्चयच झाला आहे की माझ्या कुटुंबियांना त्यांच्या प्रारब्धानुसार जे काही सुखभोग मिळणार आहेत ते त्यांना मिळतीलच. परंतु हे ईश्वरी प्रेमाचे धन जे मला भाग्याने लाभलेले आहे ते माझ्या कुटुंबियांसाठी कमीतकमी उपलब्ध तरी करून ठेवणे, हेच माझे खरे व आद्य कर्तव्यकर्म आहे. त्यातून मग जर त्यांना त्या ईश्वरीप्रेमाची गोडी लागली तर ईश्वराच्या भक्तीमार्गाकडे ते आपसूकच व सहजतेने वळतीलच. पण त्यांना ईश्वरीप्रेमाचा अनुभव देण्याचा जो माझा धर्म आहे त्याला मात्र मी निश्चितच जागेन. कारण त्या धर्मानेच आता यापुढचे माझे जीवन जगणे होत राहणार आहे आणि म्हणूनच ते आनंदाचेही होणार आहे.

अहो रूक्मिणीदेवी, तुमच्याकडे माझी आता एकच विनंती आहे की तुम्ही मला तुमच्या व या कृष्णाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून जरूर काही तरी भेट द्या, पण ती अशी द्या की ज्यामुळे मला कृष्णप्रेमाच्या गोडीची आठवण कायमची राहील. ती काय व कोणत्या रूपात द्यावी हे तुम्हाला सांगण्याची काहीच आवश्यकता नाही हे मला ठाऊक आहे. कारण माझा कृष्णाविषयी असलेला भाव तुम्ही स्वानुभवाने निश्चितच जाणून आहात आणि त्याहीपेक्षा कृष्णाच्या अंतःकरणालाही माझ्यापेक्षा तुम्हीच जास्त योग्य प्रकारे जाणत आहात. तेव्हा कृष्णाच्या अंतःकरणाला संतुष्ट करणारा व माझ्याही मनाला तोष देणारा असा काहीतरी मार्ग तुम्हीच शोधून काढा आणि मला प्रेमाची सुंदर व आनंददायी भेट द्या. ती भेट अगदी प्रेमपूर्वक व आनंदाने स्वीकारीन अशी खात्री मी तुम्हा उभयतांना देतो."

सुदाम्याचे बोलणे ऐकून कृष्णाच्या मुखावर अत्यंत प्रसन्नतेचे भाव उमटून आले, तर रूक्मिणीचे मुख सुदाम्याच्या कौतुकभावाने पूर्णपणे भरून राहिले. कृष्णाने सहेतुक नजरेने रूक्मिणीकडे पाहून सुस्मित केले असता रूक्मिणीने कृष्णाची प्रेमखूण ओळखली आणि ती लगेच महालाच्या आतल्या दालनात निघून गेली. रूक्मिणी जेवढ्या त्वरेने गेली होती तेवढ्याच त्वरेने पुन्हा परतही आली. त्यावेळेस तिच्या हातात एका पांढऱ्या शुभ्र व अत्यंत स्वच्छ अशा रूमालात बांधलेले एक मडके होते. रूक्मिणीने ते अत्यंत प्रेमाने सुदाम्याच्या हातात दिले आणि ते उघडून बघण्याची खूण हाताच्या इशाऱ्याने सुदाम्याला केली. सुदाम्याने ते



मडके तर लगेचच ओळखले. त्यातूनच तर त्याने कृष्णासाठी प्रेमभेट म्हणून स्वतः हाताने तयार केलेले दहीपोहे आणलेले होते. पण त्या मडक्यात आता काय असेल बरे? असे कुतूहल सुदाम्याच्या मनात निर्माण झाले आणि तो कृष्णाकडे पाहू लागला. कृष्णाच्या नजरेतही तेव्हा तेवढीच उत्सुकता सुदाम्याला दिसली. नवल वाटून सुदाम्याने त्या मडक्यावरील झाकण दूर केले, तर त्यात भरून ठेवलेले दहीपोहे त्याच्या दृष्टोत्पत्तीस आले. सुदाम्याचा चेहरा प्रेम व हर्ष या दोन्ही भावांनी फुलून आला आणि त्याचे नेत्रही पाणावले. सुदामा एकदा रूक्मिणीकडे तर एकदा कृष्णाकडे असा पाहतच राहिला. काय व कसे बोलावे हे त्याला मुळीच सुचेना. त्याची ही भावनिर्भर अवस्था पाहून रूक्मिणीनेच त्याच्याशी बोलावयास सुरूवात केली.

“ अहो सुदामदेवा, तुम्हाला योग्य अशी प्रेमभेट मिळाली ना? तुम्हाला ती आवडली ना? त्यातील कृष्णप्रेमाचा भाव तर नक्कीच तुम्हाला जाणवला असणार. कारण त्या कृष्णप्रेमाला तुमच्याशिवाय दुसरे कोण ओळखू शकेल बरे? याच मडक्यातून तुम्ही कृष्णासाठी अत्यंत प्रेमाने स्वादिष्ट व रूचकर असे दहीपोहे आणले होतेत. तुमच्या लक्षात आहे ना? तेच तुम्ही आणलेले हे मडके आहे. परंतु त्यातील दहीपोहे मात्र मी स्वतः माझ्या हाताने तयार केलेले आहेत. तुम्ही ज्या कृष्णप्रेमाने तेव्हा दहीपोहे आणले होतेत, त्याच कृष्णप्रेमाने आज मीही हे दहीपोहे बनवले आहेत. पण दोन्ही दहीपोह्यांना असलेली कृष्णप्रेमाची गोडी मात्र एकच आहे. कारण आपल्या उभयतांच्या ठिकाणी असलेले कृष्णप्रेमही एकच आहे आणि कृष्णप्रेमाची गोडी तर सदैव एकीएकच आहे. मग ते कुठल्याही पदार्थात घाला. त्या कृष्णप्रेमाच्या गोडीचा गुण त्या ठिकाणी प्रगट होणारच. मूळ पदार्थाचे वेगळेपण कायम ठेवूनही त्या पदार्थाला अधिक रूचकर व स्वादिष्ट बनवण्याचा या कृष्णप्रेमाचा गुण खरोखरीच अलौकिक आहे.


अहो, पदार्थालाच काय सामान्य जीवालाही अत्यंत गोड करून त्याचे सर्व जीवनच अत्यंत रोचक व मधुर बनवण्याचे ईश्वरी सामर्थ्य या कृष्णप्रेमात आहे. तोच तर या कृष्णप्रेमाचा गुणधर्म आहे. कुठल्याही स्थितीत व परिस्थितीत हे कृष्णप्रेम त्याच्या गुणधर्मानेच प्रगट असते आणि जेथे प्रगट होते तेथे आपला गुण निर्माण करतेच करते. हेच तर या कृष्णप्रेमाचे वैशिष्ट्य आहे. मी तरी या कृष्णप्रेमाच्या गुणधर्माचा अगदी पुरेपूर अनुभव घेतलेला आहे.”

रूक्मिणीचे बोलणे ऐकून सुदामा तर अधिकच भावपूर्ण झाला. रूक्मिणीच्या हातातील दहीपोह्याचे मडके घेताना तर त्याला आणखीनच भरून येत होते. पाणावलेल्या नेत्रांनी कृष्णाकडे पाहत सुदामा म्हणाला,

"अरे कृष्णा, रूक्मिणीदेवींनी दिलेली ही प्रेमाची भेट म्हणजे तर माझ्यासाठी हा तुझा प्रसादच आहे. यापेक्षा अधिक सुंदर व सुयोग्य भेट दुसरी कोणतीही असणे शक्यच नाही. बघ ना! एका मलिन व जीर्ण फडक्यात बांधलेल्या मडक्यातून मी प्रेमाने तुझ्यासाठी दहीपोहे आणले होते. तूही त्याचा अत्यंत प्रेमाने स्वीकार व सेवन करून रसास्वाद घेतलास. जणू काही दहीपोहे नव्हेत तर माझे प्रेमच तू सेवन केलेस आणि केवळ गोड मानून नव्हे, तर गोड करून घेतलेस. आता रूक्मिणीदेवींनी तुझ्या प्रेमाने केलेले दहीपोहे पुन्हा मी आणलेल्या मडक्यातूनच मला दिले आणि माझे फडके स्वच्छ धुवून त्यात पुन्हा ते मडके बांधले. म्हणजे मडके माझेच आणि फडकेही माझेच! पण त्यातील दहीपोहे मात्र तुझ्याच प्रेमाने दिलेल्या रूक्मिणीदेवींचे. मी आणलेले दहीपोहे हे तुझ्यासाठी नैवेद्य म्हणून आणले होते आणि आता हे दहीपोहे मी तुझ्या प्रेमाचा कृपाप्रसाद म्हणून घेऊन जात आहे. त्यातील प्रेमरसाचे सेवन करून मी स्वतः तर आनंदाचा अनुभव घेईनच, परंतु माझ्या कुटुंबियांनाही त्या प्रेमरसाचा स्वाद चाखायला निश्चितपणे देईन.

कृष्णा, आता काही मागणेच उरलेले नाही. पण एकच शेवटचे सांगणे आहे. तुझ्यावरील प्रेमभक्तिभावामुळे माझ्या सर्व जीवनाचेच सोने होऊन राहिले आहे आणि माझा देह हीच एक सुवर्णनगरी झालेली आहे. या सुवर्णनगरीत माझ्या हृदयसिंहासनावर तू कायमचाच अधिष्ठित होऊन बसलेला आहेस. त्यामुळे या सुवर्णनगरीत यापुढे सदैव तुझ्याच प्रेमाचा जागर व तुझ्याच नामाचा गजर होत राहील आणि त्या प्रेमभक्तीच्या राज्यामध्ये मी आनंदाने तुझ्यासह नित्य नांदत राहीन. आता तर मी केवळ तुझाच आहे आणि तुझ्यासाठीच आहे. त्यामुळे यापुढील माझे सर्व जीवनही केवळ तुझ्यासाठीच जगणे तर होईलच, परंतु देहत्यागानंतरही ही सुदामरूपी इवलीशी लहर कृष्णरूपी सागरात अगदी सहजपणे विलीन होईल याची मला पूर्णपणे खात्री आहे. कारण कृष्णा, मुळात ही लहर तुझ्याच अंतःकरणातून निर्माण झालेली आहे. तेव्हा ती तुझ्याच अंतःकरणात विलीन होणार हे तर निश्चितच आहे."

सुदाम्याचे बोलणे थांबले तरी त्याच्या ठिकाणची भावपूर्णता मात्र कायमच होती. त्याच भावपूर्ण अवस्थेत सुदाम्याने रूक्मिणीने दिलेल्या दहीपोह्याच्या मडक्यातील थोडे दहीपोहे आपल्या हाताने काढले आणि कृष्णाच्या जवळ जाऊन त्याच्या मुखात भरवले. सुदाम्याच्या प्रेमभावाने तृप्त झालेल्या कृष्णानेही तेवढ्याच उत्स्फूर्तपणे त्या मडक्यातून थोडे दहीपोहे आपल्या हाताने काढले आणि त्याचा घास सुदाम्याच्या मुखात भरवला. त्या प्रेमरसाच्या स्वादात बुडालेल्या सुदाम्याला तर क्षणभर समाधीचाच अनुभव आला. मग रूक्मिणीही स्वस्थ बसूच शकली नाही. तिनेही त्या मडक्यातील थोडे दहीपोहे आपल्या हातात



घेतले आणि थोडेसे कृष्णाला भरवले. त्यातील उरलेले दहीपोहे कृष्णाने आपल्या हातात घेऊन तेवढ्याच प्रेमाने रूक्मिणीला भरवले. सर्व वातावरणच एकीएक प्रेमरसाने भरून व भारून राहिले. मग रूक्मिणीने लगेचच ते दहीपोह्याचे मडके त्याच फडक्यात पुन्हा व्यवस्थित बांधले आणि सुदाम्याकडे सूपूर्द केले.

सुदाम्याने कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवले असता कृष्णाने तर सुदाम्याला प्रेमाने दृढालिंगनच दिले. सुदाम्याने रूक्मिणीलाही वाकून नमस्कार केला असता रूक्मिणीनेही आपले दोन्ही हात जोडून त्याचा स्वीकार केला. सुदाम्यासह रूक्मिणीचेही नेत्र पाणावले होते यात काहीच नवल नाही. परंतु कृष्णाच्या नेत्रातूनही त्याच्या नकळत प्रेमधारा वाहू लागल्या होत्या. सुदाम्याने कृष्णाची ही भावपूर्ण मूर्ती पुन्हा एकदा डोळे भरून पाहिली आणि आपल्या हृदयात साठवून ठेवली. पुढच्याच क्षणाला सुदामा कृष्णाच्या महालातून बाहेर पडला, राजवाड्यातूनही बाहेर पडला, द्वारकानगरीतूनही बाहेर पडला आणि आपल्या घराच्या दिशेने मंद पण निश्चयात्मक पावले टाकीत चालू लागला. त्याच्या पाठमोऱ्या मूर्तीकडे कृष्ण व रूक्मिणी भावपूर्ण दृष्टीने पाहत कितीतरी वेळ तेथेच स्तब्धपणे उभे राहिले होते.”

*****


नारदाचे प्रदीर्घ काळ चाललेले बोलणे थांबले तरी नाद अजूनही वातावरणात भरून राहिलेत असे लक्ष्मीला जाणवत होते. भारलेले वातावरण व प्रेमभावाने भरलेले मन अशा स्थितीत व अवस्थेत लक्ष्मीही भावपूर्णच झालेली होती. नारदही आपले नेत्र मिटून शांतपणे स्वस्थच बसून राहिलेला होता. पण ती थोडावेळची नीरव शांतता व स्तब्धताही लक्ष्मीच्या मनाला मानवेना आणि सहनही होईना. नारदाचे अंतःकरण शब्दरूपाने प्रगट होणे लक्ष्मीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे व आवश्यकही होते. कारण त्याशिवाय लक्ष्मीच्या श्रवणभक्तीची पूर्तता होणे शक्य होणार नव्हते. तिचीच भावपूर्ण अवस्था शब्दांच्या माध्यमाने प्रगट होऊ लागली आणि शब्दांनाही मग साकार होणे भागच पडू लागले,

“हे नारदा, सुदाम्याची कथा सांगण्याच्या निमित्ताने सगुण प्रेमभक्तीचे माहात्म्य तू पुन्हा एकदा कळसावर नेऊन ठेवलेस. त्यामुळे कृष्णाच्या माहात्म्याचे आणखीन एक वेगळे अंग एका आगळया व आकर्षक रंगाने प्रगट झाले. हेच तर ईश्वराच्या सगुण प्रेमाचे व भक्तीचे वैशिष्ट्य आहे हे माझ्या पूर्णपणे लक्षात आले आहे. कारण प्रेम म्हटले म्हणजे ते मुळात एकांगी असूच शकत नाही. म्हणूनच तर अनेक वेगवेगळया अंगांनी या प्रेमाचा अनुभव घेऊनही त्या प्रेमाचे रूपांतर एकाच

भक्तीभावात होऊ शकते आणि ईश्वरी अनुभवाशी ऐक्य पावता येते. सुदाम्याच्या रूपाने सगुण प्रेमभक्तीमार्गातील हाच मूलभूत सिद्धांत पुन्हा एकदा प्रकर्षाने सिद्ध झाला आणि त्याचाच मला अतिशय आनंद झाला. परंतु या सगुण प्रेमाची अनेक अंगे व रंग प्रगट होऊ शकले ते मात्र केवळ कृष्णाच्या अंतरंगातील प्रेमस्वरूप अवस्थेमुळेच, हे मात्र सत्य आहे, होय ना? कारण प्रेमस्वरूप अवस्थेच्या ठायीच प्रेमाची विविध अंगे व रंग संभवतात आणि त्याद्वारे ती प्रेमस्वरूप अवस्था काहीशी प्रगट होऊ शकते. पण जी काही अवस्था प्रगट होते ती जाणकाराला त्या अवस्थेची खूण पटवणारी व संकेत दर्शवणारी असते. मग त्या खुणेच्या आधाराने भक्तीमार्गाची वाटचाल करून ईश्वरी ऐक्याचा आनंददायी अनुभव घेण्याचा प्रयत्न मात्र ज्याचा त्याचाच आहे. एवढेच नव्हे, तर तो जीवनातील एक केवढातरी मोठा पराक्रमच आहे.

असा पराक्रम सुदाम्याकडून निश्चितपणे घडला असणार याची मला पूर्ण खात्री आहे. कारण कृष्णाची सगुण प्रेममूर्ती सुदाम्याच्या अंतःकरणात पूर्णपणे ठसलेली होतीच आणि आता तर त्याच्याठायी कृष्णाच्या प्रेमस्वरूप अवस्थेचा ध्यासही लागलेलाच होता. त्यामुळे त्या अखंड ध्यासाने स्वानुभवाच्या प्रेमस्वरूप अवस्थेकडे सुदाम्याने हळूहळू पण निश्चितपणे वाटचाल केलीच असणार आणि सुदामा त्या अवस्थेच्या बाह्य लक्षणांनीही युक्त होत राहिला असणारच. संसाराची अनासक्ती असूनही सुदामा आपल्या कुटुंबियांशी अत्यंत प्रेमाने वागत असणार आणि त्यांना त्यांचे जीवन निदान सुसह्य होण्यासाठी तरी निश्चितच सहाय्यभूत झाला असणार. प्रेमामुळे सुदाम्याच्या मनाठायी मोकळेपणा व मुख्य म्हणजे रसिकता निश्चितच आली असणार. त्यामुळेच सुदाम्याकडून कुटुंबियांचे योग्य कौतुक घडून त्यांच्या प्रेमाचाही अनुभव निश्चितच घेतला गेला असणार. कारण ही तर मन ईश्वरी प्रेमाने युक्त झाले असल्याचीच सुलक्षणे आहेत आणि ती सर्व सुदाम्याच्या ठायी अगदी सहजपणे असणारच अशी माझ्या ठायी अगदी निश्चिती आहे.

हे नारदा, पण सुदाम्याची कथा ऐकताना त्यामध्ये जो रूक्मिणीचा उल्लेख वारंवार येत होता तो ऐकून तिच्याविषयीची माझी उत्सुकता मात्र कमालीची वाढून राहिलेली आहे. कारण तुझ्या सांगण्यातून व त्याहीपेक्षा कृष्णाच्या बोलण्यातून जे काही रूक्मिणीविषयी प्रगट होत होते, त्यावरून एक गोष्ट अगदी स्पष्टपणे दिसत होती की रूक्मिणी ही कृष्णाशी ऐक्य पावलेलीच होती आणि त्याचेच मला राहून राहून अत्यंत नवल वाटत आहे. कृष्णाने तर सुदाम्याशी बोलताना रूक्मिणीचा उल्लेख 'माझी आत्मसखी' असाच केला होता. माझ्यासाठी तेवढे सूत्रच अतिशय महत्त्वाचे व मोलाचे आहे. कारण कृष्णाकडून त्याच्या स्वानुभवातून ते अगदी सहजपणे व उत्स्फूर्तपणे प्रगट झालेले आहे.



कृष्णाच्या अंतःकरणात तो रूक्मिणीचे त्याच्याशी असलेले ऐक्य अनुभवत होता हे तर अगदी उघड आहे. पण रूक्मिणी तिच्या ठिकाणी तिचे कृष्णाशी असलेले ऐक्य कशी अनुभवत होती आणि मुळात रूक्मिणी कृष्णाशी ऐक्य पावली कशी, हे सर्व जाणून घेण्याची माझी आतुरता अगदी पराकोटीची वाढलेली आहे. माझ्या मनाची तर ती अत्यंत जरूरीच होऊन राहिलेली आहे. माझ्या दृष्टीने तर हा विषय विशेष महत्त्वाचा आहे. कारण रूक्मिणीचे कृष्णाशी असलेले नाते मुळात पत्नीचे, म्हणजे अत्यंत नाजूक व म्हणूनच जरा कठीणच! ते नाते आड येऊ न देता रूक्मिणी कृष्णाशी कशी ऐक्य पावली हे जाणून घेणे माझ्यासाठी तर अत्यंत आवश्यकच आहे. कारण माझेही असेच पत्नीचे नाते या नारायणाशी आहे आणि काही काही वेळेला ते माझ्या व नारायणाच्या आड येते हे माझ्या लक्षात येते. मग माझी गाडीच थोडावेळ अडून राहिल्यासारखी होते आणि त्यातून काय व कसा मार्ग काढावा हे मला तर सुचेनासेच होते. तेव्हा रूक्मिणीचा अनुभव मला नक्कीच उपयोगाला येईल याची मला अगदी खात्री आहे. तेव्हा नारदा, या रूक्मिणीच्या कृष्णाशी ऐक्य पावण्याचे रहस्य मला लवकरात लवकर उलगडून सविस्तरपणे सांग बरे! माझी तुला तशी प्रेमाची प्रार्थनाच आहे. आता अजिबात वेळ लावू नकोस.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदाला अत्यंत संतोष वाटला आणि समाधानही झाले. याची जणू पावती म्हणूनच की काय नारदाच्या वाणीचा ओघ पुन्हा वाहू लागला,

“हे लक्ष्मी, तुझे खरोखरीच अत्यंत कौतुकच मला वाटते. कारण श्रवणभक्तीचा अनुभव तू खऱ्या अर्थाने घेत आहेस. श्रवण केलेल्या सुदाम्याच्या कथेतून तू त्यातील नेमका भावार्थ जाणलास आणि त्यामध्ये असलेले सगुणप्रेमभक्तीचे नेमके सूत्र तू ओळखलेस. सुदाम्याने त्याच्या कुटुंबात प्रेमाने राहूनच कृष्णाच्या प्रेमस्वरूप अवस्थेचा ध्यास कसा घेतला असणार आणि त्या ध्यासानेच सुदाम्याचा भक्तिभाव वाढत जाऊन त्याने कृष्णाशी ऐक्य कसे साधले असणार, हे तू अगदी योग्य प्रकारे जाणलेस. त्यामुळे एक मात्र बरे झाले, की आता सुदाम्याच्या पुढील जीवनाविषयी तुला काही सांगण्याची आवश्यकता मला राहिली नाही. त्याचीच परिणती म्हणजे कृष्णाच्या पुढील जीवनातील मुख्य प्रवाहाबरोबरच आता आपल्याला पुढे पुढे जाता येईल.

हे लक्ष्मी, त्याहीपेक्षा मला विशेष आनंद या गोष्टीचा झाला की कृष्णाच्या जीवनातील रूक्मिणीचे विशेष स्थान व महत्त्व तुझ्या लक्षात आले. त्यामुळेच ‘रूक्मिणी’ हा तुझ्यासाठी एक खास कौतुकाचा विषय होऊन राहिला आहे. अर्थात तेही साहजिकच आहे म्हणा. पण मला काही त्याचे तेवढेसे नवल वाटत

नाही. कारण रूक्मिणीसंबंधातील एक विशेष रहस्याची गोष्ट मला माहीत आहे, जी तुला ठाऊक नाही. त्यात तुझी काहीच चूक नाही. कारण ती गोष्ट मी तुला अजूनपर्यंत मुद्दामच सांगितलेली नाही.

अगं लक्ष्मी, त्या रूक्मिणीच्या रूपाने तूच तर भूतलावर जन्म घेतला होतास. या नारायणाची सहधर्मचारिणी म्हणून त्यानेच त्याच्या कृष्णावताराच त्याची अर्धांगिनी होण्याचा आग्रह तुझ्याकडे, तुझ्यावरील प्रेमाने धरला होता आणि तूही तुझा तो बहुमान समजून मोठ्या आनंदाने नारायणाचा प्रेमळ आग्रह स्वीकारलाही होतास. परंतु हे सर्व त्यानंतर तुझ्याठिकाणी निर्माण झालेल्या विस्मरणाने बाधित झालेले आहे. म्हणूनच त्यातील काहीही तुला आता आठवत नाही. परंतु त्यावेळी रुक्मिणीठायी असलेला भक्तिभाव आता तुझ्याठायी पुन्हा जागृत झालेला आहे आणि म्हणूनच तुझ्या ठिकाणी रूक्मिणीविषयीच्या आपलेपणाच्या भावातून, तिच्याविषयी एक विशेष प्रकारची ओढ निर्माण झालेली आहे. त्या भावाची पूर्ती करण्यामध्ये मलाही निश्चितच आनंद लाभणार आहे.”

नारदाच्या बोलण्याने आश्चर्यचकित झालेली लक्ष्मी क्षणभर स्तब्धच झाली, पण क्षणभरच! कारण तिच्या ठिकाणी निर्माण झालेली अस्वस्थता तिला स्वस्थ बसू द्यायला तयारच नव्हती आणि तीच अस्वस्थता तिला बोलायला भाग पाडू लागली. साहजिकच तिच्या बोलण्यात वेग व आवेग या दोन्हीचा संयोग होत होता.

“ अरे नारदा, तुझ्या बोलण्याने मला तर सुखद का होईना, पण एक अनपेक्षित असा धक्काच बसला आहे. खरे तर, कृष्णचरित्र ऐकत असतानाच माझ्या मनात हा विचार वारंवार येत असे, की त्या चरित्रामध्ये माझा काही सहभाग होता की नाही? या नारायणाच्या स्वभावानुसार त्याने भूतलावर जाताना मला व या शेषालाही निश्चितच स्वतःच्या बरोबर घेतले असणार. पण आम्ही तेथे केव्हा गेलो व कसे गेलो ते आम्हा उभयतांच्याही अजिबात लक्षात राहिलेले नाही आणि त्यात काहीच नवल नाही. कारण खुद्द नारायणालाही त्याविषयी काहीही आठवत नाही. ते सर्व आम्हाला केवळ तुझ्याकडूनच ऐकायला मिळते व कळतेही. आताही तुझ्याच मुखातून हा माझ्याविषयीचा उल्लेख आणि तोही बोलण्याच्या ओघातच आला. त्यातही कृष्णचरित्रात मी त्याची पत्नी रूक्मिणी म्हणूनच स्थान घेतले होते, हे ऐकून तर माझ्या आनंदाला पारावारच राहिलेला नाही. रूक्मिणीविषयी माझ्या ठायी एवढी ओढ व आपलेपणा का होता याचे कोडे आता मला उलगडले.

पण हे नारदा, केवळ तेवढ्यानेच माझे समाधान झालेले नाही. कारण रूक्मिणीच्या ठिकाणी असलेला कृष्णाविषयीचा एवढा भक्तिभाव कसा व केव्हा

निर्माण झाला आणि मुख्य म्हणजे त्या भावाची पूर्ती रूक्मिणी कशी करून घेत असे, हे सर्व समजून व जाणून घेणे माझ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण तरच मलाही रूक्मिणीपासून काहीतरी प्रेरणा घेऊन, आता माझ्या भावाची पूर्ती करण्याचा मार्ग निश्चितपणे सापडेल याची मला अगदी खात्री आहे.

हे नारदा, रूक्मिणीचा कृष्णाशी कसा संबंध आला, त्यांचा विवाह कसा झाला आणि मुख्य म्हणजे तिने कृष्णाचे मन कसे जिंकले, की ज्याच्यामुळे कृष्णाने तिला वरले हे सर्व सविस्तरपणे ऐकण्याची माझी आतुरता तर आता अतिशय वाढून राहिलेली आहे. मला नक्कीच ठाऊक आहे, की हा शेषही कृष्णचरित्रातील त्याच्या सहभागाविषयी ऐकण्यासाठी अतिशय उत्सुक झालेला असणारच. तेव्हा आमच्या दोघांच्याही या सहज भावाची पूर्ती आता तूच अगदी लवकरात लवकर कर बघू. पण त्यासाठी आधी तू कोणाचा क्रमांक लावणार आहेस? माझा की या शेषाचा?”

शेवटचे वाक्य उच्चारीत असताना लक्ष्मी थोड्याशा मिश्कीलपणेच हसत होती आणि त्यामध्ये शेषही हसून सामील झाला. नारदानेही मग हसून त्यांना साथ दिली आणि तो बोलू लागला,


“ अगं लक्ष्मी, तू तर माझ्यापुढे एक पेचप्रसंगच निर्माण केला आहेस. तुमच्यामध्ये आधी कोणाचा क्रमांक लावायचा हा एक मोठा प्रश्नच आहे. अर्थात मी कोणाचाही क्रमांक आधी लावला तरी त्यामुळे तुमच्यापैकी कोणीही नाराज होणार नाही याची मला पूर्ण खात्री आहे. कारण तुमच्या या नारायणावरील प्रेमामुळे तुमच्यामध्ये आपापसांतही एक प्रकारचा आपलेपणा व मनाचा मोकळेपणा आहे आणि तेच तर तुमच्या नारायणप्रेमाचे लक्षण आहे.

पण लक्ष्मी, मला असे अगदी मनापासून वाटत आहे की या शेषाचाच क्रमांक आधी लावणे आवश्यक आहे. कारण कितीतरी वेळ हा शेष आपल्या दोघांचा संवाद मध्येमध्ये काहीही न बोलता शांतपणे श्रवण करीत आहे. त्याचा होणारा आनंद त्याच्या मुखावरून आपल्याला अगदी स्पष्टपणे दिसतो आहे खरा, परंतु त्याला होणारा आनंद कसा व किती आहे, हे मात्र त्याच्या काहीच न बोलण्यामुळे आपल्याला समजू शकत नाही. तेव्हा आता थोडा वेळ आपण प्रत्यक्ष शेषाशीच व तेही त्याच्याविषयीच बोलूया आणि त्यालाही बोलते करूया. म्हणजे त्यालाही जरा मोकळे व बरे वाटेल आणि आपल्यालाही बरे वाटेल. कारण शेष आपल्याशी स्वतःहून काहीच बोलणार नाही. हेच तर शेषाचे विशेष आहे. होय की नाही, शेषा?”

नारदाच्या या बोलण्यावरही शेषाने काहीही न बोलता फक्त हसून आपली मान संमतीदर्शक हलवली. नारदाच्या बोलण्याची व त्यावरील शेषाच्या प्रतिक्रियेची लक्ष्मीला मात्र फार मौज वाटली आणि तिने मोकळेपणाने हसून दाद दिली. पण तरीही नारद व लक्ष्मी हे दोघेही शेषाच्या बोलण्याची वाट पाहत स्वस्थच बसून राहिले. शेषही नारदाच्या बोलण्याची वाट पाहत स्वस्थ बसून राहिला होता. त्यामुळे थोडा वेळ कोणीच बोलत नव्हते. शेवटी शेषाच्या लक्षात आले की तो बोलल्याशिवाय आता नारद पुढे काहीच बोलणार नाही. तेव्हा मात्र शेषाला बोलणे भागच पडले आणि किंचित हसून त्याने बोलावयास सुरूवात केली,

“ अहो नारदऋषी, परमभाग्याने मला या नारायणाच्या सगुण चरित्रांचे श्रवण करण्याची संधी लाभली आहे आणि तीही तुमच्या मुखातून प्रगटणाऱ्या भक्तिगायनामुळे, हे खरेच आहे. त्या श्रवणामध्ये माझे मन पूर्णपणे दंग झालेले असते. अनेक वेळा श्रवण करताना माझी बुद्धी तर अगदी गुंगच होऊन राहते. पण त्यातूनही तुमचा व या लक्ष्मीमातेचा जेव्हा जेव्हा संवाद होतो आणि त्या सगुणचरित्रातील रहस्य उलगडले जाते, तेव्हा मात्र माझे मन नारायणाच्या सगुण प्रेमाने रंगूनच राहते. विशेषतः कृष्णप्रेमाच्या व कृष्णभक्तीच्या कथा ऐकताना व त्यातील गुज जाणताना होणारा आनंद हा केवळ आगळा वेगळाच नाही, तर तो आनंद अत्यंत श्रेष्ठ आहे असे निश्चितपणे जाणवते आणि त्याची थोरवीही माझ्या लक्षात येते. त्या कृष्णचरित्रात माझाही सहभाग होता हे जे तुम्ही मला सांगत आहात, त्यामुळे त्याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता माझ्याठिकाणी निश्चितच आहे. खरे तर, कृष्णचरित्रातील त्या माझ्या सहभागापेक्षा या नारायणाचा प्रत्यक्ष घडणारा आत्ताचा सहवास मला अधिक महत्त्वाचा वाटतो. कारण कृष्णचरित्र हा एक अभूतपूर्व, पण घडून गेलेला इतिहास आहे, तर या वैकुंठातील नारायणाचे अस्तित्व ही खरी व प्रत्यक्ष वस्तुस्थिती आहे. खरे ना?

अहो नारदऋषी, परंतु वस्तुस्थिती अशी आहे, की प्रत्यक्ष सहवास घडूनही आम्ही या नारायणाचे व्यक्तिगत प्रेमही अनुभवू शकत नाही किंवा त्याचे माहात्म्यही यथार्थतेने जाणू शकत नाही. त्याचे व्यक्तिगत प्रेम आम्हाला उपलब्ध असूनही मिळत नाही आणि म्हणून त्याचे महत्त्व कळत नाही. परंतु या नारायणाचे कृष्णावतारातील समग्र चरित्र ऐकताना त्याच्या अंतःकरणाची व्यापकता मात्र निश्चितच जाणवते आणि त्याचे माहात्म्य जाणण्यासाठी ते कारणीभूत व साहाय्यभूतही होते. त्याच जाणिवेने जर आमच्याकडून या नारायणाच्या सहवासात राहणे घडले, तरच आमच्याकडून त्याची काहीतरी भक्ती घडणे शक्य आहे हे आम्ही जाणून आहोत. म्हणूनच या नारायणाचे माहात्म्य यथार्थतेने प्रगट



करणारे त्याचे सगुणचरित्र, जे तुम्ही अत्यंत प्रेमाने वर्णन करून सांगत आहात, ते श्रवण करण्याची मिळालेली ही संधी म्हणजे आम्हासाठी एक अमृतयोगच आहे.

तेव्हा कृष्णचरित्रात माझाही सहभाग होता हे ऐकून मला काही जास्त नवल वाटले नाही. कारण या नारायणाचा तो स्वभावच आहे. त्याचा आमच्यावरती एवढा प्रेमलोभ आहे की त्याला आमच्याशिवाय जणू चैनच पडत नाही. अर्थात आम्हीसुद्धा त्याच्या सहवासाला अत्यंत लाचावलेले आहोतच आणि आम्हीही या नारायणाशिवाय बेचैनच असतो हे अगदी खरेच आहे. आमची ही अवस्था नारायण जाणत असल्यामुळेच तो आम्हाला सदैव त्याच्या संगे ठेवून त्याचा अंगसंग करण्याची अमूल्य संधी उपलब्ध करून देतो. त्यामुळेच नारायणाची नित्य सेवा करण्याच्या माझ्या भावाचीही मला पूर्ती करता येते.

तेव्हा कृष्णचरित्रातील माझा सहभाग काय होता आणि माझ्याकडून कृष्णाने कशी सेवा करून घेतली हे जाणून घेण्याची उत्सुकता माझ्याही ठिकाणी निश्चितच आहे. परंतु त्याहीपेक्षा कृष्णाचे व्यापक चरित्र समजून घेण्याची आतुरता माझ्याठिकाणी जास्त आहे. कारण त्यामुळेच मला कृष्णाचे व्यापक अंतःकरण व माहात्म्य तर जाणता येईलच, पण मुख्य म्हणजे माझ्याकडून जी काही थोडीफार सेवा घडली असेल त्याच्या अहंकाराला वावच राहणार नाही. कृष्णचरित्रातील माझा सहभाग हा त्यातील केवळ एक लहानसा भागच असणार हे मी ओळखून आहेच. पण तरीही या सर्वाचे श्रवण प्रत्यक्ष तुमच्या मुखातूनच करण्याची संधी मला मिळत आहे हे तर माझे केवढेतरी भाग्यच आहे. कारण या नारायणाचे अंतःकरण व माझ्यासारख्या भक्तांच्या मनातील भाव यांना जोडणारा असा एकमेव दुवा तुम्हीच आहात. कारण या दोहोंचे ऐक्य तुमच्या ठिकाणी तुम्ही नित्य अनुभवीत असता हे मी जाणून आहे.

तेव्हा नारदमहर्षी, आता जराही विलंब न करता कृष्णाच्या चरित्रात मी सहभागी किती होतो आणि त्याहीपेक्षा समरस किती होतो हे सांगण्याचे करावे. त्यासाठी आवश्यक वाटणारी क्रमवारी तुमची तुम्हीच ठरवावी. कारण तुमच्याकडून ते उत्स्फूर्तपणे व सहजपणे घडेल याची मला पूर्ण खात्री आहे.”

शेषाचे बोलणे ऐकून झालेले समाधान नारदाने हसून व्यक्त केले आणि साभिप्राय नजरेने लक्ष्मीकडे पाहिले. लक्ष्मीनेही नारदाला स्मितहास्यपूर्वक प्रतिसाद दिला असता नारदानेही मग बोलावयास सुरूवात केली,


“हे शेषा, तुझे बोलणे अगदी सयुक्तिक असेच आहे. या नारायणाच्या सगुणचरित्रात सहभागी होण्याची जी संधी आपल्याला मिळते ती केवळ त्याच्या आपल्यावरील प्रेमामुळे हे खरेच आहे. परंतु त्याच्या सगुणचरित्रात आपण समरस

होऊ शकतो ते मात्र फक्त त्याच्यावरील आपल्या प्रेमामुळेच होय. नारायणाच्याविषयीचे प्रेम जसे जसे आपल्या अंगाअंगात मुरत जाते तशी तशी आपल्यालाही नारायणाच्या सगुणरूपातील अधिकाधिक अंगे दिसू लागतात, जाणवू लागतात आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे आवडू लागतात. सगुण प्रेमरसाने भरलेले आपले मनच आपल्याला नारायणाशी समरस करून ठेवते. तेथूनच तर नारायणाशी एकरूप होण्याच्या अनुभवाला सुरूवात होते आणि एके दिवशी, एके क्षणी आपलेही अंतःकरण नारायणाच्या प्रेमाने भरून वाहत राहते. सगुण प्रेमभक्तिभावाने साधलेला हा ऐक्यत्वाचा स्वानुभव हा सर्वश्रेष्ठच आहे हे सत्यच आहे. असो.

हे शेषा, तुझ्या नित्याच्या सेवाभावाने संतुष्ट असलेल्या नारायणाने त्याच्या रामावतारातही त्याचा लहान बंधू 'लक्ष्मण' म्हणून तुला त्याच्यासंगे नेले होते. एवढेच नव्हे, तर जणू काही तुझ्या सेवाभावाला संधी मिळावी म्हणूनच की काय, तुला सतत त्याच्या सहवासातही ठेवले होते आणि तूही तुझ्या उत्कट सेवाभावाने रामाला संतुष्ट केले होतेस. रामही तुला त्याच्या अंतःकरणाच्या अत्यंत जवळ पाहत असे आणि तसा अनुभवही तो नित्य घेत असे. शेषा, भाग्यवशात तुला रामाचे माहात्म्यही कळले आणि त्याच्या अवताराचे रहस्यही तू जाणलेस. त्यामुळेच रामाशी एकरूप झाल्याचा अनुभव तू रामाच्या प्रत्यक्ष जीवनचरित्रातच घेऊ शकलास आणि शेवटी तर तुझ्या रामावरील प्रेमभक्तिभावाची परिसीमाच झाली. केवळ रामाचे वचन खरे करण्यासाठी तू आनंदाने देहत्याग केलास आणि रामाच्या अंतःकरणात पूर्णपणे सामावला जाऊन एकरूप होऊन राहिलास.

हे शेषा, परंतु कृष्णावतारात मात्र या नारायणाने एक गंमतच केली आणि त्यामुळे त्याची आणखीन एक नवलीलाच प्रगट झाली. नारायणाने प्रत्यक्ष कृष्णावतार घेण्याआधीच तुला भूतलावर पाठवले आणि बलरामाच्या रूपाने तुला जन्म घ्यावयास लावला. त्यामुळे कृष्णाचा ज्येष्ठ बंधू ही भूमिका करणे तुला भागच पडले. या निमित्ताने रामावतारात रामाचा कनिष्ठ बंधू म्हणून जे काही तुला करावयास लागले असेल, त्याची भरपाईच नारायणाने जणू काही कृष्णावतारात केली असेच तुला एखादेवेळेस वाटेल. कारण ज्येष्ठ बंधू असल्यामुळे बलरामाने कृष्णाची काही सेवा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता, तर कृष्णानेच बलरामाची सेवा करणे कृष्णाकडून अपेक्षित होते. कृष्णही त्याच्या स्वभावानुसार त्याच्या कर्तव्यकर्माला अगदी सहजपणे जागत होता आणि बलरामाचा योग्य आदर करून त्याच्या ज्येष्ठत्वाचा मानही राखीत होता.

बलरामाचा स्वभाव हा कृष्णाच्या स्वभावापेक्षा अगदी वेगळा होता. नेहमीच शांत व गंभीर असणारा बलराम कृष्णाचे माहात्म्य अगदी त्याच्या लहानपणापासून जाणून होता. कृष्णाची आत्मशक्ती व परोपकारी वृत्ती याची पूर्ण



जाणीव बलरामाच्या ठिकाणी पहिल्यापासूनच होती. त्यामुळे बलराम जरी ज्येष्ठ असला तरी कृष्णच श्रेष्ठ आहे हे बलरामाने पूर्णपणे लक्षात ठेवले होते. परंतु कृष्णाच्या सद्हेतूविषयी पूर्ण खात्री असूनही कृष्णाची कार्यपद्धती ही बलरामाला नेहमीच मानवत असे वा मान्य होतच असे, असे मात्र नाही. पण वेळप्रसंगी बाह्य साधनापेक्षा साध्याला नेहमीच महत्त्व व अग्रक्रम देण्याची कृष्णाची वृत्ती असल्यामुळे, कृष्ण त्याचेच म्हणणे व करणे त्याच्या पद्धतीनुसार शेवटी खरे करीत असे. बलरामाला त्याचा त्या त्या वेळी त्रासही होत असे आणि म्हणून कृष्णाचा बाह्यांगाने रागही येत असे. बलरामाकडून त्याचा कृष्णावरील राग काहीवेळा व्यक्तही होत असे. परंतु बलराम शांतही लगेचच होत असे आणि कृष्णाचे भरभरून कौतुकही करीत असे. अशा तऱ्हेने भावा-भावामधील प्रेमभावाचीच नेहमी मात होत असे आणि सद्भावाचाच सदा विजय होत असे. कृष्णाच्या वागण्या-बोलण्यामुळे जर कधी अडचणीचा प्रसंग निर्माण झाला तर मात्र बलराम सर्व शक्तीनिशी कृष्णाच्या मदतीला धावून जात असे आणि त्याच्याच पाठीशी उभा राहत असे. असा हा बलरामाचा आगळा वेगळा असणारा स्वभाव व भाव कृष्णच ओळखून होता आणि त्याचा खरा आनंदही कृष्णच अनुभवत होता.

तेव्हा शेषा, कृष्णावतारात कृष्णाला आनंदाचा अनुभव देण्यासाठी तू निश्चितच कारणीभूत झालास. मग त्याचे जास्त कारण तुझ्या भावापेक्षा कृष्णाचा स्वभाव हे जरी असले, तरी तुझ्या स्वभावाने व भावाने तू कृष्णाला सहाय्यभूत झालास हे मात्र निश्चितच आणि सहाय्यभूत होणे हीसुद्धा एक प्रकारची सेवाच आहे. त्या अर्थाने तुझ्याकडून कृष्णावतारात कृष्णाची सेवा घडली हे खरेच आहे. परंतु कृष्णाची व्यापक अनुभव घेण्याची वृत्ती व परी हे तुझ्या स्वभावानुसार तुला न मानवल्यामुळे तू बाह्यांगाने कृष्णाच्या जवळ असूनही त्याच्या अंतःकरणापासून तसा थोडासा दूरच राहिलास. त्यामुळे कृष्णाशी ऐक्य पावल्याचा आनंद तुला अनुभवता आला नाही ही वस्तुस्थिती आहे."


नारदाचे बोलणे ऐकता ऐकता गंभीर होत राहिलेला शेष नारदाचे बोलणे थांबले तेव्हा बाह्यांगाने स्वस्थच बसलेला दिसत होता, तरी त्याचे मन मात्र अस्वस्थच होते. थोड्यावेळाने काहीशा हळुवार व काहीशा अस्पष्ट आवाजात जणू काही स्वतः स्वतःशीच बोलल्यासारखे शेष बोलू लागला,

"हे नारद महर्षे, तीच तर माझी मुख्य अडचण आहे आणि ती माझ्याठायी मूलभूतच आहे. माझ्या मनामध्ये एक प्रकारचा संकुचितपणा आहे हे खरेच आहे. त्यामुळे एखादी गोष्ट अनेक अंगाने घडू लागली की माझ्या मनाच्या एकांगी स्वभावाला ते मानवत नाही. कोणत्याही प्रसंगात व गोष्टीत जास्त खोलवर जाण्याची माझ्या मनाला सवयच नाही. त्याचे मनावर एक प्रकारचे दडपण येऊन

मनात थोडीशी भीतीच निर्माण होते. मनामध्ये मोकळेपणा नाही म्हणून मन व्यापक होत नाही आणि ते व्यापकतेचा अनुभव घेऊ शकत नाही. हे जेवढे खरे आहे तेवढेच हेही खरे आहे की व्यापकतेचा अनुभव मन घेत नाही, म्हणून मग मन व्यापकही होऊ शकत नाही. नारायणाचे अंतःकरण अत्यंत सखोल व व्यापक आहे हे मी जाणून आहे. परंतु नारायणाकडून त्याच्या स्वभावानुसार येथे या वैकुंठात त्याचे अंतःकरण प्रगटच होत नसल्यामुळे त्याचा अनुभव घेण्याची आम्हाला कधी संधीच मिळत नाही. संधी नाही म्हणून अनुभव नाही आणि अनुभव नाही म्हणून अवस्था नाही, अशी आमची मोठी विचित्र स्थिती होऊन राहिलेली आहे. यातून बाहेर येण्याचा मार्ग फक्त तुमच्यापाशीच आहे. नव्हे, तुमच्या रूपानेच तर आमच्यासाठी तो मार्ग आहे. वैकुंठात होणाऱ्या तुमच्या आगमनामुळेच आम्हाला आमचा मार्ग मिळण्याची काहीतरी शक्यता आहे.

हे नारद महर्षे, या नारायणाच्या सगुणलीला व व्यापक चरित्र भूतलावरतीच प्रगट होते हे खरेच आहे. त्या वेळेस आमच्या अत्यंत भाग्याने व या नारायणाच्या कृपेने जरी आम्हाला त्या चरित्रात सहभागी होण्याची संधी मिळाली, तरी त्या चरित्राचे व्यापकत्व जाणणे मात्र निदान मला तरी शक्य होत नाही. मग त्या चरित्रातील नारायणाचे सखोल असे अंतःकरण जाणवणे हे तर माझ्यासाठी तरी फारच दूर राहिले. पण तुम्ही आमच्यावरती कृपावंत होऊन नारायणाच्या त्या सगुण चरित्रांचे गायन, नारायणावरील आत्यंतिक प्रेमाने व त्याच्या माहात्म्याच्या पूर्ण जाणिवेने करता, तेव्हा मात्र या नारायणाच्या चरित्राकडे आणि त्याद्वारे त्याच्या अंतःकरणाकडे पाहण्याची थोडी थोडी दृष्टी हळूहळू येऊ लागते. त्यामुळेच नारायणाविषयीच्या प्रेमाचे रूपांतर भक्तिभावात होऊ लागते आणि आनंदाच्या अनुभवाची सुरूवातही होते. अर्थात, आनंदाचा अनुभव पूर्णपणे घेणे ही अवस्था व त्या दिशेने होणारी मनाची वाटचाल हा सर्व पुढचा व अत्यंत महत्त्वाचा भाग शिल्लक राहतोच. त्याचीही मला निश्चितच जाणीव आहे. पण म्हणूनच त्यासाठी तुमच्या मुखातून या नारायणाची सगुणचरित्रे श्रवण करणे हे माझ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्या चरित्रातील केवळ माझा सहभाग किती व कसा होता हे समजून घेण्याबरोबरच, ते चरित्र सर्वांगाने कसे प्रगटले ते श्रवण करणे माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तेव्हा त्याचेच समग्र वर्णन तुम्ही आमच्यासाठी प्रगट करावे अशी मी तुम्हाला अगदी मनःपूर्वक प्रार्थना करतो."

शेषाच्या योग्य भावाच्या यथार्थ बोलण्याने नारदाला अत्यंत संतोष झाला आणि तो त्याच्या मुखावरील स्मितहास्याने व्यक्तही झाला. नारदाने लक्ष्मीकडे पाहिले असता तिच्या मुखावरील श्रवणोत्सुक भाव त्याच्याही लक्षात आला आणि जणू काही त्या भावाची प्रतिक्रिया म्हणूनच की काय, नारदाच्या मुखातून अगदी सहजपणे शब्दांचा प्रवाह वाहू लागला,



“हे शेषा, तुझ्या मानसिक अवस्थेचे प्रगटीकरण तुझ्याकडून अगदी योग्य प्रकारे व योग्य शब्दांद्वारे घडलेले आहे. पण मला तुला एकच महत्त्वाची गोष्ट प्रामुख्याने सांगायची आहे, की जशी तुझ्या ठिकाणच्या कमतरतेची जाण तुला आहे तशीच तुझ्याठायीच्या गुणवत्तेची जाणीवही तू जागृत ठेव. म्हणजे मग तुझे मन निराशेकडे अजिबात झुकणारच नाही आणि त्या मनातील जोम, जोश व उत्साह कायम राहून मनाला पुढील वाटचालीला अखंड प्रेरणा मिळत राहील.

अरे शेषा, याबाबत तू या लक्ष्मीचाच आदर्श समोर ठेव ना! पूर्वी तिच्याही ठिकाणी तिला एक प्रकारची कमतरता जाणवत असे. कारण तिच्याठायीचे न्यून तिला ठाऊक होते. बाह्यांगाने या नारायणाच्या अत्यंत जवळ असूनही आपण त्याच्या अंतःकरणापासून मात्र दूरच आहोत हे लक्ष्मीला अनुभवाने कळलेले हेते. त्यामुळेच तिच्या ठिकाणी एक प्रकारचा दुरावाच निर्माण झालेला होता. त्याचेच रूपांतर थोड्याशा नैराश्यतेतही झाले होते. परंतु नारायणाच्या सगुण अवतारचरित्र कथा श्रवण करता करता लक्ष्मीने स्वतःच्या मनाला सावरले. नारायणाच्या सगुण प्रेमाने सदैव युक्तच होऊन राहण्याचा निश्चय लक्ष्मीने केला आणि त्या प्रेमामुळे तिच्या मनाने पुन्हा उभारी घेतली. लक्ष्मीने नारायणाचे माहात्म्य अंतःकरणात पूर्णपणे व कायमचे ठसवून घेतले आणि मनातील दुराव्याला तिने प्रयत्नपूर्वक दूर केले. त्यामुळेच लक्ष्मीला नारायणाच्या सगुण भक्तीच्या आनंदाचा अनुभव येण्यास सुरूवात झाली आणि आता तर तिला तो आनंद अनुभवण्याचा एकीएक ध्यासच लागलेला असून, तोच छंदही तिच्याठायी जडलेला आहे. तेव्हा आता कृष्णावतारातील रूक्मिणीच्या रूपाने असलेल्या अशा लक्ष्मीचीच कथा आपण ऐकू या.”


असे म्हणून नारदाने लक्ष्मीकडे व शेषाकडे साभिप्राय नजरेने पाहिले. उभयतांनी मंदस्मित करीत आपली संमती दर्शवली मात्र, नारदाचा वचनौघ पुन्हा वेगाने वाहू लागला.

*****

## रुक्मिणीची कृष्णप्रीती

“हे लक्ष्मी, कुंडीनपुरचा राजा भीष्मक व त्याची पत्नी शुद्धमती यांची कन्या म्हणून रूक्मिणीचा जन्म झाला. भीष्मक हा स्वतः अत्यंत नीतिमान व सदाचारी होता. सदैव प्रजाहितदक्ष असलेल्या भीष्मकाच्या ठायी आपल्या प्रजाजनांच्या सुखाची व स्वास्थ्याची नित्य काळजी असे. प्रजेच्या कल्याणाचे निर्णय घेण्यासाठी व त्यांची कार्यवाही करण्यासाठी भीष्मक नेहमीच सावध व तत्पर असे. स्वतःच्या व्यक्तिगत जीवनातही धर्माचरण, व्रतवैकल्ये व यज्ञयागादी पुण्यकर्मे यांचे पालन भीष्मकाकडून अत्यंत निष्ठापूर्वक होत असे. यामध्ये त्याच्या पत्नीचे, शुद्धमतीचे त्याला पूर्ण सहकार्य प्रत्यक्ष कृतीने होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भीष्मक हा कृष्णाचे मोठेपण व थोरवी जाणून होता. चारित्र्यवान व नीतिवान राजांना एकत्र आणून त्यांचा एक संघ निर्माण करण्याच्या कृष्णाच्या प्रयत्नांचे भीष्मकाला केवळ कौतुकच नव्हते, तर त्याचा कृष्णाला सक्रिय पाठिंबाही होता. त्यामुळे भीष्मकाच्या मुखातून कृष्णाचा उल्लेख वारंवार व अगदी सहजपणाने येत असे.

अशा पुण्यशील व सत्शील मातापित्यांच्या पोटी जन्म घेण्याचे जणू भाग्यच रूक्मिणीला लाभले होते. अगदी लहानपणापासूनच रूक्मिणीच्या मनावर सुसंस्कार सहजपणे होत राहिले. व्रतवैकल्यादी धार्मिक कृत्यांतील घडलेला सहभाग व पित्याकडून घडणाऱ्या यज्ञयागादी कर्मांचे प्रत्यक्ष अवलोकन रूक्मिणीला लहान वयातच करता आले. त्या निमित्ताने अनेक ऋषीमुनींचे आगमन भीष्मकाच्या राजवाड्यात होत असे. त्यावेळेस त्या ऋषीमुनींचे पूजन व आदरसत्कार भीष्मकाकडून होत असताना रूक्मिणीही आपल्या मातापित्यांना साहाय्य करीत असे. अनेक थोर ऋषीमुनींची सेवा करण्याची संधीही रूक्मिणीला मिळत असे आणि तीही अगदी मनःपूर्वक व श्रद्धेने त्या सर्वांची सेवा करून त्यांच्या आशीर्वादांना पात्र होत असे. एवढ्या लहान वयातील रूक्मिणीची समज व नम्रतेचे वागणे बोलणे पाहून सर्वांनाच संतोष होई आणि त्यांना रूक्मिणीचे अत्यंत कौतुकही वाटत असे. रूक्मिणीकडे पाहून तिच्या मातापित्यांनाही अतिशय समाधान होई आणि त्यांचे अंतःकरण रूक्मिणीच्या प्रेमाने भरूनच येई. रूक्मिणी तिच्या स्वभावामुळे व गुणांमुळे साहजिकच तिच्या मातापित्यांची अत्यंत लाडकी झालेली होती. त्यातूनही ती पित्याची अधिक आवडती होती आणि तिलाही तिच्या पित्याचा म्हणजे भीष्मकाचा लळा जास्त होता. त्यामुळे रूक्मिणी नेहमीच भीष्मकाबरोबरच असे आणि भीष्मकाच्या सहवासात सर्व गोष्टींचे श्रवण व अवलोकन अगदी सूक्ष्मपणे करीत असे.



हे लक्ष्मी, रूक्मिणीच्या जीवनाच्या दृष्टीने आणखीन एक महत्त्वाची गोष्ट घडत होती. भीष्मकाला भेटायला येणाऱ्या अनेकांच्या बोलण्यात बऱ्याचदा कृष्णासंबंधी काहीनाकाहीतरी विषय हा येतच असे. कृष्णाचे पूर्वचरित्र व त्याच्याकडून घडलेले अनेक दैवीसदृश पराक्रम यांच्या उल्लेखाबरोबरच, मथुरेत आल्यापासूनच्या कृष्णाच्या जीवनासंबंधीही अनेक जण बोलत असत. हे सर्व ऐकण्याची संधी व भाग्य रूक्मिणीला लाभले होते आणि तीही त्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेत असे. साहजिकच रूक्मिणीच्या मनात कृष्णाविषयीचे एक विशेष आकर्षण निर्माण झालेले होते. एवढेच नव्हे, तर कृष्णाच्या रूपाविषयीचे व गुणांविषयीचे वर्णन अनेकांच्या मुखातून ऐकता ऐकता रूक्मिणीच्या ठायी कृष्णाविषयी प्रीतीभावच निर्माण झालेला होता. कृष्णाच्या थोरवीचा तर तिच्याठिकाणी आधीच निश्चय झालेला होता. अशा तऱ्हेने रूक्मिणीने तिच्या मनात अगदी खोलवर असे प्रेमाचे अग्रस्थान कृष्णाला दिले होते आणि त्यातूनच प्रत्यक्ष जीवनातही कृष्णालाच एकमेव स्थान द्यावे असा ध्यासच रूक्मिणीच्याठायी जडून राहिलेला होता. तिच्या ध्यानी मनी केवळ कृष्ण आणि कृष्णच होता.

हे लक्ष्मी, ज्यावेळेस रूक्मिणी उपवर झाली तेव्हा साहजिकच तिच्या विवाहाविषयीचे विचार तिच्या मातापित्यांच्या मनात येऊ लागले आणि तसे त्यांनी रूक्मिणीला बोलूनही दाखविले. त्यावर रूक्मिणी त्यांना लागलीच पण एवढेच म्हणाली की 'माझ्या मनाला पसंत पडेल व भावेल अशा व्यक्तीलाच मी वरेन आणि पती म्हणून त्याचा स्वीकार करेन.' रूक्मिणीच्या बोलण्याने चकित झालेल्या व थोड्याशा बावरलेल्या तिच्या मातेने रूक्मिणीला अत्यंत काळजीच्या स्वरात म्हटले,

"अगं मुली, आपणा स्त्रियांना असा पती निवडीचा हक्क असतोच कुठे? तसा तर तो नसतोच मुळी. आपले मातापिता हेच आपले खरे हित जाणतात याची खात्री बाळगून, त्यांनीच आपल्यासाठी पसंत केलेल्या वराला आपण वरायचे हेच आपल्या स्त्रियांच्या दृष्टीने योग्य असते. हे मी तुला माझ्या स्वानुभवाने सांगत आहे. त्यावर विश्वास ठेव आणि वरसंशोधनाची सर्व जबाबदारी आमच्यावर सोपवून तू मोकळी हो बघू!"

रूक्मिणीने तिच्या मातेचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेतले खरे, पण तिचा निश्चय मात्र जराही हलला नाही, तर तो कायमच राहिला आणि तिने तो तसा बोलूनही दाखवला. त्यामुळे रूक्मिणीची माता मात्र सचिंत झाली आणि तिच्या पतीकडे पाहू लागली. पण भीष्मकाच्या मुखावर मात्र रूक्मिणीच्या


कौतुकाचाच भाव पसरून राहिला होता. त्याला रूक्मिणीची स्वतंत्र वृत्ती व बाणा पाहून आनंदच झाला. रूक्मिणीकडे हसून पाहत भीष्मक तिच्याशी बोलू लागला,

"अगं रूक्मिणी, आमचा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. आत्तापर्यंत तुझ्यावर जे संस्कार झाले त्या संस्कारांना अनुरूप अशीच तुझी निवड असेल याचीही आम्हाला पूर्ण खात्री आहे. परंतु तरीही त्यासंबंधी तू आमच्याशीही विचारविनिमय करावास असे मला अगदी मनापासून वाटत आहे. तसा आमचा तुझ्यावर थोडाफार हक्क आहेच ना! अर्थात हा हक्क केवळ मातापिता या नात्याचा नसून तो हक्क प्रेमाचा आहे एवढे मात्र लक्षात ठेव आणि तुझ्या मनात निश्चित काय आहे ते आम्हाला अगदी मोकळेपणाने सांग बघू. पण पती वरण्यासंबंधीचा तुझाच निर्णय अंतिम असेल याची मी तुला खात्री देतो."

पिता भीष्मकाची वचने ऐकताना रूक्मिणीला त्या वचनातील प्रेमळता आणि त्याहीपेक्षा पित्याच्या ठिकाणी तिच्याविषयीचा असलेला विश्वास व खात्री अधिक जाणवली. साहजिकच रूक्मिणीचे मन पित्याविषयीच्या प्रेमादराने भरून आले आणि तिचे मन अत्यंत मोकळेपणाने ती प्रगट करू लागली,

"अहो तात, हा तुमचा माझ्यावरील विश्वास हेच माझे बलस्थान आहे. या तुमच्या विश्वासाला पात्र होण्याच्या प्रयत्नातच माझा आत्मविश्वास वाढत असतो आणि माझ्या मनाला तो सबळ करीत राहतो. तुम्ही व माझी माता या उभयतांनी माझ्यावर केलेले संस्कार आणि एरव्ही तुमच्या सहवासात नित्य राहिल्यामुळे माझ्या मनाची होत असलेली जडणघडण, यांच्या परिणतीतूनच माझी एक निश्चित भूमिका तयार झालेली आहे. त्याप्रमाणेच पुढील जीवन जगण्याचा माझा अगदी निश्चयच झालेला आहे. आता मातापिता व नंतर पुढे पतीची व मुलांची सेवा करणे हे जरी आम्हा स्त्रियांसाठीचे प्रथम कर्तव्यकर्म असले तरी तेच आमचे अंतिम कर्तव्य आहे असे नाही, हे माझ्या पूर्णपणे लक्षात आलेले आहे. एक मनुष्य म्हणून 'ईश्वराची सेवा व भक्ती करणे' हे माझ्यासाठीही अत्यंत आवश्यकच आहे. तोच माझा खरा धर्म आहे आणि त्यानेच माझ्या मानवजन्माची सार्थकता होणार आहे हे सत्य मला पूर्णपणे आकलन झालेले आहे.

हे तात, माझ्या या भूमिकेने जीवन जगण्याचे पूर्ण स्वातंत्र्य तुम्ही मला द्याल याची मला पक्की खात्री आहे. परंतु माझ्या पुढील जीवनात माझ्या भूमिकेनुसार जीवन जगण्यासाठी, मला मनःपूर्वक साथ देणारा साथीदारच मला हवा आहे. त्यालाच 'मी पती म्हणून वरेन' असाच माझा निश्चय होऊन राहिलेला आहे. त्या दृष्टीनेच मी नेहमी विचार करीत असते आणि असा विचार करतानाच



मला जाणवले की माझ्यासाठी कृष्ण हाच एकीएक योग्य असा वर आहे. पती म्हणून मी केवळ त्यालाच वरू शकते आणि पत्नीचे नाते फक्त त्याच्याशीच जोडू शकते.

त्या कृष्णाविषयी मी तुमच्या व तुमच्या भेटीला येणाऱ्या अनेक ऋषीमुनींच्या मुखातून, त्याच्या रूपाचे, गुणांचे, पराक्रमाचे आणि विशेषतः त्याच्या थोरवीचे वर्णन ऐकलेले आहे. त्याचीच परिणती म्हणजे माझ्या मनात कृष्णाविषयी अत्यंत आदराचा व पूज्यतेचा भावच निर्माण झालेला आहे. कोणासाठी जर माझे तन, मन झिजवायचे असेल आणि कोणासाठी जर माझे सर्व आयुष्य वेचायचे असेल तर ते फक्त कृष्णासाठीच, अशी माझ्या मनाची अगदी निश्चित धारणा झालेली आहे. तोच माझा ध्यास झालेला आहे आणि कशाही प्रकारे त्या ध्यासाची पूर्ती करायचीच असा माझा दृढ निश्चय आहे. पण तात, त्यासाठी मला तुम्हा उभयतांच्या प्रेमळ आशीर्वादाची आणि पूर्ण सक्रिय सहकार्याची नितांत आवश्यकता आहे. एकमेव तुमचाच भरवसा मी धरून आहे आणि तो भरवसा अगदी योग्य आहे असा माझा अत्यंत दृढ विश्वास आहे."

रूक्मिणीच्या बोलण्याने भीष्मकाला अत्यंत संतोष झाला आणि तो त्याच्या मुखावरती अगदी स्पष्टपणे दिसतही होता. परंतु शुद्धमतीच्या मुखावरील काळजीच्या भावाची थोडीशी छटा अजूनही कायमच होती. ती भीष्मकाच्याही लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. तिच्या मनाची ती अस्वस्थता ओळखून भीष्मकाने बोलण्यास सुरूवात केली,


"अगं शुद्धमती, तू कसलीही व कोणत्याही प्रकारची काळजी करूच नकोस. आपली कन्या ही इतर सर्वसाधारण मुलींसारखी सामान्य विचारांची मुलगी नाही, हे तर आपण तिच्या अगदी लहानपणापासूनच पाहत आलेलो आहोत. आपण तिच्यावर जे संस्कार केले आणि पहिल्यापासून तिला जे विचारस्वातंत्र्य दिले त्याचाच हा परिपाक आहे. विचाराने स्वतंत्र असूनही आपली रूक्मिणी आपण केलेल्या संस्कारांशी एकनिष्ठ आहे हे खरेच कौतुकास्पद नाही का? स्त्रीजीवनाच्या मर्यादा तर रूक्मिणी जाणून आहेच पण त्याचबरोबर मानवीजन्माचे महत्त्वही रूक्मिणीच्या लक्षात आलेले आहे. म्हणूनच तिचे पुढील आयुष्य तिने कशाप्रकारे जगावे यासंबंधीची तिची काही निश्चित विचारसरणी झालेली आहे आणि ती सर्वार्थाने योग्यच आहे. त्यासाठी रूक्मिणीने आपल्या सहाय्याची जी अपेक्षा ठेवलेली आहे तीही अगदी रास्तच आहे. तिने तिच्या मातापित्यांचा भरवसा नाही धरायचा तर दुसऱ्या कोणाचा धरायचा बरे?

हे शुद्धमती, दुसरी गोष्ट म्हणजे रूक्मिणीने पती म्हणून कृष्णालाच वरायचा जो निश्चय केलेला आहे तो तर अगदी केवळ योग्यच नव्हे तर सरसही आहे. कारण सांप्रतकाळी कृष्णासारखा सर्व कलागुणसंपन्न, पराक्रमी योद्धा, कुशल राजकारणी आणि अत्यंत सुंदर व्यक्तिमत्व असलेला पुरूष संपूर्ण भारतवर्षात नाही हे तर खरेच आहे. पण त्याहीपेक्षा सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाने सर्व सत्त्वशील व सदाचारी राजांची एकजूट साधून त्यांचा एक संघ बांधण्याच्या कार्याला स्वतःला जुंपून घेतलेले आहे. कृष्णाने त्याच्या जीवनाचे तेच ध्येय ठरवलेले आहे आणि कुठल्याही परिस्थितीत व कोणत्याही प्रकाराने ते ध्येय गाठायचेच, हा तर त्या कृष्णाचा अगदी ठाम निश्चयच झालेला आहे. माझ्या दृष्टीने कृष्णाचे हे नियोजित कार्य अत्यंत अमोलिक असेच आहे आणि त्यातून प्रगट होणारे कृष्णाचे कर्तृत्व व कार्यपटुत्व तर अगदी वाखाणण्यासारखेच आहे.

हे शुद्धमती, तेव्हा सर्वांगानी विचार केला असता रूक्मिणीने पती म्हणून कृष्णाची केलेली निवड ही अत्यंत उत्कृष्टच आहे यात जराही शंका नाही. आता कृष्ण हा आपल्या रूक्मिणीला पसंत करील की नाही असाच व एवढाच प्रश्न जर तुझ्याठायी असेल तर माझ्या मनात अगदी पक्की खात्री आहे, की आपल्या अत्यंत सुंदर, सुशील, सुस्वभावी व सुसंस्कारित रूक्मिणीला कृष्ण अगदी नक्की पसंत करील आणि पत्नी म्हणून तिचा मनःपूर्वक व अत्यंत आनंदाने स्वीकार करील. आपली कन्या आहेच मुळी तशी सुलक्षणी! यात जराही शंकाच नाही आणि दुमतही नाही. कृष्ण व रूक्मिणी यांची जोडी ही नक्कीच एकमेकाला साजेशी असेल आणि अत्यंत शोभूनही दिसेल हे मी तुला अत्यंत खात्रीपूर्वक सांगतो. आता, रूक्मिणीला आपण पूर्णपणे साहाय्यभूत होणे हे तर आपले कर्तव्यकर्मच आहे आणि ते मी कोणत्याही परिस्थितीत पार पाडणारच असा माझा निश्चयच आहे. रूक्मिणीच्या हितासाठी व कल्याणासाठी मी अत्यंत प्रयत्नपूर्वक झटेन आणि तिची व आपलीही इच्छा पूर्णत्वास नेईनच नेईन. मग त्यासाठी मला कोणीही व कितीही विरोध केला तरी हरकत नाही. सर्व अडथळे पार करून अथवा बाजूला करून किंवा वेळप्रसंगी ते मोडूनही काढून, मी रूक्मिणीचा विवाह हा कृष्णाशी करून देईनच देईन. ही तर आता माझी प्रतिज्ञाच आहे."

भीष्मकाच्या बोलण्याने राणी शुद्धमतीला धीर आला आणि तिच्या मनावरचा ताण बराचसा कमी झाला. तरीही तिच्या मनातील थोडीशी शंका ही शिल्लक राहिलीच होती. पण ती शंका व्यक्त करण्याचा मोकळेपणा तिच्या मनाला आता लाभला होता. म्हणून तिने भीष्मकाशी बोलण्यास सुरूवात केली,

"अहो महाराज, तुमचे बोलणे सयुक्तिकच आहे यात काहीच संदेह नाही. तुमच्या ठिकाणी आपल्या कन्येविषयी असलेली खात्रीही अगदी योग्यच आहे.



रूक्मिणीसारखी पत्नी एखाद्याला लाभणे हे त्याचे भाग्यच म्हणावे लागेल. पण तुमच्या बोलण्यावरून मला तर असेच जाणवू लागले आहे की कृष्णासारखा पती प्राप्त होणे हे तर परमभाग्याचेच आहे. एकंदरीत कृष्ण व रूक्मिणी ही एकमेकांना अत्यंत अनुरूप आहेत असेच दिसते आणि मलाही अगदी तसेच वाटते. तेव्हा त्या दृष्टीने त्या दोघांचा विवाह होणे हे श्रेयस्करच आहे. आता त्यासाठी पुढाकारही आपणच घेतला पाहिजे हे खरे आहे आणि त्याची सर्व जबाबदारी तुमच्यावरच आहे. त्यासंबंधीचा सांगावा तुम्हीच कृष्णाकडे व त्याच्या मातापित्यांकडे पाठवायचा आहे आणि त्यांची अनुमती या विवाहासाठी मिळवायची आहे.

अहो नाथ, पण त्याआधी तुम्ही आपला पुत्र रूक्मी याच्याशी बोलणे, मला तरी अत्यंत आवश्यक वाटते. माझ्याठायी त्याचीच थोडीशी शंका व भीती आहे. आपल्या पुत्राचा स्वभाव तुम्ही जाणून आहातच. त्याची स्वतःची काही मते आहेत आणि आपल्या मतांचे वेगळेपण तो अगदी पहिल्यापासून राखून आहे. एवढेच नव्हे तर, रूक्मी हा स्वतःच्या मतांविषयी दुराग्रही व हट्टीच आहे. दुसऱ्यांची मते समजून घेणेही त्याला जेथे आवश्यक वाटत नाही, तेथे तो ती मते जाणून घेऊन स्वतःची मते कधी बदलेल हे तर शक्यच नाही. परंतु तरीही आपल्या मुलाला डावलून आपण काही निर्णय घेणे हे योग्यच नाही. कारण मग त्याला कळल्यावर तो अत्यंत रागावेल आणि केवढातरी चिडेलही. तो स्वतःला मनस्ताप करून घेईल आणि आपल्यालाही मनस्ताप देईल. त्यामुळे आपले मनःस्वास्थ्य तर बिघडेलच, पण आपल्या कुटुंबातील सर्व स्वास्थ्यही नाहीसे होईल यात मला तिळमात्रही शंका वाटत नाही. तेव्हा या सर्व पुढील संभाव्य गोष्टींचा विचार करूनच तुम्ही काय तो निर्णय घ्यावा एवढीच माझी तुम्हाला विनंती आहे."

शुद्धमतीचे बोलणे ऐकून घेऊन भीष्मकाने क्षणभर स्वतःचे नेत्र मिटून घेतले. कोणत्यातरी विचारात तो मग्न झाल्याचेच ते लक्षण होते. त्याचा चेहराही अत्यंत गंभीरच झालेला अगदी स्पष्टपणे दिसत होता. भीष्मकाच्या मनातील भाव रूक्मिणीच्या लक्षात यायला जराही वेळ लागला नाही. तिच्याही मनात थोडीशी काळजी निर्माण झालीच. म्हणून तीही भीष्मकाची प्रतिक्रिया ऐकण्यासाठी अगदी आतुर होऊन राहिली होती. थोड्याच वेळात भीष्मकाने आपले नेत्र उघडले आणि अत्यंत गंभीरपणे धीम्या पण निश्चयात्मक सुरात त्याने बोलण्यास सुरूवात केली,

"हे शुद्धमती, तुझे म्हणणे बरोबर आहे आणि तुला काळजी वाटणे हेही अगदी साहजिकच आहे. कारण आपल्या रूक्मीचा स्वभाव खरोखरीच तसा विचित्रच आहे. त्याच्या मनाप्रमाणे व मताप्रमाणेच सर्वांनी वागले पाहिजे असा त्याचा नेहमीच हट्ट असतो. काही वेळा तर तो तशी बळजबरीच करतो. मतभिन्नता मुळी त्याच्या मनाला सहनच होत नाही. त्यामुळे खरे तर मला त्याचीच काळजी


जास्त वाटत असते. अशा त्याच्या मनस्वी स्वभावामुळे कधीतरी रुक्मी स्वतःच संकटात सापडण्याची शक्यता माझ्या मनाला सदैव जाणवत असते. ती सल माझ्या मनाला तर दुःखीच करते.

हे शुद्धमती, आपल्या दोन्ही मुलांवर त्यांच्या लहानपणापासूनच आपण सुसंस्कार करीत राहिलो. त्याचबरोबर त्यांचे योग्य ते लाडही वेळोवेळी पुरवीत आलो. पण त्याचे फळ आपल्याला फक्त रूक्मिणीच्या ठायीच पहायला व अनुभवायला मिळाले. रूक्मीने मात्र आपली पूर्ण निराशा केली. मुळात सद्गुणी व पराक्रमी असूनही मनाच्या दुर्बलतेमुळे तो दुर्जनांच्या संगतीकडे आकर्षित झाला आणि दुराचारी लोकांचाच सहवासही त्याला आवडू लागला. मी वारंवार त्याला सावध करूनही त्याने माझे कधी ऐकलेच नाही. स्वतःची बुद्धीही शुद्ध नसल्यामुळे विवेकाच्या अभावाने स्वतःला सावरू शकला नाही आणि स्वतःची होणारी अधोगतीही थांबवू शकला नाही. आता या गोष्टीचे आपल्याला जरी कितीही वाईट वाटले, तरी आपल्याकडे त्याच्यावर काहीही इलाज नाही ही तर वस्तुस्थितीच आहे. नाईलाजाने का होईना, पण आपल्याला ती जरी मानवत नसली तरी मान्य करायलाच हवी.

हे शुद्धमती, रूक्मिणीच्या विवाहासंबंधी आपण घेतलेला निर्णय आपण रूक्मीला तर सांगूच, परंतु त्याची त्यावर होणारी प्रतिक्रिया मात्र आपल्याला सहन करता यायला हवी. त्यासाठी आपल्याला आपल्या मनाची तयारी आधीच करून ठेवायला हवी आणि आपल्या मनाचे बळही आधीच घेऊन ठेवायला हवे. कुठल्याही परिस्थितीत आपला निर्णय व निश्चय कायम ठेवून रूक्मिणीच्या पाठीशी सक्रिय साहाय्य करून आपण उभे रहायचे आहे हे मात्र नक्की!”

भीष्मकाचे बोलणे ऐकून शुद्धमतीच्या मनाचे थोडेसे समाधान झाले खरे, आणि तिच्या मनावरील ताण जरासा सैलही झाला खरा, पण तो ताण काही पूर्णपणे गेला नव्हता. तसा तो जाणेही तेवढेसे सोपे नव्हतेच. मात्र शुद्धमतीने स्वतःच्या मनाची समजूत घातली आणि ती प्रयत्नपूर्वक शांत व स्वस्थ बसून राहिली.

हे लक्ष्मी, भीष्मकाला जसा आपल्या मुलाचा, रूक्मीचा स्वभाव माहीत होता तसाच तो रूक्मीची मतेही जाणून होता. राजकारणामध्ये तो उघडपणे कृष्णाच्या विरूद्ध पक्षातील जरासंध, शिशुपाल इत्यादी दुराचारी राजांच्या बाजूचा होता. कृष्णाचा सदैव द्वेष व मत्सर करणाऱ्या या राजांना, कृष्ण सज्जन वृत्तीच्या राजांचा एक संघ निर्माण करण्याचा जो प्रयत्न करीत आहे तो अजिबात मानवणारा नव्हता. त्या निमित्ताने कृष्णाचेच वर्चस्व प्रस्थापित होईल आणि त्यांची सर्व दुष्कृत्ये उघड होतील या भीतीपोटी, जरासंध व शिशुपाल यांचा



कृष्णाला प्रथमपासूनच विरोध होता आणि त्यांचा विरोध त्यांनी जाणूनबुजून नेहमी वाढवतच ठेवला होता. त्याचेच रूपांतर त्यांच्या ठिकाणी कृष्णाविषयीचा वैरभाव निर्माण होण्यात झाले होते आणि कृष्ण हा त्यांचा प्रथम क्रमांकाचा शत्रू होऊन राहिला होता.


या सर्व गोष्टींची भीष्मकाला पूर्ण कल्पना होतीच. पण तरीही रूक्मिणीच्या विवाहासंबंधीचा विषय रूक्मीजवळ काढणे तर आवश्यकच होते. त्यासाठी भीष्मक योग्य वेळेची व संधीची वाट पाहत राहिला. पण तशी संधी लवकर मिळण्याची काहीच चिन्हे जेव्हा दिसेनात, तेव्हा मात्र भीष्मकाने स्वतःच पुढाकार घेतला आणि रूक्मिला भेटावयास बोलावून घेतले. तरीही रूक्मिने ताबडतोब न येता त्याच्या स्वभावानुसार भीष्मकाला बराच वेळ वाट पहावयास लावलेच. शेवटी अगदी नाईलाजानेच यावे लागत आहे असा चेहरा करून रूक्मी भीष्मकाला भेटण्यासाठी त्याच्या महालात गेला. गेल्यागेल्या त्याने प्रथम भीष्मकाला व त्याच्याच शेजारी बसलेल्या माता शुद्धमतीला वाकून प्रणाम केला खरा, पण त्याच्या त्या कृतीत नम्रतेपेक्षा औपचारिकपणाच जास्त जाणवत होता. भीष्मकाने मात्र आपल्या पुत्राचे हसून मनःपूर्वक स्वागत केले आणि प्रेमाने रूक्मिच्या मस्तकावर आपला हात ठेवून थोडेसे थोपटल्यासारखे केले. भीष्मकाने रूक्मिचा हात आपल्या हातात धरून त्याला आपल्या शेजारीच बसवून घेतले. पण रूक्मिने लागलीच आपला हात भीष्मकाच्या हातातून सोडवून घेतला आणि काहीशा नाराजीच्या सुरातच आपल्या पित्याशी बोलण्यास सुरूवात केली,

“अहो तात, एवढे काय तातडीचे काम निघाले, की तुम्ही मला वारंवार निरोप पाठवून भेटीस बोलावून घेतलेत? मी राज्यकारभाराच्या कामकाजात किती व्यस्त असतो हे तुम्हाला ठाऊक आहेच ना? त्या कामापेक्षा दुसरे महत्त्वाचे काम माझ्यासाठी तरी काहीच असू शकत नाही. अहो, या राज्यकारभाराच्या संबंधीच्या राजकारणात मी एवढा व्यग्र असतो की मला स्वतःला जेवणाखाण्याला सुद्धा वेळ मिळत नाही. सध्या तर एकंदरीत गोष्टी एवढ्या गुंतागुंतीच्या झाल्या आहेत, की मी तर नेहमीच एक प्रकारच्या मानसिक दबावाखाली असतो. मनाची शांती म्हणून मला कधीच लाभत नाही. त्यातूनच तुमचे हे मला सारखे निरोपावरती निरोप. मी तुम्हाला निक्षून सांगतो की किरकोळ व क्षुल्लक गोष्टींसाठी मला खरेच वेळ नाही आणि असला तरी तो मला उगाचच फुकट दवडायचा नाही. तेव्हा मला तुम्ही कशासाठी बोलावलेत ते ताबडतोब सांगा बघू. मला लवकरात लवकर येथून निघावयाचे आहे. मला निष्कारण थांबायला मुळीच वेळ नाही.”

रूक्मिच्या मनातील ताणतणाव त्याच्या बोलण्याच्या स्वरातून, चेहऱ्यावरील भावातून आणि हावभावातूनही अगदी स्पष्टपणे दिसत होता. त्याची ती अवस्था पाहून भीष्मकाला रूक्मिची दयाच आली. त्यामुळेच रूक्मिच्या रागावण्याकडे दुर्लक्ष करीत भीष्मक शांत स्वरात रूक्मिशी बोलू लागला,

“अरे रूक्मी, तू एवढा चिडतोस का? राज्यकारभार करताना आलेले ताण आपण तेथल्या तेथेच व लगेचच विसरले पाहिजेत. ते ओझे आपल्या मनावरती आपण ठेवून घ्यायचेच नाही. तरच कुठल्याही परिस्थितीत मन शांत ठेवून त्यातील अडचणीतून सुटण्याचा योग्य मार्ग काढणे आपल्याला शक्य होईल. खरे तर, राज्याचा कारभार चालविण्यासाठी मी तुझी मदत मुद्दामहूनच घेतली. त्या निमित्ताने राज्यकारभाराची नानाविध अंगे तुला जाणता यावीत हाच माझा त्यामागील एकमेव हेतू होता. राज्याचा कारभार चोख व उत्कृष्ट व्यवहाराने करून त्याद्वारे प्रजेचे हित व कल्याण कसे साधावे, याचे प्रशिक्षण तुला मिळावे हाच त्यातील एकीएक उद्देशही होता. परंतु उत्साहाच्या भरात तू तर उगाचच सर्व जबाबदारी स्वतःच्याच शिरावर घेतलीस आणि आता तुला त्याचा ताप होत आहे. तेव्हा तू वृथा स्वतःच्या देहाला व मनाला शीण देऊ नकोस. राज्यकारभाराची सर्व सूत्रे व जबाबदारी अजूनही माझ्याकडेच आहे. तू सध्या मला फक्त साहाय्यभूत हो आणि त्याद्वारे अनेक गोष्टींची माहिती करून घेऊन त्या शिकून घे. म्हणजे त्या गोष्टी तुला तुझ्या पुढील आयुष्यात, जेव्हा तुझ्यावर काळाच्या ओघात खरेच प्रत्यक्ष जबाबदारी येईल तेव्हा निश्चितपणे उपयोगाला येतील. तोपर्यंत तू काहीही काळजी न करता अगदी निश्चिंत रहा आणि मनमोकळेपणाने जीवनात सर्व सुखे आनंदाने भोगीत रहा.

अरे रूक्मी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट मी तुला सांगतो ती तू लक्षपूर्वक ऐकून घे आणि त्याच्यावर नीटपणे विचार कर. आपली रूक्मिणी ही आता वयात आलेली असून विवाहास योग्य झालेली आहे. तिला सुयोग्य असा पती मिळावा अशी आपल्या सर्वांचीच इच्छा आहे. पण त्याआधी रूक्मिणीचे मत व तिची अपेक्षा काय आहे हे जाणून घ्यावे असे मला वाटले आणि म्हणून त्याच उद्देशाने मी रूक्मिणीशी बोलणे केले. तेव्हा तिने स्वतःचे मन अगदी मोकळेपणाने माझ्यापाशी प्रगट केले. त्यावेळेस तुझी मातासुद्धा तेथे उपस्थित होती. रूक्मिणीने आम्हाला अगदी स्पष्टपणे सांगितले की तिचे मन पूर्णपणे कृष्णाच्याठायीच जडलेले आहे आणि तिने केवळ कृष्णालाच अगदी मनापासून वरलेले आहे. रूक्मिणीवरती आत्तापर्यंत आपण जे काही उत्तम संस्कार केलेले आहेत, त्या संस्कारांना साजेसा व योग्य असा फक्त कृष्णच आहे अशी तिची पक्की खात्री आहे. म्हणूनच कृष्णालाच पती म्हणून स्वीकारण्याचा आणि त्याच्याशीच विवाहबद्ध होण्याचा रूक्मिणीचा



पूर्णपणे निश्चय झालेला आहे. अर्थातच यासंबंधीचा अंतिम निर्णय तिने आपल्यावरती सोपवलेला आहे.

रूक्मी, मी जेव्हा रूक्मिणीच्या भावनेचा आणि तिने केलेल्या पतीच्या निवडीचा नीट विचार केला तेव्हा मलाही तिची विचारसरणी व निवड अत्यंत योग्य आहे याची खात्री पटली. कारण सांप्रतकाळी कृष्णासारखा पराक्रमी व मुत्सद्दी राजकारणी असा दुसरा कोणताही पुरूष या भारतवर्षात नाही हे अगदी खरे आहे. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या देखण्या व राजबिंड्या व्यक्तिमत्त्वाने, प्रेमळ व परोपकारी स्वभावाने आणि त्याहीपेक्षा त्याच्या सद्गुणांनी कृष्ण हा सर्वत्रच ख्यातनाम झालेला आहे. शिवाय कृष्णाचे यादवकुळही अत्यंत थोर व प्रख्यात असून आपल्याला अगदी साजेसे व आपल्या तोलामोलाचेही आहे. तेव्हा अशा कुळाशी आपली सोयरीक जुळली तर ते आपल्यासाठीही भाग्याचेच आहे. अशा तऱ्हेने सर्व बाजूंनी विचार केला असता रूक्मिणीचा विवाह कृष्णाशीच करून देणे हेच योग्य ठरेल, असे मला अत्यंत मनापासून वाटते आणि तसाच माझा निर्णयही झालेला आहे. आता यावर तुझे काय म्हणणे आहे ते मला सांग बघू.”

एवढावेळ जरी भीष्मकाचे बोलणे रूक्मी काहीही न बोलता ऐकताना दिसत होता खरा, तरी त्याच्या मनातील अस्वस्थता त्याच्या चेहऱ्यावर अत्यंत स्पष्टपणे दिसत होती. भीष्मकाच्या वाक्या-वाक्यागणिक रूक्मिच्या रागाचा पारा अधिकाधिक वर चढत होता आणि त्याचा चेहरा लालबुंद होत होता. भीष्मकाचे बोलणे थांबण्याआधीच डोळे मोठे करून व हातवारे करून रूक्मी त्याचा निषेध व्यक्त करून दाखवीतच होता. शेवटी न राहवून रूक्मिच्या मनातील रागाचा स्फोट झालाच. आपला आवाज एकदम वर चढवूनच रूक्मिने बोलावयास सुरूवात केली मात्र, त्याच्या तोंडाद्वारे शब्द जणू फुटूनच बाहेर पडू लागले,


“अहो तात, त्या कृष्णाचे नावसुद्धा माझ्यासमोर काढू नका. एवढे त्याचे कौतुक करण्यासारखे त्याच्यामध्ये काही आहे असे मला तरी मुळीच वाटत नाही. केवळ तुमच्यासारख्या बुरसट वृत्तीच्या लोकांनाच त्याची भुरळ पडते. पण ज्याला थोडी तरी बुद्धी व समज आहे तो कृष्णाच्या बाह्य रूपरंगाला अजिबात भुलणार नाही. तुमच्यासारखे स्वतःला ज्ञानी समजणारेसुद्धा जर स्वतःची बुद्धी गहाण ठेवत असतील, तर मग रूक्मिणीसारखी नादान व नासमज असलेली मुलगी कृष्णाला भुलली यात नवल ते काय? त्या कृष्णाचे जे काही चरित्र सर्वांनाच ठाऊक आहे त्यावरून त्या कृष्णाला एक सभ्य गृहस्थ म्हणणेही कठीण आहे. स्त्रियांच्या बाबतीतील त्याची दृष्टी व त्याचा स्त्रीलंपटपणा तर जगजाहीरच आहे. त्याच्या या वृत्तीचा सर्वत्रच गवगवा झालेला आहे. पण कृष्णाला त्याची अजिबात पर्वा नाही.

स्वतःच्या मूळ स्वभावाला जागून स्त्रियांना फसवून आपल्या मोहपाशात बांधण्याचे त्याचे उद्योग अजूनही राजरोसपणे चालू आहेत.

अहो तात, रूक्मिणीच्या मनाला मोह झाला हे एक वेळ मी समजू शकतो. परंतु तुमचीही बुद्धी भ्रष्ट व्हावी? अर्थात, याचेही मला नवल वाटत नाही. कारण वयपरत्वे तुमची बुद्धी क्षीण होत चालली आहे हेच खरे. नाहीतर, रूक्मिणीची योग्य समजूत काढण्याच्या ऐवजी तुम्ही अविचाराने तिच्या म्हणण्याला संमती दिलीच नसती. परंतु माझी बुद्धी अजून शाबूत आहे हे लक्षात ठेवा. मी अशी भलतीसलती चूक रूक्मिणीला कधीच करू देणार नाही. तिचे हित ती जाणूच शकत नाही हे आपण जाणले पाहिजे आणि तिचे अनहित होऊ न देण्याची जबाबदारी आपली आहे हे लक्षात घ्या. रूक्मिणीचा ज्येष्ठ बंधू या नात्याने ती जबाबदारी आता माझीच आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही त्यामध्ये काहीही लुडबुड करू नका. तशी ती मी कधीही मान्य करणार नाही आणि खपवूनही घेणार नाही.

अहो तात, या निमित्ताने मला तुम्हाला आणखीन एक गोष्ट निक्षून सांगावयाची आहे. या कृष्णाने आता राजकारणात प्रवेश केलेला आहे. स्वतःला बुद्धिवान समजणारा हा कृष्ण जादाच शहाणपण दाखवीत आहे. काही दुर्बल व भिडस्त राजांना एकत्र आणून त्यांचा एक संघ बांधायचा प्रयत्न हा कृष्ण गेले कित्येक दिवस करीत आहे. खरे तर, त्या निमित्ताने त्या षंढ राजांचा नेता होऊन स्वतःचा मोठेपणा वाढवायचा हाच कृष्णाचा यामागील हेतू अगदी स्पष्ट आहे. पण त्यासाठी कृष्णाने 'धर्म व अधर्म' अशी मोठी मोठी नावे आपल्या कुटील बेताला दिलेली आहेत. त्यामागे केवळ सर्वांच्या डोळयात धूळफेक करण्याचाच कृष्णाचा छुपा डाव आहे. पण तो आमच्या केव्हाच लक्षात आलेला आहे आणि आम्ही त्याला तो कधीच साधू देणार नाही.

कृष्णाच्या या डावपेचांना जशास तसे व अगदी तोडीस तोड उत्तर आम्हीही निश्चितच देऊ. त्यासाठी मी व माझा परममित्र शिशुपाल मिळून राजाधिराज जरासंध महाराज यांच्या अधिपत्याखाली, राजकुलोत्पन्न व खऱ्या राजधर्माचे पालन करणाऱ्या राजांना एकत्र आणीत आहोत. राजकुळातच जे जन्माला आले, राजघराण्यातच जे वाढले आणि लहानाचे मोठे झाले त्यांना राजधर्म म्हणून वेगळा काही शिकण्याची आवश्यकताच नाही. ते वागतील तोच खरा राजधर्म आहे आणि ते करतील तेच खरे राजकारण आहे. खरे तर, ज्याचे सर्व लहानपण गोकुळासारख्या एका क्षुल्लक गावामध्ये आणि ते देखील तेथील अडाणी लोकांच्या सहवासामध्ये गेले, त्याने राजकारणासारख्या मोठ्या गोष्टींविषयी बोलण्याचे धाडसच करता कामा नये. कारण हा तर लहान तोंडी मोठा घास घेण्याचाच प्रकार आहे. कृष्णाला हे माहीत नाही असे नाही. परंतु जाणूनबुजूनच तो



हे सर्व प्रकार करीत आहे. कारण ‘आपल्यालाच सर्व काही कळते आणि आपणच सर्वांचे कल्याण करणार’ अशा अहंगंडानेच कृष्णाला पछाडलेले आहे. अर्थात हळूहळू कृष्णाचे मायावी रूप लोकांना कळायला लागले आहे. त्यामुळे गोकुळात जरी कृष्णाने अनेकांना त्याच्या नादी लावून फसवले तरी यापुढे तो कोणालाही फसवू शकणार नाही. लोकांचे डोळेही आता उघडू लागलेले आहेत. काही लोकांना काही काळ फसवता येईल पण सर्वांनाच सर्वकाळ कोणी फसवू शकत नाही हे आता कृष्णाच्याही लक्षात येईल.

अहो तात, कृष्णाच्या मोहाने तुम्हाला एवढे अंधत्व आलेले आहे, की कृष्णाच्या चारित्र्याचाही तुम्ही विचारच करू शकत नाही, की तुम्ही त्याकडे मुद्दामहूनच दुर्लक्ष करीत आहात हेच मला कळत नाही. कृष्णाचे चारित्र्य हा तर सर्वांच्याच चर्चेचा विषय होऊन राहिलेला आहे. त्याचा स्त्रीलंपटपणा तर सर्वश्रुतच आहे. त्या विषयी तर काही बोलणेच नको. गोकुळात कृष्णाने केलेले थेर तर आता सर्वांनाच ठाऊक झालेले आहेत. काहीजणांनी तर त्याला कृष्णलीलाच म्हटले, तर काही जणांनी ‘त्यावेळी कृष्ण लहान होता’ अशी मनाची समजूत करून घेऊन त्या गोष्टींकडे कानाडोळा केला. पण, आता कृष्णाचे काय चाललेले आहे? तर मागील तीच आवृत्ती पुन्हा अजूनही पुढे चालूच आहे. कारण कृष्णाची वृत्ती व त्याचा चालूपणा अजिबात बदललेला नाही आणि तो कधीही बदलणे शक्य नाही. पण दुर्दैवाने व अज्ञानाने कृष्णाचे फसवे रूप लक्षात न आल्यामुळे अनेकजण त्याच्या बाह्यरूपाला भुलत आहेत आणि स्वतःचीच फसवणूक करून घेत आहेत. त्यामध्ये मोठ्या मोठ्या राजघराण्यातील काही स्त्रियांचाही समावेश आता होत आहे ही खरे तर शरमेचीच गोष्ट आहे. त्यांच्या मनात कृष्णाविषयी, काहीही कारण नसताना आकर्षण निर्माण होत आहे. अशा परिस्थितीचा फायदा कृष्णाने आपल्या राजकारणासाठी उठवला नसता तरच ते नवल ठरले असते. पण कृष्ण हा पक्का राजकारणी व मतलबी आहे. त्यामुळे त्याने अशा राजकन्यांना या ना त्या प्रकारे वश करून त्यांच्याशी विवाहच केला आणि त्या राजांशी व्यक्तिगत नातेसंबंध निर्माण केले. अशा तऱ्हेने कृष्णाने लग्नासारख्या पवित्र गोष्टीचासुद्धा स्वतःच्या राजकारणासाठी व स्वार्थासाठी उपयोग करून घेतला आणि ही गोष्ट तर केव्हाही निषेधार्हच आहे ना?


अहो तात, अशा परिस्थितीत रूक्मिणीनेही कृष्णाकडे आकर्षित व्हावे आणि तेही त्याला प्रत्यक्ष न बघताच, यासारखी दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही. रूक्मिणी एवढी कमकुवत मनाची असेल आणि कृष्णाविषयीच्या केवळ काहीतरी कपोलकल्पित ऐकीव माहितीच्या आधारे तिच्या मनात कृष्णाविषयी काही खुळचट

विचार येतील, असे मला तरी कधी वाटले नव्हते. चांगल्या संस्कारातील व सुजाण म्हणून रूक्मिणीकडे आपण पाहत असताना, आता तिच्या डोक्यात एकदम काहीतरी हे विचित्र वारे शिरलेले दिसते आणि म्हणूनच हे नसते शहाणपण तिला सुचत आहे. पण म्हणून आपण काही तिच्याबरोबर वाहत जायचे नाही. आपण स्थिरच रहायचे. रूक्मिणीच्या मनाचा तोल गेला तर आपणच तिला सावरायला हवे.

तात, रूक्मिणीचा वेडेपणा एक वेळ मी समजू शकतो. परंतु मला नवल वाटत आहे ते तुमचे आणि राग येतो आहे तो तुमचा. कारण तुम्हीही रूक्मिणीचीच तरफदारी करताना दिसत आहात. तुमच्या बोलण्यातून तुमचा कृष्णाकडे असलेला कल मला तर स्पष्टपणे जाणवत आहे. तेच मी सहन करू शकत नाही आणि करणारही नाही हे लक्षात ठेवा. मला तर असे अगदी खात्रीपूर्वक वाटते की वयोमानापरत्वे तुमचीही बुद्धी ढळली आहे आणि मनही चळले आहे. म्हणूनच कृष्णाच्या राजकारणाला तुम्ही बळी पडत आहात. एवढेच नव्हे तर कृष्णाचे तथाकथित गुणवर्णन ऐकून तुम्हालाही बहुतेक इतरांप्रमाणेच कृष्ण हा एक दैवी पुरूष वगैरे काहीतरी आहे असे वाटत असावे. अशा भाकड कथांवरती तुमचा विश्वास तरी कसा बसतो हेच मला समजत नाही. तुम्ही तर तुमची बुद्धी गहाणच ठेवलेली दिसते. पण लक्षात ठेवा की माझी बुद्धी अजून शाबूत आहे आणि जागृतही आहे. त्यामुळे रूक्मिणीच्या जीवनाचे नुकसान मी कधीही होऊ देणार नाही. तिचा ज्येष्ठ बंधू या नात्याने तिची काळजी घेणे ही माझी जबाबदारी आहे आणि ती मी नक्कीच पार पाडीन.

तात, आता एक गोष्ट नीटपणे लक्षात ठेवा. यापुढे रूक्मिणीच्या बाबतीतील सर्व निर्णय मी म्हणजे फक्त मीच घेणार. एवढेच काय, राज्यकारभाराचीही सर्व सूत्रे माझ्याच हातात घेण्याची वेळही आता आलेली आहे. नाहीतरी वृद्धत्वामुळे तुमचे तन व मन दोन्ही थकलेली आहेत आणि त्यांची कार्यक्षमता अत्यंत क्षीण झालेली आहे. तेव्हा वेळीच तुम्ही सर्व सूत्रे आपणहून माझ्याकडे सुपूर्द करा. त्यामुळे तुमचा मान तरी राखला जाईल. नाहीतर जेव्हा एक दिवस मी सर्व कारभार जबरदस्तीने माझ्या हातात घेईन तेव्हा तुमची स्थिती अधिक करूणास्पद होईल.

खरे तर, एक गोष्ट मी एवढ्यातच तुमच्याकडे बोलणार नव्हतो. परंतु रूक्मिणीच्या लग्नाचा विषय तुम्हीच आपणहून आता माझ्याकडे काढला आहात म्हणूनच मी तुम्हाला सांगतो. रूक्मिणीसाठी तिच्या योग्यतेचा वर मी आधीच पाहून ठेवलेला आहे. माझा परममित्र शिशुपाल हाच रूक्मिणीचा पती म्हणून सर्वार्थाने योग्य आहे याविषयी माझी पक्की खात्री आहे. त्यासंबंधी मी शिशुपालाशी



प्राथमिक बोलणे आधीच केलेले आहे आणि त्यालाही आपली रूक्मिणी सर्वतोपरीने अगदी मनापासून पसंत आहे. तुमची व रूक्मिणीची संमती गृहीत धरून मी तसा शब्दही शिशुपालाला दिलेला आहे. आता केवळ तुमचे व रूक्मिणीचे त्याला अनुमोदन एक उपचार म्हणून मला हवे आहे. तुमच्याशी मी आता बोललोच आहे. रूक्मिणीकडे जाऊन तिच्याशीही हा विषय मी बोलतो आणि तिचीही संमती मिळवतो. पण एक गोष्ट मी तुम्हाला आताच अगदी निक्षून सांगतो की कोणत्याही परिस्थितीत रूक्मिणीचा विवाह हा शिशुपालाशीच होणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यामध्ये कोणीही, मग तो अगदी कोणीही असो, जर आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला तर त्याचे परिणाम अत्यंत भयंकर होतील. मग सर्वांनाच त्याला तोंड द्यावे लागेल हे पूर्णपणे लक्षात ठेवा आणि मगच काय करायचे ते ठरवा. किंबहुना, वेगळे काही ठरवूच नका. ते साहस करू नका असाच माझा तुम्हाला सल्ला आहे. कारण, ते साहस तुम्हा सर्वांनाच महाग पडेल याची खात्री बाळगा.”

अशा तऱ्हेने भीष्मकाला जणू धमकीच देऊन रागाने लालबुंद झालेला रूक्मी दाणदाण पावले टाकीत तेथून जो निघाला, तो तडक रूक्मिणीकडे जाऊन पोहोचला. रूक्मिच्या बोलण्याने भीष्मक व शुद्धमती हे दोघेही अगदी हतबुद्ध होऊन राहिले होते. रूक्मिच्या बरळण्यातून त्याच्या मनातील सर्व गरळच जणू बाहेर पडले होते. कृष्णाविषयीच्या द्वेषमत्सराने पूर्णपणे पछाडलेल्या रूक्मिच्या मनात साचलेल्या मळाचे कुजून विषच झालेले होते. तेच त्याच्या सर्व अंगात भिनलेले होते आणि तोच विखार त्याच्या शब्दाशब्दांतून प्रगट होत होता. रूक्मिच्या बोलण्यातील दाहाने भीष्मक व शुद्धमती यांचे मन निश्चितच पोळून निघाले. ते दोघेही बाह्यांगाने तरी मोठ्या प्रयत्नाने शांत राहिले खरे, परंतु त्यांच्या मनाला मात्र अत्यंत उद्विग्नता आलेली होती. त्या उभयतांनी व्यथित नजरेने एकमेकांकडे पाहिले आणि परस्परांची व्यथा जाणून ते स्वस्थ बसले. तरीही आपल्या भूमिकेशी ठाम राहण्याचा भीष्मकाचा निश्चय आणि आपल्या पतीला कोणत्याही परिस्थितीत साथ देण्याचा शुद्धमतीचा निश्चय कायम होता, हे त्या उभयतांच्या मुखावर अगदी स्पष्टपणे दिसत होते.


इकडे रूक्मीही जो तरातरा रूक्मिणीकडे गेला होता, तो तिच्याशी बराच वेळ तावातावाने बोलला आणि त्याने त्याची सर्व चीड व संताप मोकळा केला. परंतु तरीही त्याचा राग शमला नाही तो नाहीच. रूक्मिणीने मात्र रूक्मिचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेतले. तिने रूक्मिशी अजिबात वाद घातला नाही. रूक्मिने रूक्मिणीला नाना प्रकारची दूषणे दिली आणि रागाच्या भरात त्याने रूक्मिणीला उद्देशून अनेक अपशब्दही वापरले. रूक्मिणीच्या मनाला टोचून क्लेश देतील अशी लागट वचनेही रूक्मी जाणूनबुजून बोलला. रूक्मिणीच्या

सहनशीलतेची पूर्ण कसोटीच लागली आणि ती त्या कसोटीला पूर्णपणे उतरलीही. रूक्मिणीने तिची मनःशांती जराही ढळू न देता प्रयत्नपूर्वक राखली. रूक्मीचा अवमान होईल असा एकही शब्द वा अक्षरही तिच्या मुखातून बाहेर आलेच नाही. रूक्मिणीच्या ठायी असलेल्या विवेकाचेच ते सुचिन्ह होते. ती पूर्णपणे जाणून होती की रूक्मिशी संवाद करणे तर शक्यच नव्हते आणि त्याच्याशी वाद घालण्यातही काही अर्थच नव्हता. म्हणूनच रूक्मिणी शांत व स्तब्ध राहिली. बराच वेळ त्रागा व आगपाखड केल्यानंतर रूक्मी जसा तरातरा आला होता तसाच तरातरा निघून गेला. पण रूक्मिच्या वागण्याबोलण्याचा जरासाही परिणाम रूक्मिणीच्या मनावर होऊच शकला नाही. कारण तिचे मन कृष्णप्रेमाने व कृष्णाच्या माहात्म्याच्या जाणिवेने पूर्णपणे भरलेले होते आणि केवळ कृष्णाच्याचठायी ते कायमचे जडलेले होते. ‘कृष्ण’ हाच तिचा निश्चय झालेला होता आणि ‘कृष्ण’ हाच तिचा ध्यासही होऊन राहिलेला होता. त्यामुळे आता जगातील कोणतीही शक्ती रूक्मिणीला तिच्या कृष्णप्राप्तीच्या ध्येयापासून दूर करूच शकली नसती.

*****

भीष्मकाला रूक्मिची प्रतिक्रिया जरी अपेक्षित असली तरी त्याच्या रागाचा उद्रेक पाहून तोही थोडासा हादरलाच. मुळात कमकुवत मनाची असलेली शुद्धमतीही नंतर एवढी घाबरून गेली की रूक्मिला विरोध करून उगाचच भांडणतंटा वाढवू नका असाच आग्रह ती भीष्मकापाशी धरून बसली. भीष्मकाची मनःस्थिती मोठी विचित्रच झाली. परंतु रूक्मिणीचा दृढनिश्चय पाहून त्यानेही मनोबळ घेतले आणि रूक्मिच्या विरोधाकडे लक्ष न देता तो स्वतःच्या भूमिकेशी ठाम राहिला. तरीही या बिकट परिस्थितीतून कसा मार्ग काढावा आणि निश्चित काय कृती करून आपला हेतू साध्य करावा, या विचाराने भीष्मक अत्यंत विवंचनेत पडला.

तोच एक दिवस अचानकपणे थोर महात्मा गर्ग मुनी यांचे भीष्मकाच्या राजवाड्यात आगमन झाले. हा जणू शुभशकुनच झाला आहे असेच भीष्मकाला जाणवले आणि धावतच जाऊन त्याने गर्ग मुनींचे आदरपूर्वक स्वागत केले. स्वकराने गर्ग मुनींचा हात धरून भीष्मकाने त्यांना आपल्या महालात आणले. गर्ग मुनींना उच्चासनावर बसवून भीष्मकाने त्यांना साष्टांग नमस्कार केला आणि हात जोडून त्यांच्या चरणांशी बसून राहिला. शुद्धमतीनेही गर्गमुनींची पूजा करून त्यांना वंदन केले आणि तीही हात जोडून तेथेच बसून राहिली. गर्ग मुनींनी प्रसन्न मुखाने आपले हात उंचावून त्यांना आशीर्वाद दिले. बराच वेळ झाला तरी भीष्मक काहीच बोलत नाही हे पाहून गर्ग मुनींनी मंदस्मित केले आणि स्वतःच बोलावयास सुरूवात केली,



“अरे भीष्मका, तुला व तुझ्या पत्नीला माझे पूर्ण आशीर्वाद आहेतच. परंतु ‘तुमचे कल्याण होवो, तुमचे शुभ होवो, तुमचे सर्व मंगल होवो’ अशा केवळ आशीर्वचनाने कोणाचेही कल्याण वा शुभ किंवा मंगल होत नाही हे सत्य आहे. कारण कल्याण म्हणजे काय, शुभ म्हणजे काय किंवा मंगल म्हणजे काय व ते कशात आहे हे जाणून घेतल्यावरच आणि मग त्याच्या प्राप्तीसाठी योग्य ते प्रयत्न केल्यावरच, ते आशीर्वाद फलद्रूप होतात. त्यासाठीच आशीर्वादाबरोबरच मार्गदर्शनाचीही आवश्यकता असते आणि मार्गदर्शन घेण्यासाठी आपले मन मोकळे करून आपल्या जीवनातील अडचणी मोकळेपणाने सांगितल्या पाहिजेत. कारण त्यामुळेच त्या अडचणींतून योग्य मार्ग काढणे शक्य होते. त्याशिवाय संसारात गुंतलेल्या मनाची सुटका होणार नाही आणि ते ईश्वरापदी येणार नाही. एकदा का ते मन ईश्वराच्या चरणी आले की मगच त्या मनाला स्थिरता व शांती लाभेल आणि ईश्वराच्या माहात्म्याचे विचार त्या मनात जागे होतील. त्याच विचारांमुळे ईश्वराविषयीच्या प्रेमभावाने मन व्याप्त होईल आणि तृप्त होऊन राहील. अशी ही मनाची परमशांतीची व परमतृप्तीची अवस्था सर्व अंतःकरणाचीच होऊन राहिली असता येणारी आनंदाची अनुभूती हीच परमानंदाची परमावस्था होय. या परमानंदाची प्राप्ती हीच अत्यंत कल्याणकारक, शुभकारक व मंगलकारक आहे.”


भीष्मकाशी बोलण्याचे निमित्त झाले आणि गर्ग मुनींच्या अंतःकरणाचीच अवस्था जणू साकार होऊ लागली. भीष्मकाला जरी ती पूर्णपणे आकलन होऊ शकली नाही तरी त्याला गर्ग मुनींच्या बोलण्यातील भावार्थ मात्र नक्कीच कळला आणि त्याने गर्ग मुनींपाशी स्वतःचे मन हळूहळू मोकळे करण्यास सुरूवात केली,

“अहो मुनिराज, आपल्या आशीर्वादांची व मार्गदर्शनाचीही आम्हाला अत्यंत जरूरी आहे. आमचे भाग्य थोर म्हणूनच आज आपले येथे आगमन झालेले आहे. आमची मनःस्थिती ठीक नाही हे अगदी खरेच आहे आणि आपण ही गोष्ट ताबडतोब जाणलीत हीच आपली थोरवी आहे. आमच्या मनातील सूक्ष्म सुखदुःखाच्या भावनाही आपल्या अंतःकरणाला जाणवतात. आपले अंतःकरण अत्यंत संवेदनाक्षम असल्याचेच हे लक्षण आहे. आपल्या अंतःकरणाच्या या अत्यंत तरल अवस्थेमुळेच आमच्यासारख्या सामान्य प्रापंचिकांना केवढातरी आधार व संधी मिळत असते. त्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याची जबाबदारी मात्र सर्वतोपरी आमचीच आहे.

हे मुनिवर्य, आपण जाणूनच आहात की आमची सुकन्या रूक्मिणी ही उपवर झालेली आहे. त्यामुळे आम्ही तिच्यासाठी योग्य अशा वराच्या संशोधनात

आहोत. यासंबंधी आम्ही खुद्द रूक्मिणीपाशीच हा विषय काढला असता तिने आम्हाला अगदी स्पष्ट व निःसंदिग्धपणे सांगितले, की तिने अगदी मनापासून प्रत्यक्ष कृष्णालाच पती म्हणून वरलेले आहे आणि कृष्णाशीच विवाह करण्याचा तिचा पूर्ण निश्चय झालेला आहे. रूक्मिणीची ही पसंती पाहून आम्हा उभयतांना तर अत्यंत आनंदच झाला. कारण कृष्णासारखा रूपवान, सर्वगुणसंपन्न व पराक्रमी असा दुसरा कोणीही पुरूष या भूतलावर नाही हे आपणही जाणून आहात. त्यामुळे आम्ही रूक्मिणीच्या पसंतीला अत्यंत आनंदाने तात्काळ अनुमोदन दिले. पण रूक्मिणीच्या या निर्णयासंबंधी जेव्हा मी माझा पुत्र रूक्मी याच्याशी बोललो तेव्हा त्याने मात्र त्याला अगदी कडाडून विरोध केला. एवढेच नव्हे, तर त्याने दुष्ट व खलप्रवृत्तीच्या शिशुपालाशी रूक्मिणीचा विवाह करण्याचा निश्चय केला आहे. नव्हे, तसा त्याचा दुराग्रहच आहे आणि कोणत्याही परिस्थितीत त्याचा हट्ट तो पुरा करणारच असा त्याने चंगच बांधला आहे. यासंबंधी रूक्मीची भूमिका अत्यंत अटीतटीची अशीच आहे. त्यासाठी तो कोणत्याही टोकाला जाईल याची मला पक्की खात्री आहे. कारण त्याचा दुष्ट स्वभाव मी जाणून आहे.

मुनिवर्य, रूक्मीसारखा दुराचारी पुत्र माझ्या पोटी जन्माला यावा या गोष्टीची खंत सतत माझ्या मनाला सलत असते. खरे तर रूक्मी व रूक्मिणी या आमच्या दोन्ही अपत्यांवर आम्ही सारखेच संस्कार केले. अगदी लहानपणापासूनच त्यांना सदाचार, नम्रता, विवेक इत्यादी गोष्टींचे महत्त्व आम्ही सांगत आलो आणि त्या गोष्टींचा आग्रहही धरीत आलो. त्याचा योग्य तो परिणाम रूक्मिणीवरती झाला याचे आम्हाला नेहमीच कौतुक वाटत आलेले आहे. रूक्मिणीचा सुशील व शांत स्वभाव, तिची शालीनता व सेवाभाव आणि त्याहीपेक्षा सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तिच्या ठिकाणी असलेली ईश्वरावरची नितांत श्रद्धा व विश्वास पाहिला की आम्हाला विशेष आनंद होतो. रूक्मिणीच्या ठायीचे सद्‌गुण व तिची सत्प्रवृत्ती पाहून तर आमचे मन अगदी भरून येते. पण त्याच वेळी रूक्मीकडे पाहिले की मात्र अत्यंत वाईट वाटते आणि मनाला उद्विग्नताही येते. आपले काय चुकले या विचाराने मनाचा गोंधळ होतो. पण काही इलाजच चालत नाही. कितीही वेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी रूक्मीची काही समजूत पटतच नाही. किंबहुना तो काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीतच नसतो. त्यामुळे त्याच्याशी संवाद असा कधी होतच नाही. झाला तर केवळ वादच होतो ज्यातून फक्त मनस्तापच होतो. शेवटी आपले नशीबच खोटे असे म्हणून आम्ही स्वस्थ बसतो खरे, पण मनाची अस्वस्थता मात्र बिलकूल कमीच होत नाही. आज आपले चरण मोठ्या भाग्याने आमच्या घरी लागले आणि माझे मन आपल्या चरणी पूर्णपणे मोकळे झाले. तरी आपण माझ्या मनाला शांत करा आणि प्राप्त परिस्थितीतून सुटण्याचा योग्य मार्ग दाखवा अशी आपल्या चरणी नम्रपणे प्रार्थना करीत आहे.”



असे म्हणत म्हणतच भीष्मकाने आपले मस्तक गर्ग मुनींच्या चरणांवर ठेवले आणि आपल्या अश्रूंनी त्यांचे चरण पूर्णपणे भिजवले. गर्ग मुनींनी अत्यंत प्रेमाने भीष्मकाच्या मस्तकावरून व पाठीवरून हात फिरवला आणि त्याचे सांत्वन केले. नंतर गर्ग मुनींनी आपल्या दोन्ही हातांनी भीष्मकाला उठवून आपल्या सन्मुख बसवले आणि त्याच्याशी बोलण्यास सुरूवात केली,

“ अरे भीष्मका, तुझे दुःख व व्यथा मी निश्चितच समजू शकतो. परंतु तुझ्या शोकाला आता आवर घालून तुझ्या मनाला सावर बघू. म्हणजे आता मी जे काही तुला सांगणार आहे ते ऐकण्यासाठी तुझे मन सावध व तत्पर होईल. एक गोष्ट लक्षात ठेव की ईश्वराला स्मरून आपले कर्तव्यकर्म जास्तीत जास्त योग्य प्रकारे पार पाडणे, एवढेच आपल्याला शक्य आहे. कारण तेवढेच आपल्या हातात आहे. पण त्याचबरोबर ते कर्तव्यकर्म संपवून त्यातून मनानेही पार पडणे हेही तेवढेच आवश्यक आहे. नाहीतर कर्तव्यकर्माच्या अपेक्षित फळाच्या इच्छेने आपले मन त्याच्यात गुंतून राहील आणि अपेक्षाभंगाच्या दुःखाला आपल्याला सामोरे जावे लागेल. त्यासाठी ईश्वरावरच आत्यंतिक श्रद्धा हवी. कारण प्रयत्न जरी आपण करीत असलो तरी त्याचे फळ मात्र ईश्वराच्या नियतीनुसारच मिळत असते. ज्याच्या त्याच्या प्रारब्ध भोगाप्रमाणे ज्याच्या त्याच्या वाट्याला तसे तसे फळ येते. आपण केवळ निमित्तमात्रच असतो. पण आपल्या कर्तव्यकर्मातच जीवनाची सर्व इतिकर्तव्यता आहे असे मात्र मुळीच नाही.

केवळ कर्तव्य करून कर्तव्यपूर्तीचे थोडेसे व काल्पनिक समाधान थोडा वेळ मिळू शकेल, पण त्यातून मनाची शांती व आनंद मात्र कधीच मिळणार नाही आणि ईश्वरी सत्तेत मानवी जीवन तर आनंदाचा अनुभव घेण्यासाठीच मिळालेले आहे. त्यासाठी ईश्वराची भक्तीच घडावयास हवी आणि त्याआधी त्या ईश्वरावरती अत्यंत मनापासून आत्यंतिक प्रेमच जडावयास हवे. अशा ईश्वरी प्रेमाचा अनुभव ईश्वरी स्वरूपाशी ऐक्य पावून, प्रेमस्वरूप होऊन राहिलेल्या ईश्वरी भक्तांच्या रूपानेच मिळतो. असे महात्मे ईश्वराच्या नियतीलाही जाणत असतात आणि त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या मनोव्यथाही त्यांना जाणवत असतात. त्यातूनच त्यांच्या प्रेमळ अंतःकरणाच्या ठायी दयाच निर्माण होते आणि अज्ञानाने कर्तव्यकर्माच्या गुंत्यात अडकलेल्या मनाची सुटका, ते मनाला सुबोध देऊन मोठ्या कौशल्याने करतात. सामान्यांविषयी असलेल्या आत्यंतिक आपलेपणातूनच त्या महात्म्यांकडून असे कल्याणकारी कार्य घडत असते.


अरे भीष्मका, तू व तुझ्या पत्नीने तुमच्या दोन्ही मुलांवरती सारखेच सुसंस्कार केलेत आणि आपले कर्तव्यकर्म अगदी योग्य प्रकारे पार पाडलेत. तरीही त्याचे परिणाम मात्र अगदीच भिन्न झालेले तुमच्या अनुभवास आले. त्यात तुमचा

तर काहीच दोषही नाही आणि तुम्हाला त्याचे काही श्रेयही नाही. कारण संस्कार हे बीजासारखे असतात. ज्याप्रमाणे बीज फलरूप होण्यासाठी योग्य भूमी, अनुकूल हवामान आणि त्याची योग्य मशागत ही आवश्यक असते, अगदी त्याचप्रमाणे संस्कार फलरूप होण्यासाठी मनाची सात्विक वृत्ती, सत्संगती, आणि सन्मार्गदर्शन हे अत्यंत आवश्यक असते. या पूरक व पोषक गोष्टींच्या अभावी चांगले संस्कारही फुकट जाऊ शकतात. नेमके हेच रूक्मिच्या बाबतीत घडलेले आहे.

रूक्मिणीची मूळची सात्विक मनोभूमी ही सुसंस्कारांसाठी पहिल्यापासूनच अनुकूल होती. त्यातून तिला तुमच्या नित्य सहवासाची व मार्गदर्शनाची जोड मिळाली. त्यामुळे ते संस्कार रूक्मिणीच्या ठिकाणी खोलवर तर रूजलेच, पण तिच्या आचार विचारातूनही अगदी सहजपणे साकार होत राहिले आणि तिच्या ठायीच्या सात्विक भावाचे योग्य संवर्धन होऊन तो भाव धष्टपुष्ट होऊन राहिला. या सात्विक भावाच्या बळावरतीच योग्यायोग्यतेचे यथार्थ मूल्यमापन रूक्मिणीकडून जाणले जात आहे आणि तिच्याकडून सात्विक मूल्यांना जीवनामध्ये प्राधान्य दिले जात आहे. या बाबतीत रूक्मिणीच्या मनाचा पूर्णपणे निश्चय झालेला आहे आणि तिची सद्बुद्धीसुद्धा तोच निर्णय घेते. म्हणूनच रूक्मिणी तिच्या निश्चयावर व तिच्या निर्णयावर नेहमीच ठाम राहते. तेव्हा या सर्व दृष्टीनेच विचार करता रूक्मिणीचा कृष्णाशीच विवाह करण्याचा निश्चय व निर्णय सर्वतोपरीने योग्यच आहे यात तिळमात्रही संदेहाला किंवा शंकेला जागाच नाही.

भीष्मका, आता रूक्मिच्या विषयी विचार केला तर एक गोष्ट तुझ्याही लक्षात येईल की रूक्मीचा मूळ स्वभाव हा रजोगुणी आहे. सुखासीन वृत्तीमुळे सदैव सुखोपभोगाकडेच त्याच्या मनाचा सहजपणे कल असतो. विषयसुखाच्या विचारातच त्याचे मन नित्य रमलेले असते आणि हर एक प्रकारे विविध विषयसुख अनुभवण्याच्या प्रयत्नांतच तो असतो. या विषयलोलुपतेतूनच रूक्मिला विषयांधपण आलेले आहे आणि त्याचा स्वार्थीपणा व हट्टीपणा अगदी टोकाला गेलेला आहे. त्यामुळेच त्याच्या स्वार्थाला जरा जरी धक्का लागला किंवा त्याच्या स्वार्थाच्या आड जरा जरी काही आले की त्याची परिणती रूक्मीचा तमोगुण बळावण्यात होते. मग एकदा का तो या तमोगुणाच्या आहारी गेला की त्याची निष्पत्ती त्याच्याकडून रागावण्यात व चिडण्यात होते. त्या भरात त्याच्या मनाचा तोल पूर्णपणे जातो आणि त्याच्याकडून अद्वातद्वा बोलणे घडते. त्यावेळेस रूक्मिच्या ठायीचा विवेक तर पूर्णपणेच नष्ट झालेला असतो आणि त्याच्या मनाची पूर्ण अधोगतीच झालेली असते.

हे राजन्, अशा वेळेस मनाची ती अधोगती थांबवून त्याला सावरून धरण्यासाठीच सत्संगतीची व सन्मार्गदर्शकाची आवश्यकता असते. पण रूक्मिच्या



बाबतीत नेमके उलटेच घडते. त्याच्या स्वभावानुसार त्याला बाहेरची संगती सुद्धा रजोगुणी व तमोगुणी लोकांची लाभलेली आहे. शिशुपालासारखा दुराचारी, रूक्मिचा अत्यंत जवळचा मित्र आहे आणि जरासंधासारख्या दुर्जनाला तो आदर्श मानत आहे. त्यामुळे तुझ्याकडून काहीही मार्गदर्शन न घेता तो शिशुपाल व जरासंध यांच्याशीच सर्व विचारविनिमय करतो आणि त्यांच्या सांगण्यानुसार सर्व निर्णय घेतो. ते दोघेही दुष्ट व राक्षसीवृत्तीचे असल्यामुळे त्यांच्याकडून रूक्मिच्या मनात विषच भरले जाते आणि त्यामुळे रूक्मिच्या ठिकाणच्या खलप्रवृत्तीला आणखीन खतपाणीच मिळाल्यासारखे होते. एक गोष्ट लक्षात ठेव की सद्‌गुणांना वाढायला बराच वेळ लागतो पण दुर्गुण व दुष्प्रवृत्ती मात्र अत्यंत झपाट्याने वाढतात आणि क्षणार्धात सर्व अंतराला व्यापून टाकतात. त्यांचे सर्वांगातच जणू विष भिनल्यासारखे होते आणि वागण्याबोलण्यातून केवळ तेच प्रगट होत राहते. अशा अधोगतीमधून त्या लोकांची सुटका केवळ मृत्यूच करू शकतो. पण ती सुटका सुद्धा फक्त तात्पुरतीच असते. कारण जन्ममृत्यूच्या फेऱ्यांमधून काही त्यांची सुटका होऊ शकत नाही आणि पुढील जन्मातही त्यांची अधोगती चालूच राहते.

हे भीष्मका, अशा दुष्ट व राक्षसी वृत्तीच्या लोकांचा पराभव करून त्यांच्यावर जय मिळवणे अत्यंत कठीण असते. ते सामान्यांच्या आवाक्याबाहेरीलच आहे हे खरे आहे. त्यासाठी कृष्णासारखी पराक्रमी व दैवी गुणांनी युक्त असलेली व्यक्तीच हवी. पण म्हणून सामान्यांनी अशा लोकांपुढे स्वतःची हार मानून त्यांची मात होऊ देणे हेही योग्यच नव्हे. स्वकर्तृत्वाने व स्वप्रयत्नाने सज्जनांनी अशा दुर्जनांना एक तर दूर केले पाहिजे, नाही तर त्यांच्यापासून स्वतः तरी स्वतःला दूर केले पाहिजे. त्यासाठी शक्तीपेक्षा युक्तीला प्राधान्य दिले तर ती गोष्ट साधणे सहज शक्य आहे. येथे तर एका बाजूला स्वतः कृष्णच आहे. त्यामुळे कृष्णावरतीच पूर्ण भरवसा ठेवून जर युक्तीने प्रयत्न केले तर यशाची खात्रीही निश्चितच आहे.


हे राजन्, तू आता एक गोष्ट कर की पुन्हा एकदा रूक्मिशी बोल. त्याच्याशी जास्त वाद न घालता त्याला एकच गोष्ट सांग की ‘रूक्मी व रूक्मिणी या उभयतांचे म्हणणे ऐकून पूर्ण विचारांती तू रूक्मिणीचे ‘स्वयंवर’ करण्याचा निर्णय घेतलेला आहेस.’ त्या स्वयंवराला सर्व राजांना व राजपुत्रांना आमंत्रण पाठवले जाईल. प्रत्यक्ष स्वयंवर मंडपात रूक्मिणी स्वतः सर्व राजांना पाहून त्यांच्या विषयीची सर्व माहिती जाणून घेईल आणि मग ती स्वतः वरनिवडीचा तिचा निर्णय सर्वांसमक्ष तेथल्या तेथे जाहीर करील. रूक्मिणीचा तो निर्णय सर्वांना संमत असेल आणि त्या निर्णयाचा आदर करण्याचे बंधन सर्वांवर राहील. त्यानंतर रूक्मिणीचा विवाहही त्याचवेळी, त्याच मंडपात सन्मानपूर्वक साजरा केला जाईल. कोणत्याही परिस्थितीत रूक्मिणीचा विवाह होणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी हा

एकीएक उपलब्ध असलेला तिच्या स्वयंवराचाच पर्याय योग्य आहे. तेव्हा आता मनाची दोलायमान स्थिती बाजूला करून आधी तुझे मन स्थिर कर आणि माझ्या सांगण्यानुसार कृती करायला त्वरित सुरूवात कर. परमेश्वराच्या सत्तेत सर्व काही व्यवस्थित व ठीकच होईल अशी श्रध्दा ठेव. माझे तुला पूर्ण आशीर्वाद आहेतच. 'तुमचे कर्तव्यकर्म योग्य प्रकारे पार पाडण्याचे मनोबळ तुम्हा सर्वांनाच मिळो आणि तुम्हा सर्वांना सद्बुध्दीचा लाभ होऊन रक्षण प्राप्त होवो' हीच व एवढीच माझी तुम्हाला हार्दिक सदिच्छा. शुभं भवतु! कल्याणमस्तु!!"

असे म्हणत गर्ग मुनींनी स्वतःचे दोन्ही हात वर करून सर्वांसाठीच शुभ चिंतिले आणि स्वतःचे नेत्र मिटून घेवून ते स्वस्थ बसले. राजा भीष्मकाने राणी शुद्धमतीसह गर्गमुनींना साष्टांग वंदन केले.

तेवढ्यात तेथे रूक्मिणीचेही आगमन झाले. गर्ग मुनींना पाहून ती लागलीच पुढे झाली आणि तिने त्यांच्या चरणांना स्पर्श करून वंदन केले. रूक्मिणीच्या स्पर्शातील भाव गर्ग मुनींच्या अंतःकरणालाही स्पर्शित करता झाला आणि देहभानावर येऊन त्यांनी आपले नेत्र अलगदपणे उघडले. समोर रूक्मिणीची भावपूर्ण मुद्रा पाहून गर्ग मुनींचे चित्त प्रसन्न झाले. त्यांनी नेत्रखुणेनेच भीष्मक व शुद्धमती यांना तेथून निघण्याची खूण केली असता गर्ग मुनींचा संकेत ओळखून त्या उभयतांनी तेथून निघण्याचे केले. गर्ग मुनींनी रूक्मिणीला प्रेमाने आपल्या जवळ बसवून घेतले आणि तिच्या मस्तकाचे अवघ्राण करून ते प्रेमाने कुरवाळले. गर्ग मुनींच्या प्रेमवात्सल्याने रूक्मिणीही सुखावली आणि तिचे मन व नेत्र दोन्ही भरून आले. थोड्यावेळाने गर्ग मुनी स्वतःहूनच अत्यंत मृदु वचनांनी रूक्मिणीशी हळुवार स्वरात बोलू लागले,

"अगं रूक्मिणी, माझे आशीर्वाद तर तुला आहेतच पण माझ्याठिकाणी तुझ्याविषयी अत्यंत कौतुकही आहे. मी आता तुझ्या विवाहाविषयीच तुझ्या पित्याशी बोलत होतो. तुझे मन कृष्णाच्या ठिकाणी गेलेले आहे आणि त्याच्याशीच विवाह करण्याचा तुझ्या मनाचा निश्चय झालेला आहे हे जेव्हा मला भीष्मकाकडून कळले, तेव्हा मला तर अतिशय आनंद झाला. कारण हे सर्व ईश्वरी संकेतानुसारच घडत आहे अशी माझी मनोमन खात्री आहे. माझे अंतःकरणही मला तीच ग्वाही देत आहे. अर्थात हा विवाह होण्यामध्ये अनेक अडचणी दिसत आहेत आणि एखादवेळेस पुढे अनेक अडथळेही येतील. परंतु कोणत्याही परिस्थितीत सर्व संकटांवर मात होऊन तुझा कृष्णाशी विवाह होणारच होणार याची तू खात्री बाळग. त्यामुळे विवाह होईपर्यंत तुझी कसोटीच लागणार आहे आणि त्यात तू पूर्णपणे यशस्वी होणार आहेस हे सत्य आहे, कारण ईश्वराची नियतीच तशी आहे.



हे रूक्मिणी, मला तुला आणखीन एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. ज्या कृष्णावर तुझे मन गेले आहे आणि ज्या कृष्णाची गुणकीर्ती केवळ श्रवण करूनच तू त्याला मनातून आधीच वरले आहेस, तो कृष्ण हा साक्षात् नारायणाचाच अवतार आहे. सद्धर्माचे उत्थापन करून अधर्माचे उच्चाटन करण्याच्या हेतूनेच हा कृष्ण मानवदेहाने येऊन कार्य करीत आहे. हे धर्मकार्य हेच त्याचे जीवन आहे आणि त्याचे जीवन हेच एक धर्मकार्य आहे. किंबहुना कृष्णाचे जीवन व त्याचे कार्य या दोन गोष्टी वेगवेगळया करताच येणार नाहीत. अशा कृष्णाच्या जीवनात तू त्याची पत्नी या नात्याने, त्याची सहधर्मचारिणी म्हणून प्रवेश करणार आहेस आणि ही साधी गोष्ट नाही आहे. कारण कृष्णाच्या कार्याप्रमाणेच त्याचे जीवनही अत्यंत व्यापक आहे आणि पुढेही ते अधिकाधिक व्यापक होत जाणार आहे.

कृष्णाच्या जीवनात त्याचा अनेक भिन्न भिन्न स्वभावाच्या चित्रविचित्र व्यक्तींशी संबंध येत असतो. त्यांच्यात काही सत्त्व, काही रज व काही तम अशा गुणांचे लोक असतात आणि या सर्वांशी तसे तसे वागून कृष्णाला त्या लोकांना कधी बाजूला करावे लागते, कधी त्यांचे साहाय्यही घ्यावे लागते तर कधी त्यांचा निःपातही करावा लागतो. त्याचे सूत्र कृष्णाच्या अंतःकरणात असते. परंतु सामान्यांच्या ते लक्षात न आल्यामुळे त्यांना काही वेळा कृष्णाचेच वागणे बोलणे विचित्र वाटते आणि कृष्ण त्यांच्या टीकेचे लक्ष्य ठरतो. असे अनेक लोकापवाद अनेकवेळा कृष्णाला सहन करावे लागले आहेत. परंतु कृष्णाचे अंतःकरण विशुद्ध असल्यामुळे त्याच्या ठिकाणी मात्र कधीच जराही कंप निर्माण होत नाही आणि आपल्या कार्यनिष्ठेपासून तो कधीही विचलित होत नाही.

हे रूक्मिणी, याहीपेक्षा विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाच्या अंतःकरणाची असलेली प्रेमस्वरूप अवस्था होय. ईश्वरी प्रेमाने भरून वाहणाऱ्या कृष्णाच्या सखोल अंतःकरणात सतत प्रेमऊर्मी निर्माण होत असतात आणि त्याच्या मनालाही व्यापून ठेवीत राहतात. त्यामुळेच आपल्याठायीच्या त्या ईश्वरी प्रेमाचा बाह्यांगानेही अनुभव घ्यावा अशी ऊर्मी कृष्णाच्या मनात सतत उठत राहते. तसा अनुभव घेण्यासाठी कृष्ण मग नेहमीच योग्य व्यक्तीच्या शोधात राहतो आणि भाग्याने त्याच्या सहवासात येणारी व्यक्ती ही योग्यच आहे असे मानून, कृष्ण त्या प्रत्येकाच्या सहवासात आपल्या प्रेमाचा अनुभव घेऊ पाहतो.

परंतु सर्वांनाच कृष्णाच्या अंतरीचे हे प्रेम पाहता येते किंवा कळते असे नाही. प्रत्येकजण त्याच्या त्याच्या भावनेनुसार व कल्पनेनुसार कृष्णाच्या प्रेमाचे वर्गीकरण करतात आणि तसा तसा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे होते काय? तर कृष्णप्रेम कुणाला कुठल्या तरी नात्याचे आहे असे वाटते, तर कुणाला ते प्रेम नात्यापरते आहे असे जाणवते. कुणाला तेच प्रेम मित्राचे आहे असे लक्षात येते,

तर कुणाला तेच प्रेम केवळ प्रेमासाठीचे प्रेमच आहे असेही अनुभवाला येते. परंतु या सर्व प्रकारच्या प्रेमाला अंतर्बाह्य मर्यादा पडतात आणि त्यामुळे कृष्णप्रेमासंबंधी काही समजुती व गैरसमजुतीही निर्माण होतात. त्याचीच परिणती काहीजणांकडून कृष्णालाच बोल लावण्यात अथवा त्याच्या प्रेमाविषयी शंका घेऊन त्यालाच दूषणे देण्यात होते आणि रूक्मिणी, याचवेळी तुझी भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

अगं रूक्मिणी, या सर्व प्रकारच्या व्यावहारिक पातळीवरती दिसणाऱ्या पण तरीही त्याच्या वरती असणाऱ्या कृष्णाच्या अंतःकरणातील विशुद्ध ईश्वरी प्रेमाची जाणीव ज्याला राहील, तोच कृष्णाचे अंतःकरण जाणू शकेल. तोच कृष्णाच्या नित्य जवळ राहून त्याच्या अंतःकरणाशी जवळीकता राखू शकेल आणि कृष्णाला खऱ्या अर्थाने प्रिय होऊन राहील. अशी कृष्णाची हृदयप्रिय सखी होऊन तुला रहायचे आहे आणि तूच तशी होऊ शकशील. कृष्णाची परमप्रिय आत्मसखी होऊन राहणे हे केवळ तुलाच शक्य आहे आणि तूच तशी होऊनही राहणार आहेस याची मला पूर्ण खात्री आहे. माझे तसे तुला पूर्ण आशीर्वादही आहेत.”

गर्ग मुनींचे बोलणे थांबण्याच्या आधीच रूक्मिणीने त्यांच्या चरणांवरती मस्तक ठेवून त्यांना वंदन केले. प्रेमाने भरलेल्या अंतःकरणाने व अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी रूक्मिणी आपले दोन्ही हात जोडून गर्ग मुनींच्या सन्मुख उभी राहिली. काही काळ कोणीच काही बोलले नाही पण शेवटी न राहवून रूक्मिणीच्या मुखातून शब्द प्रवाहित होऊ लागलेच.

“हे महामुनी, खरेच आपण अत्यंत थोर आहात. आपली थोरवी जाणणे वा तिचे वर्णन करणे हे माझ्यासारख्या एका पामर स्त्रीला कदापिही शक्य नाही हे मी पूर्णपणे समजून आहे. आपण आपले अंतःकरण मोकळे केलेत आणि त्या आपल्या अंतःकरणात माझ्याविषयी केवढे तरी व्यवधान आहे हे तर माझे परमभाग्यच आहे. म्हणूनच आपण मला आशीर्वाद देऊन त्याचबरोबर केवढे तरी बहुमोल मार्गदर्शन केलेत, त्याचेच महत्त्व माझ्यासाठी अधिक आहे.

आपण मला कृष्णाचे माहात्म्य व त्याच्या जीवनचरित्राचे जे गुज सांगितलेत ते तर माझ्यावर अत्यंत उपकारच आहेत. कारण त्यामुळे माझी कृष्णाकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक झाली. कृष्ण त्याचे रूप, गुण व कीर्ती यामुळे आधीच माझ्या मनात पूर्णपणाने भरलेला होता. माझ्यासाठी तो माझ्या अत्यंत प्रेमभावाचा होता. पण आता जे कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य आपण मला सांगितलेत, त्यामुळे तर कृष्ण माझ्यासाठी भक्तिभावाचा झालेला आहे आणि कृष्णाची भक्ती करून त्याला सदैव प्रसन्न राखणे हेच एकीएक प्राप्तव्य माझ्यासाठी उरलेले आहे. कृष्णाच्या अंतःकरणाशी ऐक्य पावणे हेच माझ्या जीवनाचे एकमेव

ध्येय होऊन राहिलेले आहे. तेव्हाच मला खऱ्या अर्थाने कृष्णाची प्राप्ती झाली असे म्हणता येईल आणि कृष्णप्राप्तीमध्येच माझ्या जीवनाची फलरूपता आहे याची मला पूर्ण खात्री आहे. आपले आशीर्वाद व मार्गदर्शन दोन्ही मला लाभलेले आहेच. आता कृष्णप्राप्तीचा ध्यास मी धरायचा आहे आणि त्यासाठी आवश्यक ते प्रयत्नही मीच करायचे आहेत. सुदैवाने मला माझ्या पित्याचे साहाय्य लाभत आहे. त्यांच्या पाठिंब्याने मी इतरांचा विरोध बाजूला करू शकेन आणि माझ्या प्रयत्नांत यशस्वी होईनच होईन असा माझा पूर्ण विश्वास आहे."

रूक्मिणीच्या शब्दाशब्दांतून तिच्या ठिकाणचा निश्चयच प्रतीत होत होता आणि त्याचेच गर्गमुनींना अत्यंत कौतुक वाटले. त्यांच्या स्मितहास्यातूनही तेच कौतुक व्यक्त झाले आणि शब्दरूपानेही तेच प्रगट होऊ लागले,


" शाब्बास! रूक्मिणी, शाब्बास!! तुझा हा निश्चयच तुझे मनोबळ कायम वाढवील. परंतु एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की ध्येय सिद्धीस जाण्यासाठी केवळ प्रयत्नच पुरेसे नाहीत, तर त्या प्रयत्नांना कौशल्याचीही जोड हवी. त्यासाठी युक्तियुक्तिनेच वागणे व बोलणे घडावयास हवे. सर्वात प्रथम म्हणजे आपल्या मनातील इच्छा प्रगट न करणे. जे काही आपण करायचे ठरवले असेल त्याची मुळीच वाच्यता करायची नाही. कारण त्यामुळे आपले विरोधक आधीच सावध होतात आणि आपल्या मार्गात अडचणी आणण्यास लगेचच सुरूवात करतात. त्याची परिणती म्हणजे आपल्या नियोजित योजना कोसळायला लागतात आणि आपल्या प्रयत्नांना खीळ बसू लागते. त्यामुळे आपले मनही निराश होऊन मनःस्वास्थ्यही बिघडते. मनाला काहीच सुचेनासे होते आणि प्रयत्नांचा मार्गही खुंटून राहतो. शेवटी आपणच आपल्या अपयशाचे कारण व धनी होऊन राहतो.

हे रूक्मिणी, म्हणूनच माझे तुला सांगणे आहे की यापुढे कृष्णाशी विवाह करण्याचा तुझा निश्चय बाह्यांगाने बोलून न दाखवता तुझ्या मनातच दृढपणे धरून ठेव. त्यासाठी कोणाच्याही नकळत तुझा ध्यास मनात धरून ठेव आणि परिस्थितीची अनुकूलता प्रयत्नपूर्वक राख. कार्य सिद्धीस नेण्यासाठी स्वतः कृष्णच समर्थ असल्यामुळे तुझ्या ध्यासाची पूर्ती त्याच्याकडूनच होईल आणि तशी ती होणारच आहे. कारण तीच व तशीच त्या ईश्वराची नियती आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हा विवाह होणार आहेच. त्या ईश्वरावरतीच तू पूर्ण विश्वास ठेव आणि तू स्वतः आत्मविश्वासाने रहा. यासंबंधी मी तुझ्या पित्याशी बोललोच आहे आणि त्याला तुझ्या स्वयंवराची योजना आखण्यास सांगितले आहे. त्या स्वयंवरात सर्व देशांच्या राजांना आमंत्रित केले जाईल. तेथे जमलेल्या सर्व राजांची ओळख व पारख करून घेऊन, तुझ्या मनपसंत राजाची वर म्हणून तूच निवड करावयाची आहेस. तू केलेल्या निवडीला संमती देण्याचे बंधन सर्वांवरतीच

राहील आणि त्याच सभामंडपात तुझा विवाहसोहळा सर्वांसमक्ष साजरा केला जाईल.

हे रूक्मिणी, या योजनेतील संभाव्य अडचणी तुझ्याही लक्षात आल्या असतीलच. पण ते गृहीत धरूनही हीच योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये तुझ्याच मनाप्रमाणे होण्याची शक्यताच अधिक आहे. फक्त तुला सर्वांसमक्ष कृष्णाची निवड करावी लागेल आणि तेवढे मनोबळ तुझ्याठिकाणी निश्चितपणे आहे, याची मला पूर्ण खात्री आहे. मात्र तोपर्यंत तू तुझ्या मनातील निर्णय कोणाही समोर व्यक्त तर करू नकोसच, पण उलट ' या विषयासंबंधी तुझे मन पूर्णपणे मोकळे आहे आणि सर्व बाजूंनी नीट विचार करूनच तू योग्य वेळी योग्य तो निर्णय घेशील ' असेच सर्वांना, अर्थात विशेषतः रूक्मिला भासवीत रहा. म्हणजे मग आत्तापासूनच उगाचच वितंडवाद होणार नाहीत आणि तुझे मन स्थिर राहील. त्याच बरोबर तुमच्या कुटुंबातीलही वातावरण, अगदी बाह्यांगाने का होईना, पण शांततेचे राहील. तुझा विवाह प्रत्यक्ष संपन्न होईपर्यंत ती गोष्ट अत्यंत आवश्यक व महत्त्वाची आहे हे लक्षात ठेव. तूही मनावर कोणतेही दडपण न घेता अगदी मनमोकळी रहा. शेवटी तुझ्या मनाप्रमाणेच सर्व काही होणार आहे याची खात्री बाळग. मात्र तोपर्यंत सावध, पण स्वस्थचित्त रहा. माझे तुला पूर्ण शुभाशीर्वाद आहेतच."

गर्ग मुनींचे बोलणे ऐकताना रूक्मिणीला त्यांचे माहात्म्य तर अधिकाधिक जाणवत होतेच, परंतु त्याचबरोबर त्यांच्या ठिकाणी तिच्याविषयीचा असलेला आत्यंतिक आपलेपणा पाहून रूक्मिणीचे अंतःकरण अगदी भरूनच आले. गर्ग मुनींच्या वचनाने रूक्मिणीचे मन आता पूर्णपणे निःशंक व मोकळे झाले होते. नजरेतील कृतज्ञभावाने रूक्मिणी गर्ग मुनींकडे बघत राहिली होती. तेवढ्यात गर्ग मुनी आपल्या आसनावरून त्वरेने ऊठून जाण्यास निघालेसुद्धा! भानावर येऊन रूक्मिणीही लगबगीने पुढे आली आणि तिने गर्ग मुनींच्या चरणांना वाकून नमस्कार केला. गर्ग मुनींनी प्रेमाने रूक्मिणीच्या मस्तकावर थोपटले आणि पाठीवरून हात फिरवला. पुढच्याच क्षणाला गर्ग मुनी राजवाड्याच्या बाहेर पडलेही. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून रूक्मिणीने आदराने आपले दोन्ही हात जोडले आणि फिरून महालाच्या आतमध्ये जाण्यासाठी ती वळली, तो तिचे पिता भीष्मक तेथे दारातच उभे होते. दोघांची नजरानजर झाली. दृष्टीभेटीतच उभयतांची मनेही परस्परांना कळली. शब्दांच्या उच्चाराचीही आवश्यकता कोणालाच वाटली नाही. किंचितशी स्मितरेषा उभयतांच्या मुखावर क्षणात चमकून गेली आणि भीष्मक व रूक्मिणी आपापल्या दिशेने निघून गेले."



*****

एवढा वेळ श्रवणभक्तीच्या आनंदात रममाण झालेले लक्ष्मीचे मन अवचितपणे भानावर आले. कारण लक्ष्मीच्या मनाची श्रवणातील समरसता कमी होऊ लागल्यामुळे तिची श्रवणाची एकाग्रताही ढळू लागली होती. मुख्य म्हणजे लक्ष्मीच्या हे लगेचच लक्षात आले. लक्ष्मीने पूर्वानुभवावरून ओळखले की तिच्या सुप्त मनात कोठेतरी काहीतरी विचार उद्भवले असणार. लक्ष्मी थोडीशी अंतर्मुख होऊन मनन करू लागली आणि तिच्या मनातील सुप्त विचार साकार होऊ लागले. मग त्या विचारांना शब्दरूप होण्यासाठी जराही वेळ लागला नाही. लक्ष्मीचे श्रवणाकडे पूर्णपणे लक्ष लागत नाही हे नारदाच्याही लक्षात आले होते आणि तोही थोडावेळ बोलायचा थांबलाच होता. लक्ष्मीकडे पाहून मंदस्मित करणाऱ्या नारदाकडे पाहून लक्ष्मीही थोडीशी हसली. लक्ष्मीच्या मनाची अवस्था नारदाने ओळखली आहे, याची लक्ष्मीने कौतुकाने दाद दिली आणि नारदाशी बोलावयास प्रारंभ केला,

“ हे नारदा, माझ्या श्रवणभक्तीला थोडीशी जरी बाधा आली तरी ते माझ्यापेक्षा तुझ्याच आधी लक्षात येते. एवढे तुझे अंतःकरण संवेदनशील आहे. तुझ्या मनात माझ्या मनाच्या अवस्थेचे विचार येऊ लागतात. त्यामुळेच तू देहभानावर येतोस आणि मुद्दाम माझ्याशी म्हणून बोलायला सुरूवात करतोस. तेव्हा मग माझ्याही लक्षात येते की माझे तुझ्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष देणे होऊ शकत नाही आहे आणि मी अंतर्मुख होऊन त्याच्या कारणाचा शोध घेऊ लागते. तेव्हाच माझ्या लक्षात येते की माझ्या मनात तू सांगत असलेल्या विषयासंबंधी काहीतरी वेगळयाच अंगाने विचार सुरू झालेले आहेत. तुझे निरूपण त्या अंगांना स्पर्श करून पुढे गेलेले असते. पण माझ्या मनातील ती अंगे मात्र जागी होऊन उत्तेजित झालेली असतात. त्यामुळे त्या अंगांचे शमन व समाधान झाल्याशिवाय माझे मन पुन्हा श्रवणात रमणार नाही हे खरेच आहे. त्यासाठी आधी मी माझे मन तुझ्यासमोर पूर्णपणे मोकळे करते. कारण तसे करणे हे आपल्या दोघांसाठीही अत्यंत आवश्यक आहे.

हे नारदा, आता मला निश्चित कारण माहीत आहे, की ज्यामुळे रूक्मिणीची व्यक्तिरेखा ही मला माझ्या अंतरात अत्यंत जवळची वाटत आहे. त्यामुळेच तू जे व जेवढे रूक्मिणीच्या भावाचे व स्वभावाचे वर्णन परोपरीने करून सांगत आहेस, ते व तेवढे माझ्या मनाला अधिकाधिक भावत आहे. रूक्मिणीचे प्रेमाने कृष्णावर गेलेले मन, कृष्णाशीच विवाह करण्याचा तिचा निश्चय, तिच्याठायी तोच लागून राहिलेला एकमेव ध्यास या सर्व गोष्टी अत्यंत कौतुकास्पद आहेतच. परंतु मला रूक्मिणीचे जरा जास्तच कौतुक वाटत आहे हे मात्र खरेच आहे आणि मला त्याचीच काळजी वाटत आहे. रूक्मिणीविषयीची ही भावनात्मकता


म्हणजे माझ्या मनाची दुर्बलता तर नाही ना, अशा विचाराने माझ्या मनाला मग थोडासा त्रासच जाणवू लागला आहे. मनाच्या अशा द्विधा स्थितीमुळेच माझे मन श्रवणाकडे पूर्णपणे लागू शकत नव्हते आणि माझा श्रवणानंद ओसरू लागला होता. तेव्हा नारदा, आता तूच सर्वकाही पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगून माझ्या मनाचा हा भ्रम दूर कर आणि माझ्या मनाला श्रवणासाठी पूर्णपणे मोकळे कर."

लक्ष्मीच्या बोलण्यावर क्षणभरच थांबून नारद अत्यंत मोकळेपणाने हसला आणि म्हणाला,

"अगं लक्ष्मी, तुझ्या मनाला जे वाटत आहे ते उगीचच नाही, तर ते अगदी खरेच आहे. कारण या नारायणाच्या संकल्पानुसार तूच रूक्मिणीच्या रूपाने भूतलावर जन्म घेतला होतास हे तर सत्यच आहे. म्हणूनच तर रूक्मिणीच्या ठिकाणी कृष्णाविषयी एवढी आंतरिक ओढ होती, जी तुझ्याठायी या नारायणाविषयी नित्यच व अगदी सहजपणे असते. त्यामुळेच साहजिकच तुलाही रूक्मिणीच्या विषयी एवढा आपलेपणा व जवळीकता जाणवत आहे. त्याचे गुजही हेच आहे आणि हे गुज तर मी तुला या आधीच सांगितलेले आहे. तेव्हा हे गुज आता मात्र तू अंतरात कायमचे धरून ठेव आणि रूक्मिणीच्या भावाशी तू पूर्णपणे समरस होऊन तिच्या अनुभवाशीही पूर्ण एकरूप हो."

नारदाचे बोलणे ऐकता ऐकताच लक्ष्मीचे मन भरून येत होते आणि तिच्या नेत्रांद्वारे वाहतही होते. त्या प्रेमाश्रुपूर्ण नेत्रांनी लक्ष्मी कितीतरी वेळ नारायणाकडे पाहतच राहिली. नारायण मात्र स्वतःच्या अंतःकरणात पूर्णपणे रममाण झालेला होता. त्याच्या मुखावर विलसत असलेली प्रसन्नता ही कोणत्याही बाह्य कारणांमुळे नव्हती, तर त्या नारायणाच्या अंतःकरणात नित्य व सहजतेने स्फुरणाऱ्या प्रेमचैतन्याचा तो सुंदर व रमणीय चिद्विलास होता. नारायणाच्या त्या अंतर्मुख अवस्थेशी ऐक्य पावणे तर शक्यच नाही हे लक्ष्मी पूर्णपणे जाणून होती. त्यामुळे नारायणाचे अगम्य स्वरूप प्रगट करणारे सुरम्य रूप नेत्रांद्वारे अंतरात साठवीत लक्ष्मी स्वस्थच बसून राहिली होती. परंतु तिच्या ठायी एक वेगळयाच प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली होती. त्यामुळे लक्ष्मीला स्वस्थही राहवेच ना. तिच्याही नकळतच तिच्या मुखातून शब्दप्रवाह बाहेर पडूच लागला,

"हे नारदा, या नारायणाची लीला खरोखरीच अत्यंत अद्भुतच आहे. तिचा व त्याचा दोघांचाही अंतपार लागणे अशक्यच आहे. त्याच्या प्रेमलीलांमध्ये सहभागी होऊन, प्रेमरसाचे सेवन करून नारायणाशी समरस होणे, हाच त्याच्याशी ऐक्य पावण्याचा एकमेव मार्ग उपलब्ध आहे आणि तोही त्याच्याच कृपेने.



नारायणाने त्याच्या सगुणचरित्रात आपल्याला अत्यंत प्रेमाने सहभाग दिला म्हणूनच केवळ ते शक्य आहे. त्याचबरोबर मला एक गोष्ट खात्रीपूर्वक उमजली आहे, की नारायणाच्या या रमणीय ध्यानाचा ध्यास जर चित्ताच्या ठायी नित्य जडला, तरच या नारायणाचे आपल्या ठायीचे स्वरूप जागे होऊन स्फुरू लागेल आणि त्याच्या स्वरूपाचा अनुभव आपल्या रोमरोमात संचारू लागेल. त्यासाठी आपल्याठायीची इतर सर्व व्यवधाने आधी बाजूला करून एकीएक नारायणाचेच व्यवधान घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण तरच त्याचे ध्यान आपल्या मनात जडेल. नंतर जेव्हा नारायणाच्या सर्व व्यवधानांची पूर्ती आपल्याकडून होईल तेव्हाच त्या नारायणाच्या स्वरूपाचा ध्यास आपल्या चित्ताठायी लागणे घडेल. पण नारायणाचे व्यवधान घेण्यासाठी व त्याचे ध्यान धरण्यासाठीही त्याचे चरित्ररूपाने प्रगट होणे अत्यंत आवश्यक आहे. तशी संधी मला या वैकुंठात मिळू शकत नाही हे खरे आहे. या ठिकाणी तसे नानाविध अंगाचे व रंगाचे नारायणाचे चरित्र प्रगटच होत नाही कारण ते या वैकुंठात आवश्यक नसते. परंतु तशी संधी मला या नारायणाच्या कृष्णावतारातील अद्‌भुत चरित्रात लाभली होती हे माझे परमभाग्यच म्हणावे लागेल.

हे नारदा, तू म्हणतोस ते खरेच आहे की जेव्हा जेव्हा तू रूक्मिणीविषयी बोलतोस किंवा नुसता रूक्मिणी हा शब्द देखील उच्चारतोस तेव्हा माझ्या अंतरात कुठेतरी एक तार छेडल्यासारखे मला जाणवते आणि त्याच्या मधुर नादाने माझे सर्व अंतःकरणच भरून राहते. त्याचे तू सांगितलेले गुज मी आता मात्र माझ्या अंतरात कायमचे धरून ठेवीन. माझा जो भाव वैकुंठात परिस्थितीमुळे अपुरा राहतो, त्याच भावाची पूर्ती करण्यासाठी ही सुवर्णसंधी मला केवळ या नारायणाच्या संकल्पाने व त्याच्याच ध्यासाने लाभली होती. तेव्हा रूक्मिणीच्या रूपाने मी तो ध्यास कसा घेतला आणि कृष्णरूपातील या नारायणाशी ऐक्य पावल्याचा आनंद मी स्वतः कसा अनुभवला आणि नारायणालाही तो आनंद अनुभवायला आणून देण्यासाठी मी कशी कारणीभूत झाले, हेच आता मला जाणून घ्यायचे आहे.

अरे नारदा, मला आणखीन एका गोष्टीविषयी कुतूहल वाटत आहे. जसे तू मला हे गुज सांगितलेस तसे ते गर्ग मुनींनीही त्या वेळेस रूक्मिणीला सांगितले असणारच. मग त्यावर रूक्मिणीची प्रतिक्रिया काय व कशी झाली बरे? मला खात्री आहे की रूक्मिणीलाही त्यावेळेस माझ्याप्रमाणेच आश्चर्याचा सुखद धक्का बसला असणार. पण ही गोष्ट कळल्यावर मात्र निश्चितच रूक्मिणीचे मनोबळ व धैर्यबळही वाढले असणार. कारण तिचा विवाह आता कोणत्याही परिस्थितीत कृष्णाशी होणारच, याविषयी रूक्मिणीची निश्चिती झाली असणार आणि तिच्या मनावरील

सर्व ताणही दूर झाला असणार. होय ना? तेव्हा कृष्ण व रूक्मिणी यांच्या विवाहापर्यंतचे सर्व कथाप्रसंग आता मला सलगतेने व सविस्तरपणे सांग बघू. तो सर्व इतिहास अत्यंत रोमांचकारी व श्रवणीय असणार याची मला अगदी खात्री आहे.”

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने किंचितसे स्मितहास्य केले आणि तो म्हणाला,

“अगं लक्ष्मी, ते तर आणखीन एक वेगळेच गुज आहे आणि ते तुला एखादेवेळेस अतिशय गमतीशीरही वाटेल. कारण खरी गोष्ट अशी आहे की गर्ग मुनींनी रूक्मिणीला ‘तिच्या रूपाने तूच म्हणजे लक्ष्मीच भूतलावरती आलेली आहे’ असे मुळी सांगितलेच नाही. अर्थात, ज्याअर्थी गर्ग मुनींकडून तसे रूक्मिणीला सांगणे घडले नाही त्याअर्थी ते तसे सांगणे हे अनावश्यकच होते हे तर अगदी सहज आहे. गर्ग मुनींच्या ठायीचा विचार हा सम्यकच असणार आणि म्हणूनच त्यांच्याकडून तसे घडले असणार. गर्ग मुनींचे अंतःकरण जाणल्यावरतीच त्या गोष्टींचा आपल्याला उलगडा होणार आहे.

हे लक्ष्मी, गर्ग मुनी त्यांच्या स्वानुभवाने निश्चितपणे जाणून होते की रूक्मिणीला तिच्या भावानुसार व स्वभावाप्रमाणेच अनुभव घेऊ देणे आवश्यक होते. कारण तरच रूक्मिणीला स्वानुभव घेणे शक्य झाले असते. स्वानुभवापर्यंत जाण्याचा तोच खरा मार्ग आहे. ध्येयाची निश्चिती झाल्यानंतर त्या ध्येयपूर्तीचा मार्ग ज्याने त्यानेच चोखाळला पाहिजे. म्हणजेच ज्याला त्याला येणाऱ्या मार्गातील अडचणीतून ज्याचा तोच उपाय शोधून काढतो आणि त्यातून आलेल्या अनुभवातूनच त्याची मार्गामध्ये पुढे पुढे वाटचाल होत राहते. अर्थात त्यासाठी सुयोग्य व अधिकारी अशा महात्म्यांना अनन्य भावाने शरण जाऊन, त्याच्याकडून आपल्या आत्मकल्याणाच्या मार्गाचे मार्गदर्शन मात्र निश्चित करून घेतले पाहिजे. या मार्गाने जाऊन ज्या भाग्यवंतांनी आपले आत्मकल्याण साधले त्यांचे अनुभव व त्यांचे जीवन सर्वांनाच निश्चितच प्रेरणादायी व स्फूर्तीदायक असते, परंतु दुसऱ्या कोणासाठी ते आदर्शवत असू शकत नाही. ही सर्वात महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कारण ती ती जीवनचरित्रे त्या त्या वेळच्या प्राप्त बाह्य परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार घडलेली असतात. त्यामुळे ती आत्ताच्या प्रत्यक्ष परिस्थितीत अनुकरणीय नसतात. किंबहुना तसे अनुकरण करण्याचा झालेला मोह हा चुकीचाच आहे. तसा केलेला प्रयत्न हा बऱ्याचदा घातकच ठरतो हेही इतिहासात वारंवार सिद्ध झालेले आहे.

हे लक्ष्मी, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर गर्ग मुनींनी हे गुज रूक्मिणीसाठी प्रगट केले असते, तर तिच्या मनावरती उगाचच एक प्रकारचा दबावही निर्माण होण्याची शक्यता होती. रूक्मिणीच्या ठिकाणी तुझ्याविषयी काहीतरी कल्पनाही तयार झाली असती आणि एखादे वेळेस तुझ्याविषयीची काहीतरी काल्पनिक प्रतिमा रूक्मिणी मनात धरून बसली असती. ‘आपण लक्ष्मी आहोत आणि म्हणून आपल्याला काहीतरी वेगळे वागायचे आहे’ अशा विचारांचे एक वृथा दडपणही रूक्मिणीच्या अंतर्मनावर, तिच्या नकळतपणे कायमचे राहिले असते.

या सर्व संभवनीय व अनावश्यक गोष्टी टाळण्याच्या अंतस्थ हेतूमुळेच गर्ग मुनींच्याकडून ते गुज प्रगट झालेच नाही. त्यांच्या अंतःकरणात तसा विचार किंवा तशी उर्मीसुद्धा निर्माण झालीच नाही. हे नवल नव्हे पण विशेष मात्र आहे. अशा विशुद्ध अंतःकरणाच्या अवस्थेतील गर्ग मुनींसारख्या महात्म्यांच्याकडूनच आत्मकल्याणाचा मार्ग खऱ्या अर्थाने प्रगट होत असतो हे मात्र खरे आहे. त्यांच्याच मार्गदर्शनानुसार त्या मार्गाने जाऊन स्वानुभवाचे ध्येय गाठण्याचा पराक्रम हा मात्र ज्याचा त्यालाच करावा लागतो. तसा पराक्रम रूक्मिणीकडून तिच्या पुढील जीवनात घडला म्हणून तर तिचे कौतुक आहे. एवढेच नव्हे, तर रूक्मिणीची कथा ही भक्तिमार्गाची वाटचाल करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी तर ठरलीच, परंतु त्यांच्यासाठी ती एक अभ्यासाचा विषयही होऊन राहिली.”


नारदाच्या बोलण्यावर लक्ष्मी गंमतीने हसून म्हणाली, “अरे नारदा, तू जेवढे रूक्मिणीचे कौतुक करशील तेवढे ते ऐकून मला तर अधिकच आनंद होणे साहजिकच आहे. हो की नाही? परंतु त्याहीपेक्षा मला जे माहात्म्य जाणवत आहे ते गर्ग मुनींचेच! त्यांच्या अंतःकरणाच्या अवस्थेविषयीचे माझे कुतूहल अधिकाधिक वाढतच आहे. एक तर त्यांचे अचानक भीष्मकाकडे जाणे; दुसरे म्हणजे त्यांचे भीष्मकाशी व रूक्मिणीशी झालेले बोलणे. त्यातूनही गर्ग मुनींनी भीष्मकाशी बोलताना त्याला फक्त त्याच्या अडचणींविषयी योग्य मार्गदर्शन केले आणि भीष्मकाच्या मनाची समजूत घालून त्याच्या दुःखी मनाला शांतवले. परंतु गर्ग मुनींनी भीष्मकाला कृष्णाच्या अवताराचे गुह्य व माहात्म्य काही सांगितले नाहीच. अर्थात् गर्ग मुनींनी भीष्मकाला महात्म्यांच्या संगतीचे व त्यांच्याकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचेही महत्त्व सांगितलेच. ते सर्व भीष्मकाला कळले खरे, परंतु ‘गर्ग मुनी हेच तसे महात्मे आहेत, त्यांचे माहात्म्य हे केवळ तात्पुरते मार्गदर्शन घेण्याएवढे

मर्यादित नसून, त्यांनाच अनन्यभावाने शरण जाऊन त्यांच्याकडून सत्यज्ञान प्राप्त करून घ्यावे आणि जीवनाचे कोडे कायमचे सोडवून घ्यावे' असे काही त्या भीष्मकाला वाटले नाही. बरे, गर्ग मुनींनीही भीष्मकाशी बोलताना प्रत्यक्ष स्वतःकडे असा निर्देश केला नाहीच. तसा संकेत जर त्यांनी केला असता, तर भीष्मकाच्या नक्कीच तो लक्षात आला असता आणि तो एखादेवेळेस गर्ग मुनींना शरणही गेला असता, नाही का?

हे नारदा, गर्ग मुनींनी रूक्मिणीला मात्र कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य आणि त्याचे अवतारचरित्र व कार्य या दोन्ही विषयी अगदी सविस्तर माहिती दिली. एवढेच नव्हे तर, कृष्णाचीच भक्ती करून त्याच्याशीच ऐक्य पावण्याचा भक्तीमार्ग त्यांनी रूक्मिणीला अगदी आवर्जून सांगून तिच्या ठिकाणी पूर्णपणे ठसविला आणि स्वतः मात्र पुन्हा त्यातून मोकळेच झाले. रूक्मिणीची कृष्णभेट होण्यापर्यंतची जबाबदारी काही त्यांनी घेतली नाही आणि तोपर्यंत गर्ग मुनी तेथे थांबलेही नाहीतच.

आणखीन एक गोष्ट म्हणजे रूक्मीशी काही बोलण्याचा व त्याची समजूत घालण्याचा गर्ग मुनींनी तर अजिबात प्रयत्न केला नाही. एखादे वेळेस गर्ग मुनी जर रूक्मिशी बोलले असते तर त्याच्या विचारसरणीत काहीतरी फरक पडलाही असता. काही सांगता येत नाही, हो ना? परंतु तसा थोडासाही प्रयत्न गर्ग मुनींनी केलाच नाही, असे म्हणण्यापेक्षा त्यांच्याकडून तो घडलाच नाही. याचे मात्र मला नवल वाटते आणि जरासे वाईटही वाटते. रूक्मिला एखादी तरी संधी गर्ग मुनींकडून मिळाली असती तर बरे झाले असते, नाही का? अर्थात असे घडले नाही आणि ते का घडले नसावे हे जाणून घ्यावे असे मात्र मला राहून राहून वाटत आहे. कारण गर्ग मुनींसारख्या महात्म्याचे विशुद्ध अंतःकरण जाणून घेण्यासाठी मला या सर्व गोष्टी समजून घेणे अत्यंत आवश्यक वाटते. नारदा, माझे हे वाटणे योग्यच आहे ना? तसे असल्यास मला सर्वकाही नीट समजावून सांगण्याचे तू करावेस अशी विनंतीच मी तुला करते."

लक्ष्मीने विचारपूर्वक विचारलेले प्रश्न ऐकून नारदाला लक्ष्मीचे कौतुक तर वाटलेच, पण तिच्यावर श्रवणाचा होत असलेला अपेक्षित परिणाम पाहून नारदाला समाधानही झाले. त्या दोन्ही गोष्टी नारदाच्या बोलण्यातून अगदी सहजपणे प्रगट होऊ लागल्या.



“अगं लक्ष्मी, तुझ्याकडून घडणारे श्रवण तुला विचाराला उद्युक्त करीत आहे हे तर चांगलेच लक्षण आहे. त्यामुळेच तू विचारलेले प्रश्न योग्यही आहेत आणि सखोलही आहेत. त्या प्रश्नांना केवळ वरवरची उत्तरे सांगून तुझ्या मनाचे समाधान होणे शक्यच नाही. कारण मुळातच हे प्रश्न महात्म्यांच्या अंतःकरणाविषयी आहेत आणि तो अंतःकरणाचा विषय हा तर सखोलच आहे. खरे तर, महात्म्यांच्या सखोल व गूढ अंतःकरणाचा थांगपत्ताही लागणे जेथे अशक्य आहे, तेथे त्यांचे अंतःकरण जाणण्याचा तर प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. कारण त्यांच्या अंतःकरणाची अवस्था ही मनाच्या कल्पनेच्या, तसेच बुद्धीच्या तर्काच्या व अभ्यासाच्याही पलीकडचीच आहे. पण तरीही ती अंतःकरणाची अगम्य अवस्था त्या महात्म्यांच्या वृत्तीनुसार काहीशी साकार होते आणि त्यांच्या स्वभावानुसार जराशी प्रगट होत असते. म्हणून तर त्या महात्म्यांच्या अंतःकरणाविषयी काहीतरी बोलता येते आणि सांगता येते.

हे लक्ष्मी, तुझा पहिला प्रश्न आहे तो गर्ग मुनींचे जे भीष्मकाच्या भेटीसाठी अवचित जाणे झाले त्यासंबंधीचा आहे. त्याविषयी एवढेच म्हणता येईल की गर्ग मुनींच्या अंतःकरणामध्ये अकल्पित व अकारण उठलेली ती एक ऊर्मी होती आणि त्या आंतरिक प्रेरणेला प्रमाण मानूनच गर्ग मुनींनी भीष्मकाच्या भेटीस जाण्याचे केले. कारण गर्ग मुनी स्वानुभवाने जाणून होते, की अशा ऊर्मी जरी पूर्वनियोजित नसल्या तरी ईश्वराच्या नियतीतील संकेतानुसारच निर्माण होत असतात. त्या ऊर्मीच्या मुळाशी कोणत्याही प्रकारचे व कोणाविषयीचेही वैयक्तिक कारण नसते. परंतु ईश्वरी नियतीत घडणाऱ्या पुढील घटनांसाठी त्या ऊर्मी सूचक व पूरक असतात. त्यामुळेच गर्ग मुनी जाणून होते की त्या प्रेरणेतून होणाऱ्या कृतीला ते केवळ निमित्तमात्रच होते आणि त्या कृतीतून निर्माण होणाऱ्या फळाशीही त्यांचा काहीच संबंधही नव्हता. ईश्वरी नियतीत घडणारी ती एक लीला म्हणूनच गर्ग मुनी त्या गोष्टीकडे बघत होते आणि त्याचा आनंद ते अगदी सहजतेने अनुभवत होते.


हे लक्ष्मी, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जरी गर्ग मुनींसारख्या महात्म्यांच्या अंतःकरणाठायी ईश्वरी स्वानुभवाची पूर्णावस्था असली, तरी ती अवस्था बाह्यांगाने नेहमीच पूर्णपणे प्रगट होतेच असेही नाही. बाह्य परिस्थिती, प्रसंग, व्यक्ती व त्या व्यक्तीचा भाव या गोष्टीही त्या प्रगटीकरणासाठी कारणीभूत व साहाय्यभूतही ठरत असतात. त्याही आधी त्या महात्म्यांची वृत्ती व स्वभाव ही मुख्य व मूळ कारणे असतातच. गर्ग मुनी व भीष्मक यांच्यातही नेमके तसेच घडले हे नीट विचार केल्यावर तुझ्याही लक्षात येईलच. गर्ग मुनी त्यांच्या ठायीच्या आंतरिक प्रेरणेनुसार भीष्मकाला जेव्हा भेटायला गेले तेव्हा पुढे काय घडणार आहे हे त्यांनाही ठाऊक नव्हतेच. परंतु परिस्थितीच्या कचाट्यात अडकून मनाचे स्वास्थ्य

पूर्णपणे हरवून बसलेल्या भीष्मकाला मात्र गर्ग मुनींच्या रूपाने आधार मिळाल्यासारखेच वाटले. त्याने आपल्या सर्व अडचणी गर्ग मुनींना सांगितल्या आणि त्याचे मन मोकळे झाले. गर्ग मुनींनीही त्याला धीर देऊन योग्य मार्गदर्शन केले आणि त्याला पेचप्रसंगातून सोडवले. भीष्मकाचेही मन शांत झाले आणि गर्ग मुनींवरती दृढ श्रद्धा ठेवून त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचा त्याचा निश्चय झाला.

हे लक्ष्मी, परंतु भीष्मकाच्या अडचणी या केवळ प्रापंचिकच होत्या. त्यामुळे गर्ग मुनींचे मार्गदर्शनही तेवढ्यापुरतेच व मर्यादितच राहिले. प्रापंचिकांना फक्त दुःखातून तात्कालिक सुटका व सुखाची प्राप्ती हवी असते. त्यामुळे जरी भाग्याने त्यांची कोणा महात्म्यांशी भेट झाली, तरी ते त्या महात्म्यांकडून दुखःमुक्तीसाठी व सुखप्राप्तीसाठीच आशीर्वाद मागतात. भीष्मकाचीही गर्ग मुनींकडून तेवढीच अपेक्षा होती आणि तेच त्याने मागितले. गर्ग मुनींचे कोमल अंतःकरण कळवळले. त्यांनी भीष्मकाच्या मनाला आधार देऊन शांतवले आणि निश्चित असे मार्गदर्शनही केले.

खरे तर, गर्ग मुनींनी त्याचवेळी भीष्मकाला 'ईश्वरी सत्ता, मानवी जीवनाचे महत्त्व, ईश्वरी भक्तीच्या आनंदानेच जीवनाची होणारी सार्थकता आणि त्यासाठी आवश्यक असलेले महात्म्यांचे मार्गदर्शन' या गोष्टीही बोलण्याच्या ओघात सूचकतेने सांगितल्या होत्याच. परंतु त्यावेळी भीष्मकाची मनःस्थिती ठीक नसल्यामुळे, ते सर्व ऐकूनही त्याचे मन मात्र त्या गोष्टींचा स्वीकार करू शकले नव्हते. म्हणूनच त्याने त्यासंबंधी गर्ग मुनींना आणखी काही विचारून जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. प्राप्त परिस्थितीतून सुटका कशी व कधी होईल या एकाच विवंचनेने भीष्मकाच्या मनाला ग्रासलेले होते. त्याची ही अवस्था गर्ग मुनींनी लगेचच ओळखली आणि म्हणून त्यांनीही तो विषय पुढे वाढवला नाही. कारण त्यामुळे भीष्मकाच्या मनावरील दडपण अधिकच वाढले असते आणि त्या ताणामुळे त्याची मनःस्थितीही अधिकच बिघडली असती. मनोभूमी सुयोग्य नसताना सुसंस्काराचे बीज जरी पेरले, तरी सत्संगती व ईश्वरी प्रेमाच्या अनुभवाच्या अभावी ते बीज मूळ न धरता सुकूनच जाते. भीष्मकाच्या ठिकाणीही गर्ग मुनींचे सांगणे विस्मरणाच्या ओघात वाहूनच गेले. गर्ग मुनी मात्र त्यांच्या धर्माला जागले आणि स्वतःच्या आनंदानुभवात निमग्न होऊन शांत व स्वस्थ राहिले.

हे लक्ष्मी, रूक्मिणीची गोष्ट मात्र अत्यंत वेगळीच होती. कारण तिच्या मनात रूपगुणांच्या आकर्षणाने व प्रेमाने सुद्धा, खुद्द कृष्णच भरला होता आणि कृष्णाची प्राप्ती हाच एकमेव ध्यास रूक्मिणीच्या ठिकाणी जडून राहिलेला होता. या तिच्या निश्चयाचे गर्ग मुनींना अत्यंत कौतुक व अप्रूप वाटले. पण त्याचबरोबर कृष्णप्राप्ती साधण्यामध्ये कितीतरी अडचणी आहेत हेसुद्धा गर्ग मुनी समजून होते.



म्हणूनच त्यांनी कृपावंत होऊन रूक्मिणीला त्यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन तर केलेच, पण त्याचबरोबर तिच्या मनाचे धैर्यबळही वाढवले.

गर्ग मुनींनी आणखीन एक सर्वात महत्त्वाची गोष्ट केली आणि ती म्हणजे त्यांनी रूक्मिणीला कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य सांगून त्याच्या अवतार चरित्राचे रहस्यही प्रगट केले. कारण गर्ग मुनी जाणून होते की जरी रूक्मिणीला बाह्यांगाने कृष्णाची प्राप्ती झाली, तरी रूक्मिणी खऱ्या अर्थाने कृष्णाची झाल्यावरच तिला कृष्णप्राप्तीचा खरा आनंद मिळणार होता. त्यासाठी रूक्मिणीने कृष्णाशी ऐक्य पावणेच आवश्यक होते आणि ते ऐक्य केवळ कृष्णाच्या भक्तीनेच शक्य झाले असते.

कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य गर्ग मुनींच्या मुखातून श्रवण केल्यावरच रूक्मिणीच्या ठिकाणी असलेल्या कृष्णाविषयीच्या प्रेमाचे रूपांतर कृष्णाच्या भक्तिभावात झाले. रूक्मिणीच्या मनात असलेल्या शुद्ध कृष्णप्रेमाठायी कृष्णभेटीची आणि कृष्णाशी ऐक्य पावण्याची आर्तता निर्माण झाली. कृष्णाच्या अंतःकरणाला प्रमाण मानून केवळ कृष्णासाठीच समर्पित भावाने जीवन जगण्याचा रूक्मिणीचा निश्चयही, गर्ग मुनींच्या सद्वचनांनीच झाला आणि गर्ग मुनींकडून ईश्वरी नियतीत घडणाऱ्या ईश्वरी कार्यातील त्यांचा सहभाग व सहयोग सहजपणे घडला. तेवढ्याच सहजपणे गर्ग मुनींना त्यांचा कार्यभाग पुरा झाल्याचे जाणवले. रूक्मिणीला आता कोणत्याही प्रकारच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाची किंवा मदतीची जरूरी नाही हे गर्ग मुनींच्या लगेचच लक्षात आले होते. कारण रूक्मिणीच्या ठायी झालेला कृष्णप्रेमाचा निश्चय व तिला जडलेला कृष्णप्राप्तीचा ध्यास गर्ग मुनींनी ओळखला होता. त्यामुळेच रूक्मिणी तिच्या ध्येयाप्रत जाण्यामध्ये निश्चितच यशस्वी होणार याची पूर्ण खात्री गर्ग मुनींच्याठायी होती. म्हणूनच गर्ग मुनींकडून तेथे पुढे थांबणे घडले नाही, तर घडलेल्या ईश्वरी लीलेचा आनंद गर्ग मुनींनी अनुभवला आणि पुन्हा आत्मानंदात रमून राहण्यासाठी ते मोकळे झाले.


हे लक्ष्मी, रूक्मिचा तर प्रश्नच निर्माण होत नव्हता. त्याच्या मनाची तर एवढी अधोगती झाली होती की त्याच्या ठिकाणचा तमोगुण अगदी पराकोटीला पोहोचला होता. अर्थात् तत्वतः सत्वगुणाची थोडीशी धुगधुगी त्याच्या ठिकाणी असणारच. परंतु त्या सत्वगुणापर्यंत पोचून त्याला धरणे व वाढवणे हे शक्यच नव्हते. कारण त्यासाठी रूक्मिचे स्वतःचे सहकार्य आवश्यक होते. परंतु तसे रूक्मिला स्वतःला वाटल्याशिवाय ते घडणे शक्यच नव्हते आणि रूक्मिला तसे वाटण्याची शक्यता मुळीच नव्हती. रूक्मिला स्वतःच्या वागण्या-बोलण्यात मुळी काही चुकीचे वा गैर आहे असे वाटतच नसल्यामुळे त्याला पश्चात्ताप होण्याची किंवा तो कोणाला शरणागती देऊन मार्गदर्शन करून घेण्याची शक्यता सुतरामही

नव्हती. त्यातूनही जर गर्ग मुनींनी आपणहून रूक्मिला बोलावून घेतले असते आणि त्याला काही सांगण्याचा प्रयत्न केला असता, तर त्याचा परिणाम उलटाच झाला असता. रूक्मिचा राग आगीत पडलेल्या तेलाप्रमाणे अधिकच उफाळून आला असता आणि त्या भरात त्याने गर्ग मुनींचा अवमान करण्यासही कमी केले नसते. त्यामुळे गर्ग मुनींच्या शांत वृत्तीला जरी बाधा आली नसती, तरी रूक्मिच्या पापकर्मात मात्र आणखीनच भर पडली असती आणि त्याची दुष्फळे पुन्हा रूक्मिलाच भोगावयास लागली असती. पुढे त्याला तशी ती भोगावी लागलीच हा भाग वेगळा! रूक्मिची अशी दुरावस्था गर्ग मुनी जाणून होते. त्यांच्या ठिकाणी त्याच्याविषयी दया व कळवळाही होता. परंतु गर्ग मुनी सुज्ञपणाने व विवेक बाळगून स्वस्थच राहिले आणि रूक्मिचे भवितव्य त्यांनी ईश्वरी नियतीवर सोपवले."

नारदाचे बोलणे ऐकून लक्ष्मीच्या मनाला झालेले समाधान तिच्या मुखावर स्पष्टपणे दिसत होते आणि ते पाहून नारदालाही होणारा संतोष त्याच्या मुखावर तेवढ्याच स्पष्टपणे दिसत होता. लक्ष्मीचे मन पुढील कथाभाग श्रवण करण्याच्या अवस्थेप्रत आलेले असून, तिच्या ठिकाणची आतुरता वाढलेली आहे हे लक्षात यायला नारदाला जराही वेळ लागला नाही. त्यामुळे क्षणभरही वाया न दवडता नारदाने बोलावयास सुरूवातच केली,

" हे लक्ष्मी, मला खात्री आहे की तुझे मन मोकळे होऊन कृष्णाच्या प्रेमाने व माहात्म्याने पूर्णपणे युक्त झालेले आहे आणि कृष्ण व रूक्मिणी यांच्या विवाहाची कथा ऐकण्यासाठीची तुझी उत्सुकता अगदी शिगेला पोहोचलेली आहे. माझ्या अंतःकरणातही तोच प्रसंग साकार होऊ लागलेला आहे आणि त्या कथेत भरलेला प्रेमरस शब्दरूपाने प्रगट होण्यासाठी अत्यंत अधीर झालेला आहे. कारण बुद्धीने कितीही गोष्टी समजून घेतल्या, तरी सगुणचरित्रातील अत्यंत मधुर अशा प्रेमरसाचे प्रत्यक्ष सेवन केल्याखेरीज मनाचे समाधान व तृप्ती होणार नाही ती नाहीच आणि प्रेमाच्या अनुभवामध्येच आनंदाचा अनुभव सामावलेला आहे, हे तर त्रिकालाबाधित सत्य आहे. तेव्हा आता त्या सुमधुर प्रेमरसाचे सेवन करण्यासाटी आपण उभयता सादर होऊया.

हे लक्ष्मी, गर्ग मुनींशी बोलणे झाल्यावर भीष्मकाचे मन पुष्कळसे स्थिर झाले आणि गर्ग मुनींनी केलेल्या मार्गदर्शनानुसार वागण्याचा त्याचा निश्चयही झाला. रूक्मिणीचा तर आधीच निश्चय झालेला होता. परंतु गर्ग मुनींकडून कृष्णाचे माहात्म्य ऐकल्यापासून रूक्मिणीच्या ठिकाणी एकीएक कृष्णप्राप्तीचाच ध्यास लागलेला होता. तरीही तिचे मन मात्र अत्यंत शांत व स्थिर होते. कारण गर्ग मुनींच्या सांगण्यातील बोध रूक्मिणीच्याठायी पूर्णपणे ठसलेला होता. गर्ग मुनींच्या



सांगण्यानुसार भीष्मकाने रूक्मिला आपल्या महालात बोलवून घेतले आणि तेथे उपस्थित असलेल्या राणी शुद्धमती व रूक्मिणी यांच्या देखतच रूक्मिणीच्या स्वयंवराचा घेतलेला निर्णय रूक्मिला कळीत केला.

अपेक्षेप्रमाणे रूक्मिची प्रतिक्रिया साहजिकच तीव्र संतापाचीच होती. परंतु भीष्मक स्वतःच्या निर्णयाशी खंबीर राहिला. त्याने रूक्मिला समजावून सांगितले की, “रूक्मिणीने कोणाशी विवाह करावा हा निर्णय अजून घेतलेला नाही. मग तो कृष्ण असो वा शिशुपाल असो. तिचे मन याविषयी खुले व मोकळे आहे आणि रूक्मिणी तिचा निर्णय प्रत्यक्ष स्वयंवराच्या मंडपातच, त्या वेळीच घेईल. तेव्हा राजपुरोहितांकडून शुभमुहूर्त निश्चित करून घेऊन शुभदिन ठरवूया आणि त्याप्रमाणे सर्व म्हणजे सर्व राजांना व राजपुत्रांना रूक्मिणीच्या स्वयंवराचे निमंत्रण पाठवण्याची व्यवस्था करू या.”


भीष्मकाचे असे निश्चयात्मक बोलणे ऐकून रूक्मिही थोडासा चकितच झाला. एरव्ही रूक्मिला थोडासा भिऊन व दबून वागणारा भीष्मक एकदम एवढा स्पष्टपणे व निःसंदिग्धपणे कसा काय बोलू लागला, अशा विचाराने रूक्मिलाही विस्मयच वाटला. सुरूवातीला रूक्मिच्या मनातील रागाचा जरी भडका उडाला तरी नंतर त्याने धोरणीपणा दाखवला. आत्तापासूनच विरोध न करता, मुख्य म्हणजे रूक्मिणी विवाहाला तयार झाली आहे या गोष्टीचा उपयोग करून घ्यावा असा विचार रूक्मिच्या मनाने केला आणि त्याने बाह्यकरणी तरी सामोपचाराने वागण्याचे ठरवले. ‘प्रत्यक्ष स्वयंवराच्या वेळी रूक्मिणीला शिशुपालाशीच विवाह करायला भाग पाडायचे’ असा मनोमनी निश्चय कायम ठेवून रूक्मी स्वस्थ बसला. रूक्मिच्या मनातील हा कावा भीष्मकाच्याही लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. परंतु ‘त्यावेळचे त्यावेळेस पाहून घेऊ. त्यावेळेस त्यातून काहीतरी मार्ग निश्चितच निघेल’ अशी खात्री मनात बाळगून आणि ईश्वरावरती पूर्ण भरवसा ठेवून भीष्मकही शांतच राहिला. त्यानेही उगाचच विषय न वाढवता संभाव्य कठीण प्रसंग टाळला म्हणण्यापेक्षा, त्याने तो धोरणीपणाने पुढे ढकलला असेच म्हणावे लागेल. रूक्मिणीही बाह्यांगाने शांत दिसत होती. परंतु अंतःकरणाच्या ठायी कृष्णाच्या प्रेमरूपाचे स्मरण कायम ठेवून कृष्णप्राप्तीचा निर्धार व ध्यास मात्र रूक्मिणीच्या ठायी पूर्णपणे होता.

हे लक्ष्मी, रूक्मिशी बोलणे झाल्यावर भीष्मकाचे मनोधैर्य अधिकच वाढले. ‘रूक्मिशी स्पष्टपणे बोलून आपण त्याला आपले म्हणणे मोकळेपणाने सांगू

शकलो' याचेच भीष्मकाला आधी नवल वाटले. पण त्याचबरोबर त्याचे मनोबळही वाढले आणि पुढील कृती करण्यासाठी तो सज्ज झाला. भीष्मकाने ताबडतोब आपल्या मंत्रिमंडळाची बैठक बोलावली आणि त्यांना रूक्मिणीच्या स्वयंवराची बातमी सांगितली. सर्वांनाच आनंद झाला आणि सर्वच जण मोठ्या उत्साहाने भीष्मकाच्या सांगण्यानुसार तयारीला लागले. राजपुरोहितांना विचारून शुभदिन व शुभमुहूर्तही निश्चित ठरला. देशोदेशींच्या राजांना व राजपुत्रांना आमंत्रणे पाठवण्यासही सुरूवात झाली. सर्वसाधारणपणे ती आमंत्रणे जरी दूतांमार्फत पत्रिका पाठवून करण्यात आली, तरी मान्यवर राजांना व सम्राटांना मात्र ही आमंत्रणे भीष्मकाने व्यक्तिगत संदेश पाठवून केली. रूक्मिने जरासंध व शिशुपाल इत्यादी त्याच्या खास संबंधितांना व्यक्तिशः भेटून रूक्मिणीच्या स्वयंवराचे आमंत्रण दिले. त्याचवेळी 'हे स्वयंवर हा तर एक बाह्य देखावा असून रूक्मिणीचा प्रत्यक्ष विवाह शिशुपालाशीच होणार आहे' अशी खात्री रूक्मी सर्वांनाच खाजगीत देत होता.

भीष्मक जाणून होता की रूक्मी यादवांकडे आमंत्रणासाठी जाणे कधीच शक्य नाही. म्हणून त्याने मथुराधिपती बलराम व कृष्ण यांना व्यक्तिगत आग्रहाचे पत्र व आमंत्रण पाठवून 'त्यांनी अगत्याने येण्याचे करावे' अशी प्रेमाची विनंतीही केली. बलरामाला या गोष्टीचे थोडेसे नवल वाटलेच. परंतु कृष्णाला मात्र त्या पत्रामागील हेतू लगेचच लक्षात आला. भीष्मकाच्या मनातून रूक्मिणी आपल्यालाच देण्याचे नक्की आहे हे कृष्णानेही ओळखले आणि त्याचे मनही प्रसन्न झाले. कारण रूक्मिणीविषयीच्या अनेक गोष्टी कृष्णाच्याही कानावर आल्या होत्याच. रूक्मिणीची सुंदरता, सोज्वळता, शालीनता व मुख्य म्हणजे सात्त्विकता या गुणांची कीर्ती सर्वत्रच पसरली होती. अनेक राजांच्या व राजपुत्रांच्या मनात रूक्मिणीच्या प्राप्तीची तीव्र इच्छा निर्माण झालेली होती. परंतु रूक्मिणीच्या मनात काय आहे याचा थांगपत्ता मात्र कोणालाच लागलेला नव्हता. रूक्मिणीच्या स्वयंवराची घोषणा झाल्यावर अनेकांच्या मनातील आशा पल्लवित झाल्या आणि रूक्मिणीच्या प्राप्तीचे मनातील मांडे खाण्यास त्यांनी सुरूवात सुद्धा केली.

हे लक्ष्मी, भीष्मकाच्या भेटीस जाऊन आलेली काही मंडळी कृष्णाच्या भेटीसही काही राजकीय कारणांमुळे येत असत. तेव्हा अनेकांच्या बोलण्यात भीष्मकाच्या सज्जनत्वाचा व सत्प्रवृत्तीचा उल्लेख जसा येत असे, तसा अगदी सहजपणे रूक्मिणीचा विषयही निघत असे. भीष्मकाच्या नित्य जवळ राहून अनेकांशी अनेक विषय बोलण्यामध्ये सहभागी होणारी रूक्मिणी, अशी तिची प्रतिमा सर्वांच्याच सांगण्यातून कृष्णाला जाणवत असे. त्यामुळे कृष्णाठायीही



रूक्मिणीविषयी एक प्रकारचे कुतूहल व आकर्षण निर्माण झालेले होतेच. पण जेव्हा सर्वांच्या बोलण्यातून रूक्मिणीच्या सद्‌गुणांची विशेष प्रशंसा प्रगट होत असे तेव्हा मात्र ‘अशीच सहधर्मचारिणी आपल्याला हवी’ असे कृष्णालाही मनोमनी वाटू लागले होते. एवढेच नव्हे तर, ‘आपण व रूक्मिणी हे एकमेकांसाठीच आहोत’ अशी खात्रीच कृष्णाला त्याच्या आंतरिक प्रेरणेतून जाणवू लागली होती. त्यामुळेच जेव्हा भीष्मकाकडून रूक्मिणीच्या स्वयंवराचे आग्रहपूर्वक आमंत्रण आले तेव्हा त्या स्वयंवराला जाण्याची तयारी कृष्णाने लागलीच सुरू केली सुद्धा! कारण त्याचा तसा निश्चय आधीपासूनच झालेला होता. बलरामाला मात्र कृष्णाचा हा उत्साह अनाकलनीय व जरा जास्तच वाटला. परंतु ‘कृष्णाने जे ठरवले ते ठरवलेच’ हा कृष्णाचा स्वभाव जाणून असलेला बलराम मग स्वस्थ बसून ‘आता काय होते’ ते फक्त पहात राहिला.


*****

## रुक्मिणीचे कृष्णाला प्रेमपत्र

हे लक्ष्मी, परंतु रूक्मिणीच्या मनातील तगमग मात्र हळूहळू वाढत होती. 'मी कृष्णाला मनातून आधीच वरले आहे आणि भर स्वयंवरातही मी कृष्णाच्याच कंठी वरमाला घालणार आहे हा तर माझा निश्चय झालेलाच आहे. परंतु कृष्णाची मनपसंती मला लाभेल का? कृष्ण स्वतः स्वयंवरासाठी निश्चितपणे येईल ना? असे माझ्यात काय आहे की कृष्णाने त्याची सर्व कामे बाजूला टाकावीत आणि माझ्या स्वयंवराला येण्यासाठी प्राधान्य द्यावे? जर कृष्ण प्रत्यक्ष स्वयंवराला उपस्थितच राहिला नाही तर मग माझे काय होणार? रूक्मिच्या जबरदस्तीपुढे मला माझी मान तुकवणे भाग पडेल काय? माझे तात त्यावेळेस काय भूमिका घेतील? त्यांचाही मग काही इलाजच चालला नाही तर?'

अशा अनेक विचारांनी रूक्मिणीच्या मनात अगदी काहूर माजले आणि तिच्या मनाची अस्वस्थता वाढतच राहिली. शेवटी रूक्मिणीने प्रयत्नपूर्वक तिच्या मनाला सावरले. कृष्णाच्या प्रेमाचे स्मरण करून गर्ग मुनींचे सांगणेही रूक्मिणीने तिच्या ठायी जागे केले. तेव्हा रूक्मिणीचे मन पुष्कळसे शांत व स्थिर झाले आणि प्राप्त परिस्थितीतील अडचणींवरचा उपाय तिला तिच्या दृष्टीसमोर दिसू लागला. प्रत्यक्ष कृष्णाशीच स्वतः संपर्क साधण्याचा रूक्मिणीने निश्चय केला आणि त्यासाठी तिने एक अभिनव मार्ग शोधून काढला. कृष्णाला एक व्यक्तिगत खाजगी पत्र गुप्तपणे पाठवण्याचे रूक्मिणीने ठरवले.

हे लक्ष्मी, तसे पहायला गेले तर रूक्मिणीचा हा निर्णय धाडसाचाच होता. कारण एक कुमारिका व तीही राजकन्या, एका अपरिचित पुरुषाला तिची प्रेमभावना व्यक्त करण्यासाठी एक खाजगी पत्र लिहिते, ही गोष्ट तर त्या वेळच्या जनरीतीच्या विरुद्धच होती. एवढेच नव्हे, तर त्या कृतीची संभावना एक दुष्कृत्य म्हणूनच केली गेली असती. सामान्य जनतेच्या दृष्टीने तर तो एक व्यभिचारच ठरला असता. त्यातूनही या गोष्टीचा जर गौप्यस्फोट झाला असता तर सर्वत्र हलकल्लोळच झाला असता. सर्व राजकुळालाच दूषण लागले गेले असते. स्वतः भीष्मकही या कृत्याचे समर्थन तर कधीच करू शकला नसता. त्यालाही त्या वेळच्या प्रचलित सामाजिक धर्मानुसार रूक्मिणीविरुद्ध कडक कारवाई करणे भागच पडले असते. रूक्मिच्या स्वभावानुसार तर रागाच्या भरात त्याच्याकडून काहीतरी



आततायी कृत्य निश्चितच घडले असते. रूक्मिणीच्याही ठिकाणी या सर्व संभाव्य अडचणींचा सम्यक विचार होताच. परंतु तरीही तिने केवढातरी धोका पत्करला याचे कौतुकच करावयास हवे. होय की नाही?"

बोलता बोलता नारदाच्या मुखातून रूक्मिणीविषयीचे कौतुक त्या प्रश्नोद्गारातूनच सहजपणे प्रगट झाले खरे, परंतु लक्ष्मीच्या मनाची झालेली अस्वस्थता काही लपून राहू शकली नाही. न राहवून लक्ष्मीच्या मुखातूनही तिच्या मनातील चलबिचल व्यक्त होऊ लागलीच,

"अरे नारदा, ही केवळ कौतुकाची गोष्ट नाही तर अत्यंत काळजीचीच बाब आहे. एवढा मोठा धोका पत्करण्याचा रूक्मिणीचा निर्णय हा मला तरी अनावश्यकच वाटतो. तिच्या मनाची अगतिकता मी समजू शकते. परंतु तरीही एवढी जोखीम स्वीकारणे खरेच जरूरीचे होते का? कारण रूक्मिणीचे एखादे पाऊलही जरी चुकून इकडे तिकडे झाले असते, तरी तिची सर्वच योजना कोसळली असती आणि सर्वच मुसळ केरात गेले असते. मग तिला कोणीच वाचवू शकले नसते, म्हणजे मला वाटते अगदी कृष्णही! त्यापेक्षा कृष्णावर श्रद्धा ठेवून व त्याचाच भरवसा धरून जर रूक्मिणी शांतपणे वाट पाहत राहिली असती, तर मला वाटते कृष्णाने तिची इच्छापूर्ती निश्चितपणे केली असती. थोडासा धीर धरून रूक्मिणीने कृष्णाला त्याचा पराक्रम दाखवण्याची संधी तरी द्यायला हवी होती. होय की नाही?"

नारदाचे आधीचे बोलणे ज्या प्रश्नोद्गाराने थांबले होते त्याच प्रश्नोद्गाराने लक्ष्मीचेही बोलणे थांबले. या योगायोगातील गंमत नारद व लक्ष्मी या उभयतांच्या लक्षात आली आणि ते थोडेसे हसले खरे, परंतु अगदी थोडा वेळच. दोघेही लगेचच गंभीरही झाले. कारण ते बोलत असलेला विषय हा गंभीरच होता आणि त्याविषयी गंभीरपणेच बोलणे आवश्यक होते. नारदानेही लागलीच गंभीरतेने बोलावयास सुरूवात केलीच,


"हे लक्ष्मी, सगुण भक्तिमार्गाचे हेच तर विशेषत्व आहे. त्यामध्ये भक्ताचाच पराक्रम प्रगट होत असतो. कारण ईश्वरप्राप्तीची आत्यंतिक तळमळ ही मुळात भक्ताच्या ठिकाणीच असते. ईश्वराच्या अनुभवलेल्या सगुण प्रेमातूनच असा भक्तिभाव भक्ताच्या ठायी निर्माण झालेला असतो आणि त्याची परिणती व पूर्ती केवळ ईश्वराच्या प्रत्यक्ष प्राप्तीमध्येच होत असते. त्यामुळे भक्तिभावामध्ये असलेली प्रेमाची उत्कटताच असा पराक्रम करायला भाग पाडते. कारण केवळ साध्या जुजबी

प्रयत्नाने ईश्वराची प्राप्ती होणे शक्यच नाही. त्यासाठी असाधारण प्रयत्नच घडावे लागतात हे सत्यच आहे. परंतु भक्तिमार्गातील प्रत्येक कृती ही जशी मनातील उत्कट प्रेमभावामुळे घडते, तसेच ती कृती कशी करावी याचा सुबोधही भक्ताच्या ठिकाणी जागृत असतो ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. या सुबोधामुळेच योग्य वेळी, योग्य कृती, योग्य प्रकारे घडते आणि भक्तांकडून पराक्रम घडतो. भक्तांचा असा पराक्रम पाहूनच ईश्वर भक्तांवर प्रसन्न होतो आणि स्वतःहूनच भक्तांच्या स्वाधीन होतो. कारण ईश्वर हा पराक्रमाचा भोक्ता आहे आणि ईश्वराच्या भक्तीने ईश्वराची प्राप्ती हाच मानव जन्मातील एकमेव पराक्रम आहे.

हे लक्ष्मी, कृष्णावरील भक्तिभावामुळे नेमका हाच पराक्रमाचा भाव रूक्मिणीच्या ठिकाणी जागृत झाला आणि ती त्या दृष्टीने प्रयत्न करायला उद्युक्त झाली. रूक्मिणीच्या भक्तिभावाची पूर्ती प्रत्यक्ष कृष्णच करू शकत होता हे तर सत्यच आहे. परंतु त्यासाठी व त्याआधी रूक्मिणीचा भाव कृष्णापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक होते. कृष्णाची प्रत्यक्ष भेट घेणे हे तर रूक्मिणीसाठी अशक्यच होते. म्हणूनच तिने मग पत्रभेटीचा मार्ग स्वीकारला. अर्थात्, त्यामध्ये जोखीम होती हे तर खरेच आहे. परंतु दुसरा काहीही पर्याय उपलब्धच नसल्यामुळे रूक्मिणीचाही नाईलाजच झाला. म्हणूनच तिने प्रत्यक्ष कृती मात्र पूर्ण आत्मविश्वासाने आणि मुख्यतः पूर्ण विवेकानेच केली.

रूक्मिणीने प्रथम राजवाड्यामध्ये नित्यनेम पूजाअर्चा करण्यासाठी येणाऱ्या सुदेव नावाच्या एका पुरोहिताला स्वतःच्या विश्वासात घेतले आणि त्याला आपल्या मनातील योजलेला बेत सांगितला. तो पुरोहितही रूक्मिणीच्या मनातील भाव ओळखून होता आणि मुख्य म्हणजे कृष्णाची थोरवी जाणून होता. त्यामुळेच तो पुरोहित रूक्मिणीची मदत करण्यास लागलीच तयार झाला. रूक्मिणीच्या कामामध्ये पूर्ण धोका आहे हे कळूनही तो पुरोहित ती जोखीम स्वीकारण्यास तयार झाला. कारण त्याच्या मनाची निश्चित खात्री होती की त्याच्याकडून एक सत्कर्मच घडत आहे आणि तो एका सत्कार्यालाच साहाय्यभूत होत आहे.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने कृष्णाला पत्र पाठविण्याची तजवीज केल्यावरती रूक्मिणी प्रत्यक्ष पत्र लिहिण्यासाठी सज्ज झाली. त्यासाठी तिने प्रथम आपल्या एका रेशमी वस्त्राचा एक भाग कापून वेगळा केला आणि स्वतःच्या हाताने नीट धुऊन पूर्ण स्वच्छ केला. नंतर त्या वस्त्रभागावरती वारंवार हात फिरवून रूक्मिणीने तो अत्यंत मुलायमही केला. रूक्मिणी रोज तिच्या कपाळी कुंकुमतिलक लावण्यासाठी म्हणून ज्या तांबड्या कुंकुमाचा उपयोग करीत असे तेच तिने पत्र लिहिण्यासाठी घेतले. रूक्मिणीने तिचे अत्यंत आवडते असलेले मोरपीस पत्रलिखाण करण्यासाठी म्हणून हातात घेतले मात्र, तिला तिच्या अत्यंत प्रिय अशा कृष्णाचे स्मरण झाले



आणि तिचे अंतःकरण कृष्णप्रेमाने एकदम भरूनच आले. खरे तर, रूक्मिणीने ना कधी कृष्णाला प्रत्यक्ष पाहिले होते, ना कधी ती त्याला प्रत्यक्ष भेटली होती. पण तरीही कृष्णाच्या रूपाचे गुणवर्णन अनेकांच्याकडून वारंवार केवळ ऐकूनच रूक्मिणीच्या मनात कृष्णाची प्रेमप्रतिमा पूर्णपणे भरून राहिली होती आणि तिचे मन तर कृष्णप्रेमातच सदैव बुडूनच राहिलेले असे. त्यामुळेच कृष्णप्रेमाचा उचंबळून आलेला रूक्मिणीचा भाव शब्दरूप होण्यास जराही वेळ लागला नाही आणि तिचा प्रेमभाव व्यक्त करण्यासाठी योग्य व अनुरूप शब्दांचा शोध घेण्याचीही वेळ रूक्मिणीवर आली नाही. रूक्मिणीचे कृष्णप्रेम व्यक्त करण्यासाठी शब्द जणू धावूनच आले आणि कृष्णप्रेमाने सजून साकार होऊ लागले.

"अहो कृष्णदेवा, माझ्या प्राणनाथा, कुंडीनपुरची राजकन्या रूक्मिणी ही आपणाला सर्वप्रथम मनोभावे वंदनच करते आणि आपणाला पत्र लिहिण्याचे असे धाडस केल्याबद्दल आपली मनःपूर्वक क्षमाच मागते. परंतु माझाही नाईलाजच झाला म्हणूनच केवळ हा मार्ग मी अंगीकारला आहे. तरी मला आपण समजून घ्यावे अशी विनंती मी मनोमनी तशी खात्री पूर्णपणे बाळगूनच करीत आहे. मला आपल्याला एवढेच सांगायचे आहे आणि एकच विनंती करायची आहे की 'मी आपणाला मनाने पूर्णतः वरले आहे, तरी आपण माझा पत्नी म्हणून स्वीकार करून मला उपकृत करावे' एवढीच प्रार्थना आहे.


अहो कृष्णदेवा, माझी ही विनंती आपणाला एखदेवेळेस विचित्र किंवा गंमतीचीही वाटेल. कारण माझी व आपली प्रत्यक्ष काहीही ओळख नसतानाही मी हे साहस करीत आहे. परंतु त्यामागचे प्रेरणास्थान तर केवळ आपण स्वतःच आहात. आपले रूप, गुण व सर्व चरित्र याची कीर्तीच अशी आहे की कोणाचेही मन आपल्याठायी अगदी सहजपणे लुब्ध होईल आणि त्याचा त्याला दोषही देता येणार नाही. आपण अनेकांसाठी आहात हे मी जाणून आहे. पण माझ्यासाठी मात्र आपण एकीएकच आहात.

हे प्राणनाथ, कदाचित आपल्याला ही माझी केवळ भावनात्मकताच आहे असे वाटेल. भावनेच्या भरातच हे पत्र मी लिहीत आहे असेही आपल्याला वाटू शकेल. परंतु एका गोष्टीची निश्चित खात्री बाळगा की हा निर्णय मी अत्यंत विचारपूर्वक घेतलेला आहे, पण हा विचार मात्र मी आपणाला योग्य आहे की नाही याच गोष्टीचा होता. कारण आपली योग्यता व श्रेष्ठता ही तर निर्विवादच आहे आणि ते ठरवण्याची माझी अजिबात लायकी नाही हेही मी जाणून आहे. भीष्मक राजाची कन्या या नात्याने अनेक थोर थोर अशा ऋषीमुनींच्या मुखातून आपले जीवनचरित्र व गुणकीर्ती श्रवण करण्याची संधी मला मोठ्या भाग्यानेच लाभली. तेव्हाच

तनमनाने ज्यांची सेवा जन्मभर करावी असे केवळ आपणच एकीएक आहात असा माझा दृढनिश्चय झाला. तसाच ध्यासही माझ्याठायी जडून राहिलेला आहे आणि त्याची पूर्ती केवळ आपणच, माझा पत्नी म्हणून स्वीकार करून करू शकता.

अहो कृष्णदेवा, पण जेव्हा प्रत्यक्ष गर्ग मुनींच्या मुखातून आपले माहात्म्य मी श्रवण केले, तेव्हापासून तर माझ्याठायी आपल्याविषयी एकीएक भक्तिभावच निर्माण होऊन राहिलेला आहे. माझ्या ध्यानी, मनी व व्यवधानीही केवळ आपणच असता. आता माझ्याकडून फक्त आपलीच पूजा व भक्ती घडावी आणि आपली माझ्यावरील प्रसन्नता मी अनुभवावी एवढाच ध्यास माझ्याठायी जडून राहिलेला आहे. कारण त्यामध्येच माझ्या जीवनाची सार्थकता व धन्यता आहे अशी माझी दृढ श्रद्धा आहे. तरीही आपण प्रत्यक्ष माझ्या स्वयंवराच्या वेळी उपस्थित राहण्याची कृपा करावी आणि आपल्याविषयीचा भाव सर्वांसमक्ष जाहीरपणे प्रगट करून आपणास वरण्याची संधी मला आपण द्यावी, अशी मी आपल्याकडे विनम्रपणे प्रार्थना करीत आहे. माझ्या स्वयंवराचे हे व्यक्तिगत आमंत्रण मी आत्यंतिक प्रेमाने करीत आहे त्याचा स्वीकार करावा ही विनंती. माझी प्रेमाची अर्जी मी आपल्या चरणी सादर केली आहे आणि आपली मर्जी माझ्यावर निश्चितपणे होईल असा माझा पूर्ण विश्वास आहे. आपल्या पदी माझे पुन्हा पुन्हा सप्रेम साष्टांग नमस्कार. सदैव आपले क्षेम व कुशल चिंतिते."

हे लक्ष्मी, खरे तर रूक्मिणीने कृष्णाला थोडक्यात पत्र लिहून तिच्या मनीचे भाव कृष्णाला कळविण्याचे ठरवले होते. परंतु पत्र लिखाणाच्या निमित्ताने जेव्हा तिला कृष्णाच्या माहात्म्याचे स्मरण झाले तेव्हा तिच्या ठिकाणचे प्रेम अनावरच झाले. त्यातूनच शब्दप्रवाह निर्माण झाला आणि त्याद्वारे कृष्णप्रेम अखंड ओघाने वाहूच लागले. परंतु थोड्या वेळाने तिची तीच भानावर आली. एवढे दीर्घ लिखाण तिच्याकडून कसे घडले याचे तिचे तिलाच नवल वाटले. पण मग तिच्या मनात लगेचच आणखीनही एक विचार आला की एवढे लांबलचक पत्र कृष्णाला पाठवावे की नाही? कारण कृष्णाची व रूक्मिणीची प्रत्यक्ष भेटच काय, तर ओळखही नव्हती. परंतु या गोष्टीवर जास्त विचार करीत न बसता रूक्मिणीने मनाचा एकच निश्चय केला की पत्राद्वारे मोकळे झालेले आपल्या मनातील भाव आपण कृष्णाला प्रेमाने अर्पण करावेत आणि बाकी सर्व त्या कृष्णावरच सोपवावे. भलेबुरे व योग्यायोग्य याचा निवाडा कृष्णच करील आणि काय तो निर्णयही कृष्णच घेईल. परंतु तिच्या भावाचा कृष्ण नक्कीच स्वीकार करील याची पूर्ण खात्री रूक्मिणीच्या ठायी होती. म्हणूनच अगदी निःशंक मनाने रूक्मिणीने ते पत्र एका रेशमी वस्त्रात बांधून आधीच योजिल्याप्रमाणे त्या पुरोहिताच्या स्वाधीन केले आणि त्याची मथुरेकडे जाण्यासाठी त्वरित रवानगी केली.



हे लक्ष्मी, रूक्मिणीच्या सांगण्याप्रमाणे निघालेला तो पुरोहित अतिशय गुप्तपणे व सावधानतेने प्रवास करीत करीत, त्वरेने मथुरेस जाऊन पोहोचला. त्याने ताबडतोब कृष्णाशी संपर्क साधून त्याला निरोप कळवला, की तो कुंडीनपुराहून एक अत्यंत महत्त्वाचा व खाजगी संदेश घेऊन आलेला आहे आणि त्याला कृष्णाची भेट त्वरित व एकांतात हवी आहे. ‘कुंडीनपूर’ हे नाव ऐकताच कृष्ण लगबगीने बाहेर आला आणि त्याने त्या पुरोहिताची भेट घेऊन त्याला त्याच्या येण्याचे कारण विचारले. पुरोहिताने आधी आजूबाजूला पाहून कोणी नसल्याची खात्री करून घेतली आणि कृष्णाला विनम्रभावाने अभिवादन करून तो म्हणाला, “मी कुंडीनपूरच्या राजवाड्यातील एक पुरोहित असून मला आपल्याकडे राजकन्या रूक्मिणीने एक खास पत्र घेऊन पाठवले आहे. पत्र अत्यंत खाजगी आहे आणि ते केवळ आपल्यासाठीच आहे. पत्राचे उत्तरही आपण माझ्याबरोबरच त्वरित पाठवावे अशी विनंतीही राजकन्येने आपणास केली आहे.”

त्या पुरोहिताचे बोलणे ऐकताक्षणीच कृष्णाच्या मुखावर प्रसन्नता झळकली. त्याने त्वरेने ते पत्र आपल्या हातात घेतले आणि आतुरतेने वाचावयास सुरूवातही केली. कृष्ण जसे जसे पत्र वाचत होता तसे तसे त्याच्या मुखावरील भाव बदलत होते. रूक्मिणीच्या सुंदर व वळणदार अक्षरातील लिखाणातून पाझरणारा कृष्णाविषयीचा प्रेमभक्तिभाव कृष्णाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचण्यास जराही वेळ लागत नव्हता. कारण रूक्मिणीच्या त्या भावात जेवढा आवेग होता, तेवढीच तो भाव स्वीकारण्याची आतुरता कृष्णाच्या ठायी होती. त्यामुळेच कृष्णाचे अंतःकरण संतोष पावता पावता अधिकाधिक आनंदित होत होते. रूक्मिणीचे पत्र वाचून झाल्यावरती कृष्णाने आपले पाणावलेले नेत्र क्षणभर मिटून घेतले आणि पुढच्याच क्षणी त्याने त्या पुरोहिताचे हात प्रेमाने आपल्या हातात घेतले. एवढेच नव्हे, तर त्याने त्या पुरोहितालाच प्रेमाने दृढालिंगन दिले. कृष्णाच्या या अचानक घडलेल्या उत्स्फूर्त कृतीने तो पुरोहित जेवढा चकित झाला, तेवढाच सुखावलाही. त्याने कृष्णाला आपले दोन्ही हात जोडून विनम्रभावाने वंदन केले आणि म्हणाला,


“अहो, हे तर माझे परमभाग्यच आहे. आपणासारख्या थोर पुरुषाचा अंग संग मला लाभला आणि माझी काया कृतार्थ झाली. यामध्ये माझ्या पात्रतेचा काहीही भाग नसून हे तर आपले रूक्मिणीवरील प्रेमच प्रगट झाले हे मी पूर्णपणे जाणून आहे. आपणा उभयतांचे परस्परांवरील असलेले उत्कट प्रेम आपल्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मी केवळ माध्यम ठरलो. परंतु मला मात्र त्याचा अतिशय आनंदही होत आहे. त्या तुमच्या प्रेमाची देवाण घेवाण करीत असताना त्या प्रेमाचा स्पर्श माझ्याही मनाला निश्चितच झाला आणि त्या प्रेमातील काही अंश का होईना,

पण माझ्या मनाला नक्कीच लागून राहिलेला आहे याची मला पक्की खात्री आहे. तेवढे प्रेम मला माझ्या जीवनभर पुरेल असा माझा दृढ विश्वास आहे.

अहो, खरे तर आपण व रूक्मिणी यांची भेटच काय, पण आपण तर एकमेकांना पाहिलेलेही नाही. परंतु तरीही आपले हे परस्परांवरील एवढे उत्कट प्रेम पाहिले की मला तर अत्यंत नवलच वाटते. कुंडीनपुरला मला रूक्मिणीची अवस्था पहायला मिळाली होती. तिच्या ठिकाणी तर आपले माहात्म्य एवढे ठसलेले आहे आणि ती आपल्या प्रेमस्मरणात नित्य एवढी रमलेली असते, की तिला तिच्या देहाचे व आजूबाजूच्या परिस्थितीचेही भान नसते. तिची ही अवस्था जेव्हा तिने मला विश्वासात घेऊन माझ्याकडे प्रगट केली तेव्हा मला तर तिची काळजीच वाटू लागली. कारण असे एकतर्फी भावनिक प्रेम आणि तेही प्रत्यक्ष भेट न होता, म्हणजे तर ते काल्पनिकच होय. त्यामुळे त्या प्रेमाच्या भावनेला जर प्रत्यक्ष प्रतिसाद मिळालाच नाही तर ते मन निराशेच्या गर्तेत एवढ्या खोलवर जाईल, की मग त्या मनाला त्यातून वर काढणे अत्यंत कठीणच होऊन राहील. परंतु रूक्मिणीच्या ठायी तिच्या प्रेमाविषयी एवढा जबरदस्त आत्मविश्वास होता की त्यामुळे मी तर अगदी चकितच झालो होतो. त्याचबरोबर रूक्मिणीच्या प्रेमातील प्रामाणिकपणा मला अत्यंत भावला आणि तिची व्याकुळता पाहून तर माझे मन द्रवलेच. म्हणूनच तर मीसुद्धा एवढ्या साहसाला तयार झालो.

अहो, पण प्रत्यक्ष जेव्हा आपली भेट झाली तेव्हा आपल्याठायीसुद्धा रूक्मिणीविषयी तेवढाच उत्कट प्रेमभाव आहे हे पाहून तर मी अवाकच झालो. प्रत्यक्ष भेट न होताही तुम्हा उभयतांच्या ठिकाणी परस्परांविषयी एवढे जबरदस्त प्रेमाकर्षण आहे आणि एकमेकांठायी असलेल्या प्रेमाची परस्परांना एवढी खात्री आहे, की हे तर तुम्हा उभयतांची मने एकमेकांशी प्रेमाने पूर्णपणे जुळली असल्याचेच लक्षण आहे. मला वाटते यापेक्षा मोठा चमत्कार सर्व सृष्टीत दुसरा कोणताही असणे शक्यच नाही. आता तर माझी खात्रीच झाली आहे की तुम्ही दोघे परस्परांना केवळ अनुरूपच आहात असे नाही, तर तुम्ही फक्त एकमेकांसाठीच आहात. तुमच्या जोडीची तुलना केवळ लक्ष्मीनारायणाच्या जोडीशीच करता येणे शक्य आहे. तुमच्या विवाहाची गाठ ब्रम्हदेवाने आधीच बांधून ठेवलेली आहे हे नक्की. त्यासाठी मी केवळ निमित्तमात्र व थोड्याफार प्रमाणात सहाय्यभूत होत आहे ही माझ्यावरती त्या परमेश्वराचीच कृपा आहे असेच म्हणावे लागेल. तेव्हा मला आता निरोप घेण्याची अनुज्ञा द्यावी एवढीच प्रार्थना आहे. रूक्मिणीला तुम्ही काही वेगळा निरोप देण्याची आवश्यकता आहे असे मला तरी वाटत नाही.”

त्या पुरोहिताचे बोलणे ऐकून कृष्णाला अत्यंत संतोष झाला. त्याने आपल्या सेवकांना बोलावून घेतले आणि त्या पुरोहिताचा यथोचित सत्कार व



पाहुणचारही केला. कृष्णाने देऊ केलेले धन घेण्याचे मात्र त्या पुरोहिताने अत्यंत नम्रतेने नाकारले. कृष्णाला वंदन करून व जास्त वेळ विश्रांतीही न घेता निघणाऱ्या त्या पुरोहिताला कृष्णाने क्षणभर थांबवले. कृष्णाने रूक्मिणीचे पत्र स्वतःकडे ठेवून घेतले आणि ज्या रेशमी वस्त्रात ते पत्र बांधून आणले होते, त्याच वस्त्रात एक तुळशीची माळ ठेवली आणि पुन्हा ते वस्त्र बांधून त्या पुरोहिताच्या स्वाधीन केले. पुरोहिताकडे बघून कृष्णाने फक्त सूचक स्मित केले. पुरोहिताला तो संकेत लक्षात आला. त्याने पुन्हा कृष्णाला वंदन केले आणि तो त्वरेने कुंडीनपुराला जाण्यासाठी निघाला.

हे लक्ष्मी, कुंडीनपुरात रूक्मिणी मात्र डोळयात प्राण आणून त्या पुरोहिताची वाट पाहत होती. ‘एव्हाना पत्र कृष्णापर्यंत पोहोचले असेल आणि त्याने ते वाचलेही असेल. कृष्णाची प्रतिक्रिया काय व कशी असेल बरे?’ या सततच्या विचाराने रूक्मिणीचे मन अत्यंत व्याकूळ झालेले होते. रूक्मिणीला तर जाणारा प्रत्येक क्षण एका दिवसासारखा आणि प्रत्येक दिवस एका वर्षासारखा जाणवत होता. परंतु रूक्मिणीच्या मनाची ही अवस्था ती बाह्यांगाने दाखवू शकत नव्हती. कोणाच्याही ती लक्षात येणार नाही याची अत्यंत काळजी रूक्मिणी घेत होती. सुदैवाने रूक्मिणीला फार काळ प्रतीक्षा करावी लागली नाही. रूक्मिणीच्या मनाची तगमग अधिक तीव्र होण्याच्या आतच तिने कृष्णाकडे पाठवलेल्या पुरोहिताचे परत येणे झाले. रूक्मिणीकडे पाहून आधी त्याने मंदस्मित केले मात्र, रूक्मिणीच्या मनावरचा ताण एकदम हलका झाल्यासारखा झाला. अजून तो ताण पूर्णपणे गेला नव्हताच. परंतु त्या पुरोहिताच्या नजरेतील सूचक भाव रूक्मिणीच्या लगेचच लक्षात आला आणि तिच्या मनाला बराचसा दिलासा मिळाला. परंतु अजूनही पुरोहिताच्या मुखातून प्रत्यक्ष ऐकणे शिल्लक राहिलेले होतेच. त्याचीही पूर्ती लगेचच झाली.


हे लक्ष्मी, योग्य संधी बघून रूक्मिणीने त्या पुरोहिताला ताबडतोब आपल्या महालात बोलावून घेतले. त्या ठिकाणी आल्यावर पुरोहिताने पहिली गोष्ट कोणती केली असेल, तर काहीही न बोलता कृष्णाने दिलेली व आपल्याबरोबर आणलेली त्या रेशमी वस्त्राची गुंडाळी रूक्मिणीच्या हातात सुपुर्द केली. त्या रेशमी वस्त्राच्या स्पर्शानेच रूक्मिणीचे सर्वांग मोहरून आले. तिने लागलीच ते रेशमी वस्त्र उलगडले असता त्यातील तुळशीची माळ तिच्या नजरेस आली आणि कृष्णाच्या प्रेमस्मरणाने रूक्मिणीचे अंतःकरण भरूनच आले. त्या माळेच्या सुगंधाने रूक्मिणीचे मन तर अत्यंत सुखावलेच परंतु ती अत्यंत भावपूर्णही झाली. रूक्मिणीने ती माळ पुन्हा पुन्हा आपल्या नेत्रांना लावली आणि नंतर त्या माळेला आपल्या हृद्याशी धरून रूक्मिणीने आपले नेत्र मिटून घेतले. परंतु त्या नेत्रांतून

वाहणाऱ्या प्रेमाश्रूंना थांबवणे मात्र रूक्मिणीला शक्य झाले नाही आणि तसे करणे तिला आवश्यकही वाटले नाही. रूक्मिणीची ती भावपूर्ण अवस्था पाहून तो पुरोहितही भावनाविवश झाला आणि त्याचे डोळेही पाणावलेच. काहीही न बोलता व काही चाहूलही लागू न देता तो पुरोहित तेथून हळूच निघून गेला.

हे लक्ष्मी, थोड्याच वेळात रूक्मिणी भानावर आली खरी, परंतु तिचे मन मात्र कृष्णाविषयीच्या प्रेमाने व त्याहीपेक्षा अधिक कृतज्ञभावाने भरून राहिले होते. तिच्या प्रेमभावाचा आणि मुख्य म्हणजे तिचा स्वीकार कृष्णाने अत्यंत कृपावंत होऊन केला यातच रूक्मिणीला सर्व पावले होते. बाह्यांगाने जरी ती अजून कृष्णाची झाली नव्हती, तरी अंतःकरणात मात्र रूक्मिणी सर्वस्वी कृष्णाची आणि कृष्णाचीच होऊन राहिली होती. परंतु प्रत्यक्षपणे कृष्णाची होणे हे रूक्मिणीसाठी अजून शिल्लक राहिले होते. तोच एकमेव ध्यास रूक्मिणीला लागला होता. कृष्णप्राप्तीची निश्चिती मात्र आता तिच्याठिकाणी पूर्णपणे होती आणि त्यासाठीच्या प्रयत्नांसाठी रूक्मिणी आता पूर्णपणे सज्ज झाली होती.”

नारदाचे बोलणे ऐकण्यात तन्मय झालेल्या लक्ष्मीच्या मुखातून सहजोद्गार निघाले, “शाब्बास रूक्मिणीची! तिची खरेच कमालच आहे!!” लक्ष्मीच्याकडून अत्यंत सहजपणे प्रगटलेले रूक्मिणीविषयीचे प्रशंसापर वचन ऐकून नारदालाही संतोषच झाला आणि आपले बोलणे थोडावेळ थांबवून तो लक्ष्मीचे बोलणे ऐकण्यासाठी आतुरतेने तिच्याकडे प्रेमळ नजरेने पाहत राहिला. नारदाच्या दृष्टीतील संकेत लक्ष्मीने लागलीच ओळखला आणि तिने पुढे बोलावयास सुरूवात केली,

“अरे नारदा, आता मात्र मला रूक्मिणीच्या भावाचे केवळ कौतुकच वाटत नसून तिचा सार्थ अभिमानही वाटतो. ‘दैव हे शूराला अनुकूल होते आणि प्रेम हेच सर्वांना शूर बनवते’ हे तर रूक्मिणीने स्वतःच्या पराक्रमानेच सिद्ध करून दाखवले आहे. असा पराक्रम प्रेमाच्या आर्ततेतून निर्माण झालेल्या भक्तिभावामुळेच रूक्मिणीकडून घडला, हेही सत्यच आहे. पराक्रम हेच भक्तिभावाचे प्रमुख लक्षण आहे की ज्यामुळे तो देव प्रसन्न होतो आणि स्वतःहून स्वतःला भक्ताच्या स्वाधीन करतो. म्हणूनच कृष्णही रूक्मिणीवरती असाच प्रसन्न झाला. आता त्यानंतर कृष्णाने काय व कशी लीला केली आणि रूक्मिणीसाठी तो कसा धावून गेला हे श्रवण करण्याची माझी उत्सुकता अगदी शिगेला पोहोचलेली आहे. तेव्हा ते सर्व मला समग्रपणे व त्वरित सांगण्याचे कर बघू. कारण ते ऐकल्याशिवाय माझ्या मनाला अजिबात स्वस्थता लाभणार नाही.”



लक्ष्मीच्या बोलण्यातून प्रगट झालेली रूक्मिणीविषयीची योग्य दाद नारदाला संतोष देती झाली आणि अधिक उत्साहित व उत्तेजित होऊन त्याने पुन्हा बोलावयास सुरूवात केली.

“अगं लक्ष्मी, तुला रूक्मिणीविषयी जे वाटत आहे ते अगदी यथार्थच आहे. परंतु एक गोष्ट लक्षात ठेव की अजूनही रूक्मिणीला कृष्णाची प्राप्ती प्रत्यक्षपणे झालेली नव्हतीच. कारण त्यांचे स्वयंवर होण्यासाठी अजूनही अवकाश होता आणि गोष्टी प्रत्यक्ष होई होईपर्यंत कितीतरी अडचणी येणे अगदी संभवनीय असते. मुख्य म्हणजे रूक्मिणीसुद्धा हे समजून होती आणि म्हणून ती सावधही होती. बाह्यांगाने जरी रूक्मिणी सर्वांशी मोकळेपणाने वागताना दिसत असली तरी कोणाशीही ती जास्त जवळीकता राखत नव्हती. अगदी तिच्या माता-पित्यांनाही रूक्मिणीने कशाचा थांगपत्ता लागून दिलेला नव्हता. खरे तर, रूक्मी हा रूक्मिणीवर नजर व पाळत ठेवून होता. परंतु त्यालाही रूक्मिणीच्या मनातील बेत मुळीच कळू शकला नाही. एवढी रूक्मिणीने दक्षता राखलेली होती.


भीष्मकाने मात्र रूक्मिणीच्या स्वयंवराची तयारी अगदी जोरात सुरू केलेली होती आणि रूक्मी स्वतः जातीने सर्वांवरती लक्ष ठेवून होता. निरनिराळे राजे, महाराजे व राजपुत्र यांच्यासाठी त्यांच्या त्यांच्या मानाला व लौकिकाला साजेसे असे वेगवेगळे शामियाने उभारले जात होते. त्यामध्ये सर्व सुखसोयी व विषयभोगांची साधने यांच्या सुविधा पुरवल्या होत्या. भीष्मकाच्या व कुंडीनपुरच्या ऐश्वर्याचीच उधळण सर्वत्र नजरेला येत होती आणि रूक्मिला त्याचा विशेष अभिमान वाटत होता. रूक्मिने एक गोष्ट मात्र हेतुपुरस्सरच केली होती आणि ती म्हणजे त्याने जरासंध व शिशुपालादी अशा त्याच्या गोटातील राजांसाठी, सर्वांपासून वेगळी पण एकत्रित अशी व्यवस्था केली होती. शिशुपालाचा शामियाना तर रूक्मिने अत्यंत विशेषत्वाने सजवला होता. कारण कोणत्याही परिस्थितीत रूक्मिणी व शिशुपाल यांचाच विवाह होणार याची पक्की खात्री रूक्मिला वाटत होती. त्याच्या दृष्टीने त्यातच रूक्मिणीचे हित होते आणि तेच त्यालाही पुढे लाभदायक ठरणार होते.

हे लक्ष्मी, जसा जसा स्वयंवराचा दिवस व वेळ जवळ येऊ लागली तसा तसा बाह्य वातावरणातील उत्साह व जल्लोष वाढतच होता. परंतु भीष्मक व त्याची राणी शुद्धमती यांच्या मनातील सुप्त ताण मात्र वाढत होता. त्याची जाणीव त्या उभयतांना होती. तरीही ते एकमेकांना बाह्यांगाने तसे दर्शवू देत नव्हते. उभयता जेव्हा समोरासमोर येत तेव्हा केवळ मंदस्मित करीत. परंतु काहीही बोलायचे मात्र टाळतच असत. रूक्मिच्या ठिकाणची अस्वस्थता तर अगदी कमालीची वाढली होती आणि ती त्याच्या वागण्या-बोलण्यातून अत्यंत स्पष्टपणे

प्रगट होत होती. स्वतः रूक्मिणी मात्र अत्यंत शांत मनाने व स्वस्थ चित्ताने सर्व गोष्टी अगदी मोकळेपणाने व व्यवस्थितपणे करीत होती खरी, परंतु तीही तेवढ्या आनंदात नव्हती हेही खरेच होते.

हे लक्ष्मी, हळूहळू एकेक करून सर्व आमंत्रित राजामहाराजांचे आगमन होऊ लागले आणि कुंडीनपुरातील गर्दी व वर्दळ वाढू लागली. प्रत्येकाचे यथोचित स्वागत व आदरसत्कार राजा भीष्मक स्वतः जातीने करीत होता. रूक्मिही त्यामध्ये सहभागी होत होता. परंतु त्यातही तो जाणूनबुजून डावे उजवे करीत होताच. त्यामुळेच जेव्हा कृष्णाचे काही यादववीरांना साथीला घेऊन कुंडीनपुरी आगमन झाले, तेव्हा रूक्मी त्यावेळेस मुद्दामहून हजर राहिला नाही. साध्या औपचारिकतेचे व शिष्टाचाराचेही बंधन पाळण्यास रूक्मी तयार नव्हता, एवढा कृष्णाविषयीचा राग व द्वेषमत्सर त्याच्याठिकाणी भरून राहिलेला होता.

*****



## कृष्ण-रुक्मिणी प्रथम भेट

कृष्णाला पाहताच भीष्मकाला मात्र अत्यानंद झाला. कृष्णाची थोरवी व विशेषत्व भीष्मक जाणून होता. पण कृष्णाला तो प्रथमच भेटत होता आणि कृष्णाच्या प्रथम भेटीतच भीष्मकाचेही मन कृष्णाने जिंकून घेतले. भीष्मकाने कृष्णाचा सत्कार करण्याच्याआधीच कृष्णाने त्याला वाकून नमस्कार केला आणि स्मितहास्य करून त्याचे क्षेमकुशल विचारले. कृष्णाच्या मोहक व्यक्तिमत्त्वाने भीष्मक एवढा प्रभावित झाला की त्याने प्रेमाने कृष्णाला आपल्या मिठीतच घेतले. एवढेच नव्हे, तर भीष्मकाने कृष्णाचा हात आपल्या हातात घेऊन त्याला आपल्या स्वतःच्या राजवाड्यात नेले. त्याठिकाणी गेल्यावर भीष्मकाने राणी शुद्धमतीला कृष्णाची आरती ओवाळण्यास सांगितले. कृष्णाला पाहताक्षणीच शुद्धमतीलाही प्रेमाने एकदम भरून आले आणि तिनेही पंचारती ओवाळून कृष्णाचे स्वागत करून त्याचे अभिष्टचिंतन केले. त्यानंतर भीष्मकाने कृष्णाची राहण्याची व्यवस्था आपल्या राजवाड्यातील एका खास महालात केली. कृष्णाबरोबर आलेल्या बाकी सर्व यादवांची उतरण्याची व्यवस्था मात्र, आधी योजल्याप्रमाणेच वेगळया ठिकाणी करण्यात आली. कृष्णाच्या रूपाने रूक्मिणीला सुयोग्य पती मिळत आहे याची खात्री भीष्मकाच्या ठिकाणी आधीपासूनच होती. कृष्णाच्या प्रत्यक्ष भेटीने ती खात्री आणखीनच पक्की झाली एवढेच.


हे लक्ष्मी, रूक्मी मात्र अपेक्षेनुसार संतापलाच. भीष्मकाने कृष्णाला आधीपासूनच असे झुकते माप दिल्याबद्दल रूक्मिने त्याच्यावर दोषारोप करून विरोध करण्याचा प्रयत्न केला. परंतु कृष्णाचे आगमन झाल्यापासून धैर्यबळ घेतलेला भीष्मक त्याच्या निर्णयापासून अजिबात हललाही नाही. मग रूक्मिनेही कधी नाही तो धोरणीपणाने थोडासा संयम दाखवला. ‘प्रत्यक्ष स्वयंवराच्या वेळीच काय ते बघून घेऊ’ असा विचार मनात ठेवून रूक्मी बाह्यांगाने तरी प्रयत्नपूर्वक स्वस्थच राहिला.

हे लक्ष्मी, कृष्णाची राहण्याची व्यवस्था राजवाड्यातील एका महालातच केलेली आहे हे कळल्यावर रूक्मिणीच्या मनाची काय अवस्था झाली असेल, ते मला वाटते तूच अधिक जाणू शकशील. ज्या कृष्णाच्या भेटीसाठी रूक्मिणी डोळयात प्राण आणून व्याकुळतेने वाट पाहत होती तो तिचा कृष्णनाथ, बाह्यांगाने का होईना पण तिच्या अगदी जवळ वास्तव्य करून राहिला होता. साहजिकच रूक्मिणीला स्वस्थ बसवेच ना. रीतीरिवाजाप्रमाणे तिला बाहेर जाण्यास परवानगी नव्हती. त्यामुळे रूक्मिणीच्या मनात सारखी घालमेल सुरू होती. परंतु रूक्मिणीने शांत मनाने व मोठ्या चतुराईने त्यातून मार्ग हा काढलाच. प्रातःकाळी लवकरच उठून रूक्मिणीने स्नानादिक सर्व आन्हिक पूर्ण केले आणि

राजवाड्याच्या आवारातच असलेल्या एका देवालयात देवदर्शनाला जाण्याच्या निमित्ताने ती तिच्या महालाच्या बाहेर पडली. पूजेचे साहित्य असलेले चांदीचे तबक दोन्ही हातात धरून एकेक पाऊल मंद मंद गतीने टाकीत रूक्मिणी चालत होती, पण त्यावेळेस तिची नजर मात्र शोधक दृष्टीने आजूबाजूला पाहत होती.

हे लक्ष्मी, रूक्मिणीच्या ठिकाणची ही कृष्णभेटीची व्याकुळता कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणाला बरे कळणे शक्य होते? कारण कृष्णही रूक्मिणीच्या भेटीसाठी तेवढाच आतुर होता. त्यामुळे कृष्णही जणू त्याच्या आंतरिक प्रेरणेनुसार त्याचवेळी सहजपणे त्याच्या महालातून बाहेर आला. राजवाड्याच्या आवारात असलेले देवालय पाहून कृष्णाच्या ठिकाणची उत्सुकता जागृत झाली आणि त्याची पावले त्या दिशेने वळली. कृष्ण थोडासा त्या देवळाच्या जवळ येतो न येतो, तोच अचानक व अनाहूतपणे कृष्ण व रूक्मिणी एकमेकांसमोर येऊन उभे ठाकले. एका क्षणातच त्या दोघांचे नेत्र नेत्रासी मिळाले आणि दोघांच्याही अंतरीची खूण उभयतांना एकदमच पटली. कृष्ण व रूक्मिणी उभयतांनी एकमेकांना लगेचच ओळखले की 'हाच तो कृष्ण आणि हीच ती रूक्मिणी' आणि परस्परांकडे ते एकटक दृष्टीने पाहतच राहिले. रूक्मिणीच्या हृदयातील प्रेमनगरीचा राजा असलेला कृष्ण आणि कृष्णाच्या हृदयात त्याच्या प्रिय सखीचे स्थान आधीच प्राप्त झालेली रूक्मिणी यांना, त्यांचे भाव व्यक्त करण्यासाठी शब्दांची आवश्यकता जणू जाणवलीच नाही. शब्दावीणही भाव व्यक्त करणाऱ्या नेत्रांच्या प्रेमबोलीने कृष्ण व रूक्मिणी एकमेकांशी कितीतरी वेळ बोलत होते. एकमेकांना प्रेमाने परस्परांचे कुशल विचारीत होते, भेटीचा झालेला आनंद सांगत होते आणि प्रेमाने एकमेकांना 'सांभाळून रहा, काळजी करू नकोस, पण काळजी घे' असेही सांगत होते. काय सांगत होते आणि किती सांगत होते हे खरे तर त्यांचे त्यांनाच ठाऊक. दुसऱ्याला जेथे प्रवेशच नाही तेथे कोण आणि काय बोलणार?

हे लक्ष्मी, परंतु कृष्णाला परिस्थितीचे भान व जाण अधिक होती. रूक्मिणीचे पाणावलेले नेत्र सहजपणे मिटले गेले होते. कृष्णाने एका दृष्टीक्षेपात आजूबाजूच्या परिस्थितीचा अंदाज घेतला आणि रूक्मिणीच्या हातात असलेल्या तबकातील एक सुगंधित तुळसीदल हातात घेऊन, त्याचा हळुवार स्पर्श रूक्मिणीच्या नेत्रांना केला. त्या प्रेमळ स्पर्शाने रूक्मिणीचे नेत्रच काय, तिची सर्व कायाच मोहरून राहिली. अर्धोन्मीलित नेत्रांनी कृष्णाचे मनमोहक मुखकमल व त्यावरील अत्यंत मिश्किल असे सुहास्य यांचे होणारे दर्शन रूक्मिणीच्या नेत्रातून तिच्या हृदयात अगदी सहजपणे पोहोचले आणि ठसलेही. कृष्णाने ते तुळसीदल रूक्मिणीच्या हातात दिले. थोड्याशा भानावर आलेल्या रूक्मिणीने तशाच



अवस्थेत तबकातील प्रसादाची दुधाची चांदीची वाटी कृष्णाच्या हातात ठेवली. कृष्णाने त्या वाटीतील दूध आनंदाने प्राशन करण्यास सुरूवात केली. त्यावेळेस त्याच्या मुखातून सांडणाऱ्या दुधाच्या बारीकशा धारेकडे रूक्मिणी अनिमिष नेत्रांनी पाहत होती. कृष्णाचे ते निरागस व गोड रूप अंतरात साठवून ठेवण्यासाठी रूक्मिणीने क्षणभर आपले नेत्र मिटून घेतले आणि पुन्हा उघडले तर कृष्ण तिच्या समोरून आधीच निघून गेलेला होता.

हे लक्ष्मी, कृष्ण व रूक्मिणी यांच्या पहिल्याच भेटीचा तो भावपूर्ण प्रसंग खरेच अत्यंत हृदयंगम होता. कारण खऱ्या अर्थाने ती कृष्ण व रूक्मिणी यांच्या हृदयांचीच भेट झालेली होती आणि असा अनुभव त्या उभयतांनी एकदमच घेतला होता. परस्परांच्या हृदयातील एकमेकांना असलेले स्थान त्यांना एका दृष्टीभेटीतच कळाले आणि त्यांचे परस्परांवरील प्रेमच एकमेकांना त्या भेटीत मिळाले. प्रेमाला प्रेम मिळाले आणि म्हणूनच हृदयाला हृदय मिळाले, असा अनुभव कृष्ण व रूक्मिणी या दोघांनाही एकाच वेळी आला हेच त्या भेटीचे विशेषत्व होय. किंबहुना देव व भक्त यांच्या आत्यंतिक प्रेमातून घडणाऱ्या भक्तिभावाच्या भेटीचेच ते वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे हेच खरे.


हे लक्ष्मी, भारावलेल्या अवस्थेतील रूक्मिणी काही काळ तेथेच स्तब्ध होऊन उभी राहिली. थोड्या वेळाने तिची तीच सावरली गेली आणि तिने आजूबाजूला पुन्हा पुन्हा वळून पाहिले. परंतु कृष्ण कोठेच तिच्या नजरेस आला नाही. तेवढ्यात रूक्मिणीची नजर तिच्या हातातील पूजेच्या तबकाकडे गेली आणि तिच्या एकदम लक्षात आले, की कृष्णाने प्राशन केलेल्या दुधातील काही दूध त्या चांदीच्या वाटीत तसेच राहिलेले होते. रूक्मिणीच्या मुखावर मंदस्मित झळकले. कृष्णाची प्रेमखूण रूक्मिणीने लगेचच ओळखली. तिच्या चटकन् लक्षात आले की त्या चांदीच्या वाटीतील दूध हे चुकून राहिलेले नाही, तर कृष्णाने ते मुद्दामहूनच ठेवलेले आहे. रूक्मिणीने कृष्णाचा प्रेमप्रसाद म्हणून ते दूध लागलीच प्राशन केले आणि आता देवालयात न जाताच रूक्मिणी मंद पावले टाकीत तिच्या महालाच्या दिशेने परत चालू लागली. देवदर्शन झाल्याचा व देवाचा प्रसादही सेवन केल्याचा तृप्तीचा आनंद रूक्मिणीच्या मुखावर विलसून राहिला होता आणि मुखावरील प्रसन्नतेने रूक्मिणीचे मुखकमल अत्यंत शोभिवंत दिसत होते.

हे लक्ष्मी, मनाच्या तशा हरवलेल्या व हरखलेल्या स्थितीतच रूक्मिणी तिच्या महालात केव्हा व कशी येऊन पोहोचली हे तिचे तिलाही कळलेच नाही. परंतु महालातील इतर स्त्रियांनी रूक्मिणीची अवस्था पाहिली आणि त्या चकित मुद्रेने तिच्याकडे पाहतच राहिल्या. कारण तिच्या हातातील चांदीच्या तबकात पूजेचे सर्व साहित्य जसेच्या तसेच दिसत होते. रूक्मिणीच्या काही जवळच्या

दासींनी तिला विचारण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु कोणाशीही काहीही न बोलता रूक्मिणीने आपल्या हातातील तबक एका दासीच्या हाती दिले आणि आपल्या हातात फक्त कृष्णाने दिलेले तुळसीदल घेऊन रूक्मिणी स्वतःच्या शयनगृहात गेली सुद्धा!

रूक्मिणी तिच्या शयनगृहातील एका मखमली मंचकावर आपले नेत्र मिटून पहुडली होती आणि हातातील तुळसीदल स्वतःच्या मुखावर सर्व बाजूंनी एखाद्या मोरपिसाप्रमाणे हळुवारपणे फिरवीत होती. होणाऱ्या सुखद स्पर्शाने रूक्मिणीचे केवळ तनच नव्हे, तर मनही मोहरून येत होते आणि त्या ठिकाणी सतत कृष्णप्रेमाच्या लहरी वरती लहरी उठत होत्या. कृष्णभेटीच्या प्रेमप्रसंगातून रूक्मिणी बाह्यांगाने जरी बाहेर आल्यासारखी दिसत होती, तरी तिचे मन मात्र कृष्णप्रेमात पूर्णपणे बुडालेले होते. कृष्णरूपाचे प्रत्यक्ष घडलेले दर्शन तिच्या मनःचक्षूंपुढे अजूनही तसेच्या तसेच होते आणि कृष्णप्रेमाचा मनाला जडलेला संग कायम होता. कृष्णाच्या नेत्रातील निःशब्दपणे बोलणारे प्रेम, कृष्णाच्या मुखावरील प्रेमळ व मिश्किल हास्य आणि अंतःकरणाचा ठाव घेणारी कृष्णाची शोधक नजर, हे सर्व रूक्मिणीच्या ठिकाणी अजूनही स्मृतीरूप झाले नव्हते. कारण तो कधीही न संपणारा अनुभव अजूनही ती जसाच्या तसाच अनुभवीतच होती.

कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाने संमोहित व प्रभावित झालेली रूक्मिणी कृष्णाविषयीच्या विचारात पूर्णपणे गढून गेलेली होती. कृष्णाचे एकटक पाहणे, कृष्णाचे चालणे, कृष्णाचे हसणे इत्यादी कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक अंगांचा विचार करता करताच रूक्मिणीला जाणवू लागले की कृष्णाचे ते व्यक्तिमत्त्व सामान्य नसून असाधारणच आहे. गर्ग मुनींनी सांगितलेल्या कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्याची सर्व सुलक्षणे कृष्णाठायी अगदी स्पष्टपणे व पुरेपूर दिसत होती. कृष्णाठायीचा आत्मविश्वास, कृष्णाच्या वागण्यातील सहजता व मोकळेपणा आणि मुख्य म्हणजे कृष्णाच्या ठायी असलेला आत्यंतिक आपलेपणा या सर्वातून कृष्णाच्या ईश्वरी अनुभवाची प्रचितीच रूक्मिणीला आली होती. अशा कृष्णाची सर्व भावाने व कायमची होऊन राहण्याची सुवर्णसंधी आपल्याला मिळाली आहे या जाणिवेने स्वतःला अत्यंत भाग्यवान समजणारी रूक्मिणी मनातून मात्र सावधच होती. कारण पुढे काय व कसे घडणार आहे याची निश्चिती नव्हती. पण पुढे काय करायचे आहे याची खात्री मात्र रूक्मिणीच्या ठायी पूर्णपणे होती. त्याहीपेक्षा तिच्या भावाची पूर्ती कृष्णच करणार आहे, कारण रूक्मिणीच्या विनंतीनुसार त्यासाठीच तो येथे स्वतःहून आलेला आहे असा पूर्ण विश्वास रूक्मिणीच्या ठायी आता झालेला होता.



अकल्पित व अवचित घडलेल्या रूक्मिणीच्या प्रेमभेटीनंतर कृष्ण जेव्हा त्याच्या महालात परत आला तेव्हा तोही अत्यंत प्रफुल्लित व आनंदित झालेला होता. रूक्मिणीच्या व्यक्तिमत्त्वातील सुंदरतेने कृष्णाच्या मनालाही निश्चितच आकर्षित केले होते. पण त्याहीपेक्षा रूक्मिणीच्या ठायीची शालीनता व सोज्वळता याने कृष्ण अधिक प्रभावित झालेला होता. रूक्मिणीच्या मुखावरील सात्विक भावाचे व आत्मविश्वासाचे झळकणारे तेज कृष्णाला अजूनही स्मरत होते. अंतःकरणातील कृष्णप्रेमाला पूर्णपणे प्रगट करणारे रूक्मिणीचे नेत्र व नजर कृष्णाच्या मनःचक्षूंना अजूनही दिसत होती. आपली आत्मसखीच भेटल्याची पूर्ण खात्री व खूण कृष्णाच्या मनाला पूर्णपणे पटली होती. आपले व रूक्मिणीचे नाते अतूट असून हे ऋणानुबंध केवळ याच जन्मीचे नसून ते जन्मोजन्मीचे आहेत, याची जाणीव कृष्णाला अगदी सहजपणे झाली. ईश्वरी नियतीतील हा संकेत कृष्णानेही पूर्णपणे ओळखला आणि आता पुढे काय व कशी लीला प्रगट होणार आहे ती पाहण्यासाठी, कृष्णही आतुर होऊन आपल्या शयनमंचकावर शांतपणे व स्वस्थपणे पहुडला होता.


हे लक्ष्मी, कृष्ण व रूक्मिणी यांची प्रथम भेट जेव्हा झाली त्याचा दुसराच दिवस हा रूक्मिणीच्या स्वयंवराचा होता. भल्या पहाटेपासूनच केवळ भीष्मकाच्या राजवाड्यातच नव्हे, तर सर्व कुंडीनपुरातच गडबड व धामधूम सुरू झाली होती. प्रत्यक्ष स्वयंवराचा सोहळा पाहण्यासाठी समस्त नागरिकांच्या झुंडीच्या झुंडी एका खास उभारलेल्या सुशोभित मंडपाकडे निघाल्या होत्या. नगरीतील सर्व रस्ते सडासंमार्जन करून विविधरंगी रांगोळयांनी सजविलेले होते. चौका चौकामध्ये गुढ्या व तोरणे उभारल्यामुळे सर्वच वातावरण अत्यंत मंगलमय झालेले होते. सर्व परिसरात नानाविध मंगल वाद्यांचे सुर निनादून राहिले होते.

प्रत्यक्ष राजवाड्यामध्ये अर्थातच विशेष घाई व धावपळ होती. स्नानादिक सर्व कर्मे उरकून सूर्योदयाच्या समयी भीष्मक व शुद्धमती यांनी प्रथम देवालयात जाऊन कुलदेवतेची यथाविधी षोडषोपचारे पूजाअर्चा केली आणि कुलदेवतेकडे 'सर्व सुखरूप व आनंददायी घडो' अशी प्रार्थना केली. त्या राजवाड्यातील एका प्रशस्त दालनात राजपुरोहिताच्या अधिपत्याखाली सर्व ग्रहशांतीसाठी एक यज्ञ भीष्मक व शुद्धमती यांच्याकडून करण्यात आला. त्याचवेळी रूक्मिणीनेही सुस्नात होऊन देवालयात कुलदेवतेची यथासांग पूजा केली आणि मनोकामना पूर्ण करण्यासाठी कुलदेवतेकडे मनोबळ मागून घेतले. महालात परतल्यावर रूक्मिणीने नवीन भरजरी वस्त्रे परिधान केली व सर्व अलंकारांसहित सजून ती तयार झाली. माता, पिता व पुरोहित यांना नमस्कार करून रूक्मिणीने त्यांचे आशीर्वाद घेतले. पुरोहितांनी मंत्र म्हणून तिचे अभिष्टचिंतन केले.

मातापित्यांनी रूक्मिणीला प्रेमाने जवळ घेऊन तिचे मुखकमल कुरवाळले. उभयतांचे नेत्र पाणावले. पण तशाच गहिवरलेल्या अवस्थेत भीष्मक व शुद्धमती रूक्मिणीला घेऊन स्वयंवर मंडपाकडे जाण्यासाठी निघाले.

रूक्मिणीचा हात धरून भीष्मक व शुद्धमती त्यांच्या महालाच्या बाहेर आले मात्र, तो रूक्मी तेथे आधीपासूनच उभा होता. रूक्मिणीने आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचा मान राखण्यासाठी म्हणून दोन्ही हात जोडून रूक्मिला नमस्कार केला. रूक्मिने तिला प्रतिसाद दिला न दिल्यासारखे केले. रूक्मिचा चेहरा गंभीरच होता आणि त्याच्या भूमिकेशी तो खंबीर होता हे त्याच्या भावमुद्रेवरून अगदी स्पष्टपणे दिसत होते. काहीही न बोलता रूक्मी पुढे जाऊन रथामध्ये बसला. भीष्मक व शुद्धमती यांच्या मनाला थोडासा ताण आलाच. परंतु रूक्मिणी मात्र शांत तर होतीच आणि निश्चयीही होती. तिने मातापित्यांना केवळ नजरेनेच खूण करून स्वस्थ राहण्यास सांगितले आणि मातापित्यांसह रूक्मिणी रथामध्ये जाऊन बसली. रूक्मिने सारथ्याला इशारा केला असता रथ स्वयंवर मंडपाकडे सावकाशपणे चालू लागला. रस्त्यावर दुतर्फा नागरिकजन जमून रथावरती फुले उधळीत होते आणि रूक्मिणीला शुभेच्छा देत होते.

स्वयंवर मंडप सर्व ऐश्वर्याने युक्त असा सुशोभित केला होता. भरजरी वस्त्रे, नानाविध फुलांच्या माळा व गुच्छ, तोरणे, पताका व अनेक गुढ्या यांनी सजवलेल्या त्या मंडपातील वातावरण अत्यंत मांगल्याचे झाले होते. अनेक मंगलवाद्यांचे सूर वातावरणात भरून राहिले होते. भीष्मक व शुद्धमती रूक्मिणीसह आपापल्या आसनावर स्थानापन्न झाले. हळूहळू एकेका राजांचे आगमन तुतारी व नौबतीच्या झडणाऱ्या आवाजात होऊ लागले. येणाऱ्या प्रत्येक राजाचा नावानिशी उल्लेख करून जयघोष होत असे आणि रूक्मी स्वतः प्रत्येकाचे जातीने स्वागत करून त्यांना त्यांच्या त्यांच्या आसनावर नेऊन बसवीत असे. तेवढ्यात कृष्णाचेही आगमन झाले. त्याच्या प्रसन्न व तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने मंडपातील सर्वजण एवढे प्रभावित झाले, की त्यांनी उत्स्फूर्तपणे व उत्साहाने उभे राहून कृष्णाला उत्थापन दिले. कृष्णाचे ते झालेले उत्स्फूर्त स्वागत पाहून रूक्मिचा कृष्णाविषयीचा राग अधिकच उफाळला आणि कृष्णाच्या स्वागतासाठी पुढे न जाता, किंबहुना कृष्णाकडे न पाहताच त्याने कृष्णाकडे जाणूनबुजून दुर्लक्षच केले. रूक्मिने केलेला हा अवमान कृष्णाने मुळीच मनाला लावून घेतला नाही. परंतु भीष्मकाला मात्र अत्यंत वाईट वाटले. स्वतः पुढे होऊन त्याने कृष्णाचा आदर-सत्कार केला आणि कृष्णाला उच्चासनावर स्थानापन्न केले. त्यामुळे तर रूक्मी अधिकच चिडला. पण स्वतःला कसेबसे आवरून तो मनातल्या मनात चरफडत जागच्या जागीच बसून राहिला.



हे लक्ष्मी, आता रूक्मिणीस्वयंवराच्या प्रसंगातील महत्त्वाचा क्षण जवळ येऊन ठेपला होता. सर्व आमंत्रित राजे, महाराजे आसनस्थ झाल्याची खात्री भीष्मकाने करून घेतली आणि आपल्या आसनावरून उठून तो उभा राहिला. सर्व सभेकडे त्याने एकदा चौफेर नजर वळवून दृष्टीक्षेप टाकला आणि भीष्मकाने आपल्या धीर गंभीर वाणीने बोलावयास सुरूवात केली.

“सर्वप्रथम मी स्वयंवर मंडपात असलेल्या सर्व राजे, महाराजे आणि इतर आदरणीय व माननीय उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत करून त्या सर्वांचे अभीष्टचिंतन करतो. माझ्या आमंत्रणाचा मान ठेवून आपण सर्वजण माझी सुकन्या रूक्मिणी हिच्या स्वयंवरासाठी अगत्याने आलात याबद्दल सर्वांचेच आभार मानून कृतज्ञता व्यक्त करतो. आपण सर्व जाणूनच आहात की एका स्त्रीच्या दृष्टीने तिच्या विवाहाचा प्रसंग हा अत्यंत मांगल्याचा व आनंदाचा क्षण असतो. आपले माता-पिता व माहेरच्या मंडळींना कायमचे सोडून आपल्या पतीबरोबर पुढील सर्व जीवनाची वाटचाल जोडीने करण्यासाठी निघायचे असते. माझ्या कन्येच्या जीवनातील तो महत्त्वाचा क्षण आता अत्यंत जवळ येऊन राहिला आहे. अशावेळी माझे मन साहजिकच सुख व दुःख या दोन्ही मिश्रित भावनांनी भरून आलेले आहे.

प्रचलित धर्म व रूढी परंपरेला अनुसरून एका कन्येला मिळणारा स्वयंवराचा हक्क व अधिकार रूक्मिणीने घ्यायचा ठरविलेले आहे. प्रथम रूक्मिणी स्वतः जातीने स्वयंवर मंडपात फिरून, सर्व विवाहेच्छुक राजे व महाराजे यांना भेटून त्यांची सर्व माहिती जाणून घेईल. त्यानंतर सर्व गोष्टींचा योग्य तो विचार करून रूक्मिणी निर्णय घेईल आणि स्वकराने तिच्या पसंतीच्या पुरुषाच्या कंठात वरमाला घालेल. रूक्मिणीचा निर्णय हा अंतिम व सर्वांनाच बंधनकारक असेल. त्यानंतर याच ठिकाणी रूक्मिणीच्या विवाहाचा धार्मिक विधी व आनंदसोहळा सर्वांच्या उपस्थितीतच साजरा करण्यात येईल. माझी सर्वांना एकच विनंती आहे की सर्वांनीच मला त्यासाठी पूर्ण सहकार्य करावे आणि हे स्वयंवर यशस्वितेने पूर्णतेस न्यावे.”


भीष्मकाचे बोलणे थांबल्यावरती स्वयंवर मंडपात करतालीचा एकच नाद घुमला. सर्वांच्या संमतीचेच ते दर्शक होते. आता पुढे काय घडणार ते पाहण्याच्या उत्सुकतेने सर्व सभा पुन्हा शांत व स्तब्ध झाली. भीष्मकाने शुद्धमतीला नजरेने खूण केली असता ती रूक्मिणीच्या जवळ गेली आणि तिने रूक्मिणीला आपल्या हाताने उठवून भीष्मकाच्या जवळ आणले. भीष्मकाने राजपुरोहितांना आदराने विनंती केली असता, त्यांनी मंत्रोच्चाराच्या उद्घोषात सर्व देवतांना आवाहन केले आणि रूक्मिणीला उत्तमोत्तम आशीर्वाद दिले. रूक्मिणीने राजपुरोहितांना वाकून आदरपूर्वक नमस्कार केला. मातापित्यांनाही तिने प्रेमाने नमस्कार केला

आणि आपले दोन्ही हात जोडून मंडपातील सर्वच सभाजनांना नम्रपणे अभिवादन केले. राजपुरोहितांनी नानाविध सुगंधित फुलांनी एकत्र गुंफलेली माळ रूक्मिणीच्या हातात दिली. रूक्मिणीने क्षणभरच आपले नेत्र मिटून घेतले आणि नंतर कृष्णाच्या दिशेने पाहून हळूच प्रेमाचा एक कटाक्ष टाकला आणि भीष्मकाच्या मागोमाग एकेक पाऊल टाकीत ती चालू लागली. रूक्मिणीच्या सोबत तिची अत्यंत प्रिय अशी सखीही योग्य अंतर ठेवून चालत होती.

सभामंडपात आसनस्थ असलेल्या एकेका पराक्रमी, गुणवान व नामवंत राजांच्याजवळ भीष्मक रूक्मिणीला क्रमाक्रमाने घेवून जाऊ लागला. प्रत्येक राजाच्या जवळ गेल्यानंतर थांबून रूक्मिणी त्या प्रत्येकाला नम्रभावाने मान लववून अभिवादन करी आणि अधोवदन करून उभी राही. त्यावेळी रूक्मिणीची सखी त्या त्या राजाविषयीची सर्व माहिती रूक्मिणीला सांगत असे. रूक्मिणी ते सर्व ऐकून घेई आणि शांतपणे काहीही न बोलता पुढे जाऊ लागे. चालता चालता भीष्मक व रूक्मिणी शिशुपाल व जरासंध यांच्याजवळ आले. रूक्मिणीने त्यांच्याकडे केवळ औपचारिकतेने पाहिले आणि तिच्या सखीने त्यांच्याविषयी काही सांगावयास सुरुवात करण्याच्या आधीच रूक्मिणीने पुढे चालावयास सुरुवातसुद्धा केली.

रूक्मिणीच्या या अकल्पित कृतीने रूक्मिला अत्यंत राग आला आणि तो आपल्या आसनावरून उठून रूक्मिणीच्या जवळ आला. आपला राग व निषेध काही बोलून रूक्मी व्यक्त करणार, त्याच्या आधीच भीष्मकाने रूक्मिला हाताच्या खुणेने शांत राहण्यास सांगितले आणि त्याच्या आसनावर परत जाऊन बसण्याचा त्याला इशारा केला. भर सभेत झालेल्या या अवमानाने रूक्मिच्या रागाचा पारा अधिकच चढला. परंतु रूक्मिकडून काही विपरीत घडण्याच्या आधीच समयसूचकता दाखवून स्वतः जरासंधाने रूक्मिला शांत केले आणि संभाव्य अनर्थ त्यावेळेपुरता तरी टाळला. काहीतरी निमित्त होऊन स्वयंवराचा बेतच पुढे ढकलला जाणे हे जरासंधाच्या कूटनीतीच्या दृष्टीने अत्यंत अयोग्य ठरले असते. कारण त्यामुळे सभामंडपातील वातावरण आधीच बिघडून ते रूक्मी व शिशुपाल यांच्या विरुद्ध गेले असते आणि सर्वांची सहानुभूती रूक्मिणीकडे वळली असती. म्हणूनच चांगुलपणाचा आविर्भाव दाखवून जरासंधाने मोठेपणा मिळवण्याचा प्रयत्न केला.

हे लक्ष्मी, पण खरी गंमत तर पुढेच घडली. आपल्या पित्याच्या मागोमाग सखीसह चालणारी रूक्मिणी जेव्हा प्रत्यक्ष कृष्णाच्या आसनासमोर येऊन उभी राहिली, तेव्हा मात्र तिने कृष्णाला दोन्ही हात जोडून नमस्कार केला. कृष्णानेही त्या नमस्काराचा स्वीकार केला आणि हसून त्याला प्रतिसादही दिला. कृष्ण व रूक्मिणी यांच्या दृष्टीभेटीतच त्यांचे जणू न बोलताच बोलणे झाले आणि त्याचा भावार्थही त्या दोघांनाच समजला. रूक्मिणीच्या ठायीचा कृष्णाविषयीचा



असलेला प्रेमभाव व श्रद्धाभाव आणि त्यातूनच निर्माण झालेला आत्मविश्वास कृष्णाने ओळखला, तर कृष्णाठायी असलेला रूक्मिणीच्या भक्तिभावाविषयीचा विश्वास रूक्मिणीने जाणला. तेवढ्यातच रूक्मिणीची सखी पुढे झाली. परंतु ती सखी कृष्णाविषयी माहिती सांगण्यास सुरुवात करण्याच्या आधीच रूक्मिणीने आपला उजवा हात त्या सखीच्या मुखावर ठेवला आणि काहीही न बोलण्याची नेत्रखूण केली. पुढच्याच क्षणाला रूक्मिणीने पुढे चालण्यास सुरुवात केली सुद्धा!

हे लक्ष्मी, तसे पहायला गेले तर कृष्ण व शिशुपाल या दोघांच्याही बाबतीतील रूक्मिणीकडून घडलेली कृती एकच व अगदी उत्स्फूर्त होती. परंतु त्या कृतीमागील भावात मात्र कमालीचा विरोधाभास अत्यंत स्पष्टपणे दिसत होता. अर्थात सर्वांच्याच तो लक्षात आला असेल असे नाही आणि लक्षात आलेल्यांनाही त्यातील फरक कळला असेलच असेही नक्की नाही. शिशुपालासारख्या दुर्जनाठायीचे धन, दौलत, सत्ता इत्यादी बाह्य लौकिक गुण ऐकणे हे रूक्मिणीच्या मनालाच काय, पण तिच्या कानालाही सुखावह झाले नसते. म्हणूनच शिशुपालासमोर रूक्मिणीचे तन व मन एक क्षणभरही उभे राहू शकले नाही.

कृष्णाचे रूप व गुण रूक्मिणीच्या मनात आधीच पूर्णपणे भरलेले होते आणि कृष्णाचे माहात्म्यही तिच्याठायी एवढे ठसलेले होते, की त्याचे यथार्थ शब्दांकन होणे अशक्यच आहे हे रूक्मिणी स्वानुभवाने जाणून होती. त्यामुळेच रूक्मिणीच्या सखीने कृष्णाविषयी काहीही बोलण्याचा केलेला प्रयत्न हा कमीच पडला असता आणि मग ते अपुरे बोलणेही रूक्मिणीच्या मनाला सुखावह झाले नसतेच. तिच्या मनाला पूर्ण समाधानही झाले नसते ते नसतेच. तेव्हा रूक्मिणीसाठी शिशुपालाविषयी काहीही ऐकणे तिला नकोसेच होते तर कृष्णाविषयी काही ऐकणे तिला अनावश्यकच वाटत होते.

हे लक्ष्मी, परंतु रूक्मिणीच्या या वागण्याने रूक्मिला मात्र थोडेसे बरे वाटले. त्याच्या दृष्टीने शिशुपाल व कृष्ण यांना रूक्मिणीने समान वागणूक दिलेली होती आणि त्यातच रूक्मिने त्याच्या मनाचे समाधान करून घेतले. तरीही रूक्मिणीच्या मनात काहीतरी कपट असू शकेल या शंकेने रूक्मी अधिकच सावध झाला. भीष्मकालाही रूक्मिणीच्या अशा वागण्याचा उलगडा झाला नाहीच आणि तोही थोडासा बुचकळ्यातच पडला. परंतु भीष्मकाच्या ठिकाणी रूक्मिणीविषयीचा पूर्ण विश्वास असल्यामुळे तो रूक्मिणीची खात्री बाळगून पुढे काय होते याची वाट पाहत स्वस्थ राहिला.

स्वयंवर मंडपातील उपस्थित असलेल्या सर्व राजामहाराजांची ओळख व माहिती करून घेऊन रूक्मिणी पुन्हा आपल्या आसनाजवळ येऊन उभी राहिली. मंडपात सर्वत्र नीरव शांतता पसरून राहिली होती. सर्वांचीच उत्सुकता शिगेला

पोहोचली होती आणि त्याचाच परिणाम म्हणून सर्वांच्याच मनातील एक प्रकारचा सुप्त ताण सर्व वातावरणातच जाणवत होता. परंतु रूक्मिणी मात्र अविचल व शांत होती. तिच्या मुखावरील निश्चयात्मकतेचा भाव अगदी स्पष्टपणे दिसत होता. रूक्मिणीने क्षणभरच आपले नेत्र मिटून घेतले व पुन्हा हळुवारपणे उघडले आणि सौम्य व धीरगंभीर वाणीने तिच्या मुखातून एकेक शब्द ओघाने बाहेर पडू लागले,

“सर्वप्रथम मी महनीय राजगुरू, वंदनीय मातापिता आणि आदरणीय मान्यवर यांना मनःपूर्वक नमस्कार करते आणि त्यांचे आशीर्वाद मागते. त्याचप्रमाणे माझ्या स्वयंवरासाठी जमलेल्या सर्व राजे, महाराजे यांचेही मनःपूर्वक आभार मानते. आपण सर्व जाणूनच आहात, की एका स्त्रीच्या दृष्टीने तिचा विवाह हा तिच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. तिच्या जीवनातील ते एक अत्यंत महत्त्वाचे वळण आहे. मातापित्यांच्या पोटी जन्माला येऊन व त्यांच्याच कृपाछत्राखाली लहानाचे मोठे झाल्यावर, पतीचा हात धरून परस्परांच्या जीवनाची कायमची जन्मगाठ बांधण्याचा हा क्षण आहे. पतीला सर्वप्रकारे सहकार्य करून आणि पतीचे साहाय्य स्वीकारून सर्व जीवन एकत्रितपणे, एकोप्याने व आनंदाने जगण्यासाठीच्या प्रवासाची सुरूवात करायचा हा क्षण आहे. एकमेकांवरील विश्वासाने व श्रद्धेने स्वधर्माचरणाचे पालन करून स्वतःच्या जीवनाचे कल्याण साधण्यासाठी परस्परांशी वचनबद्ध होऊन, तसा निश्चय करण्याचा हा क्षण आहे. म्हणूनच अशा क्षणी विवेकाने व जबाबदारीने निर्णय घेणे अत्यंत आवश्यक आहे.

खरे तर, आपल्या धर्माने स्त्रीला पती म्हणून तिच्या जन्माचा जोडीदार निवडण्याचा पूर्ण हक्क प्रथमपासूनच दिलेला आहे. परंतु पुढे काळाच्या ओघात स्त्रीच्या या मूलभूत हक्कावर गदा येऊ लागली. कधी मातापिता व कुटुंबातील इतर नातेवाईक यांच्या दडपणाखाली तिला मान झुकवावी लागली, तर कित्येक वेळा स्त्रीकडे वासनात्मक नजरेने केवळ भोगवस्तू म्हणून पाहणाऱ्या मदांध सत्ताधाऱ्यांच्या बळजबरीपुढे तिला शरणागती पत्करावी लागली. परंतु मला सांगायला आनंद वाटतो की माझ्या सुसंस्कृत मातापित्यांनी खरा धर्म व त्यातील सद्हेतू जाणला आणि मला माझा पती निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले. माझ्या इतर कुटुंबियांनीही त्यांची संमती दिली आणि म्हणूनच या स्वयंवराची योजना त्यांनी माझ्यासाठी माझ्यावरील प्रेमामुळे केलेली आहे. माझ्या मातापित्यांचा मला सार्थ अभिमान वाटतो आणि त्यासाठी मी त्यांची कायमची ऋणी आहे.

माझ्या जीवनाचा जोडीदार म्हणून पतीची निवड करताना मी माझ्या मनाशी बराच विचार करून त्याचे निकष आधीपासूनच निश्चित केलेले आहेत. माझ्या मातापित्यांचे संस्कार आणि गुरुजनांची सेवा करण्याची मला भाग्याने

मिळालेली संधी याचीच ही परिणती आहे. एक स्त्री म्हणून मला बाह्य जीवनात रक्षणाची व आधाराची नेहमीच जरुरी लागणार आहे. पण मला असा जोडीदार हवा आहे, की जो माझे रक्षण तर करीलच, पण मला मनाने दुर्बल म्हणून अबला न ठेवता मलाही मनाने सबळ करील. मलाही माझ्यावरती अत्यंत प्रेम करणाराच पती हवा आहे. परंतु त्याच्या प्रेमामध्ये माझ्याविषयीचा मोह व आसक्ती नसावी, तर सुखानंद देणारी अशी प्रेमाची रसिकता असावी. मलाही अत्यंत सुंदर व रूपवान असाच पती हवा आहे. परंतु त्याचे सौंदर्य हे मनाला शांती व आल्हाद देणारे आणि त्याचे रूप दुष्टांतील दुष्टांनाही मोहवून, त्यांच्या ठिकाणचा सुष्टभाव जागृत करणारे असे असावे. मलाही ऐश्वर्यवान पतीच हवा आहे; परंतु ऐश्वर्याने धुंद न होता आपले सर्व वैभव हे ईश्वरदत्त आहे हे ओळखून, ते सर्वांना उपभोगू देणारा असा तो परमउदार असावा. मलाही पराक्रमी पतीच हवा आहे, परंतु तो दुर्जनांचे निर्दालन करून सज्जनांचे रक्षण करणारा आणि त्यांनाही पराक्रमाला उद्युक्त करणारा असा असावा. मलाही सर्वांच्या गुणांची कदर व आदर करणारा असाच सद्‌गुणी पती हवा आहे, की ज्याच्यामुळे सर्वांच्या ठिकाणचा मंगलदायी व पवित्र असा सद्भावच जागा होईल आणि आनंदाने जीवन जगण्याची स्फूर्ती त्याच्यापासूनच सर्वांनाच सर्वकाळ मिळत राहील.

हे सज्जन हो, माझ्याठिकाणी ज्या पतीविषयीच्या अपेक्षा आहेत त्या ऐकून, असा पुरुष या भूतलावर असणे शक्य तरी आहे का, असाच प्रश्न कोणाच्याही मनात येणे अगदी साहजिकच आहे. परंतु मला सांगायला अत्यंत आनंद होत आहे की असा सर्व ईश्वरीगुणांनी युक्त असलेला दैवी पुरुष ईश्वराच्या कृपेने भूतलावर निश्चितच आहे. एवढेच नव्हे, तर माझ्या परमभाग्याने तो पुरुषोत्तम या क्षणाला, येथे या स्वयंवरमंडपातच आसनावर विराजमान झालेला आहे. त्याला तर मी मनाने वरलेलेच आहे. पण प्रश्न असा आहे की त्याच्यासाठी मी योग्य आहे की नाही? मी त्याला साजेशी आहे की नाही हे मला माहीत नाही, पण मी त्या महापुरुषाला एवढे एकच वचन देते की मी त्याला जन्मभर अनुसरेन आणि भक्तिभावाने त्याचीच सेवा करीत राहीन. त्याने कृपावंत होऊन माझा स्वीकार करावा आणि मला त्याच्यासाठी अनुरूप करून घ्यावे.”

*****

# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी




श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्‌गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्‌गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.



# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर .
आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य